
।।ॐ।।

।। श्रीगुरु कृष्ण सरस्वती दत्त महाराज प्रसन्न ।।

# ।। श्रीदत्तचरित्रगुटिका ।।



**-✽- श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराज (कुंभार स्वामी) -✽-**


**-✽- ओवीबद्ध चरित्र -✽-**

-✽- कृष्णदास -✽-

(सुदेश चोगले)

# -✻- श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराज, कोल्हापूर -✻-





जन्म: माघ वद्य पंचमी शके १७५८ (७ फेब्रुवारी १८३६)
समाधि: श्रावण वद्य दशमी शके १८२२ (२० ऑगस्ट १९००)

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *



।। श्रीगुरुदत्त ।।
दत्त सर्वात्मक राहतो, दत्त सर्वांतर्यामी राहतो
गुरुरुपे स्वये येऊनि, जीवास बोध तो करितो
स्मर्तृगामी दत्त तो हा, शिष्या शक्तिरुपे सांभाळतो
गुरुदेव दत्त गुरुजी हा, शिष्या परीक्षेसी घेतो
मोहमायेच्या फासात, कोण अडकतो पाहतो
तीव्र वैराग्ये जो का, परीक्षेसी खरा उतरतो
संतोषोनी त्यावरी, निजकृपा पूर्ण ओपितो
स्वानंद साम्राज्य सिंहासनी, त्यासी बैसवितो
फकीर तोचि अन् राजा तो, अदभुत संगम तो दिसतो
श्री दत्तात्रेय गुरुंचा, हा मार्ग आम्ही चालतो
श्री कृष्ण सरस्वती गुरुंचे, दास आम्ही शोभतो
करवीरीचा गुरु दत्त हा, कृष्णदास चरणी नत त्या होतो
✻-✻-✻
श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, हाचि आमुचा तारक मंत्र ।
न लगे आणिक यंत्र आणि मंत्र, सर्वही दोषा जाळी यथार्थ ।।
✻-✻-✻

# - प्रस्तावना -

अध्यात्ममार्गातील अनुभूति हे केवळ अन् केवळ श्रीसद्गुरुंच्या कृपादानाचे फलित आहे. ही कृपा कुणावर, कशी व केव्हा होईल त्याचे काहीच गणित नाही. कर्तुम-अकर्तुम-अन्यथाकर्तुम असे सामर्थ्य बाळगणारे श्रीसद्गुरु पात्रापात्रतेची गणना न करता जीवावर अनुग्रह करतात व जीवाची साधकीय जीवनाची वाटचाल सुरु होते. साधनेची पराकाष्ठा करताना स्वत:च्या मर्यादांची जाण पटून साधक जेव्हा श्रीसद्गुरुंशी अनन्य-शरणागत होतो तेव्हाच या कृपेचे बीज उमलू लागते. अचल गुरुनिष्ठा व अहेतुक गुरुप्रेम यांत क्षणाक्षणाने व कणाकणाने वृद्धि होता होता, त्यांची परिसीमा गाठताच, साधक दिव्य अनुभूतीस पात्र होतो. या वाटचालीत श्रीसद्गुरु लीलाचरित्र गुणगान व चिंतन यांचे स्थान अनमोल आहे. 'श्रीदत्तचरित्रगुटिका' हे परमसद्गुरु श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे ओवीबद्ध संक्षिप्त चरित्र व 'चित्-स्फुर्ति चिंतनामृत' यांचे वाचन व चिंतन-मनन, श्रीदत्त महाराजांच्या कृपेने साधकांस परतत्वाचा स्पर्श घडवेल असा विश्वास आहे.

- कृष्णदास

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

**-✻- परमपूज्य श्रीसद्गुरु अप्पा उर्फ श्री माधवराव बाळकृष्ण टिकेकर महाराज -✻-**

(१३ जून १९२९ - ४ मे २००१)



-✻- यांचे चरणी सर्वभावे समर्पण -✻-

## ।। परमपूज्य श्रीसद्गुरु अप्पा महाराज ।।

हे कोण उभे माडीवरी, शुभ्र लुंगी अंगावरी
नजर प्रेमळ ती भारी, वाटे पाहता नवलचि भारी
ही तर अमुचि अप्पामाई, भाव हा माझा तिचे पायी
सुहास्य-वदन तेजे आगळा, दत्तचि केवळ वेश आगळा
करवीरीची हे गुरुमाई, भक्त उद्धरावया आली मुंबई
वर्णू माझे भाग्य मी काई, न कळेची माझी पूर्वपुण्याई
हास्यकटाक्ष एके क्षणीचा, होई मी वाटे धन्यचि मनीचा
बोलणे नच परि हुंकार तो साचा, दर्शवि जाणती भाव मन्मनीचा
कृपादृष्टीने मला न्याहाळी, प्रारब्धाची गति हो जाळी
प्रकटली कृपेची नवलाई, दत्त दिसे ठायी ठायी
आत्मरुपाची नित नवलाई, वर्णू किती ते सुख मी बाई
चरण मी सोडुनि आणिक ना जाई, चरण मी सोडुनि आणिक ना जाई!!

*-*-*

गुरुवर्य अप्पांच्या घरी, पौर्णिमा अमावस्या वारी
लोक येती संख्या भारी, असे 'साधने'ची ती वारी
खाली दिवाणखाना प्रशस्त, स्वामींची भव्य तसबीर
उभे असती अप्पा समोर, शिष्य नमिती चरणांवर
मग ते नेती माडीवर, स्वामींची खोली सुंदर
वर अजान, औदुंबर, जणू आळंदी अन् औदुंबर
तेचि असे हो ध्यान मंदिर, स्वामींच्या पादुका अति सुंदर
सर्व घालिती हार सुंदर, सुवासिक उदबत्त्या अपार
दरवळे सुगंध थोर, प्रसाद अर्पिती मधुर
मग नमन करुनी चरणांवर, सर्व बसती ध्यानी ताठ
काही बसती शांत निवांत, काहींच्या क्रियांचा थयथयाट
तेथे येती साधु संत, सूक्ष्म रुपात हो अनंत
क्वचितची कोणा दिसती, जो असे भाग्यवंत
अप्पा उभे असती समोर, पाहती नीट न्याहाळून
अडल्या नाडया सोडवून, प्रगतीस करीत मदत
होता ध्यानी हळूहळू धुंद, अप्पा हसती मंद मंद
सोबत उदबत्ती सुगंध, आनंदी सर्व हो धुंद

हेचि केवळ साधायासी, अप्पांची कळवळ हो साची
करिती खटपट साधनेची, दर पंधरा या दिसांची
त्यांनी लाविली सर्वा गोडी, ध्यानाची थोडी थोडी
सवय लागता ती कां मोडी, जाणुनी मनाची खोडी
मग उपजे ती आवडी, ध्यानी सर्वा थोडी थोडी
मग बसे ध्यानाची घडी, हरघडी, नेत्र जरी उघडी
अशी वर्णिली मी ही वारी, 'साधने'ची वारी
ती चाखिता आज मी गोडी, आठवे मनी पूर्व कहाणी
अप्पांची कणव अन् वाणी, जाणुनि मज नेत्रा येई पाणी
सद्गदित अंत:करणी, मी सद्गदित अंत:करणी

*-*-*

सर्वदा सांगत अप्पा, मारु नका तुम्ही गप्पा
मग स्वामी होतील हो खप्पा, मग बोल नाही आम्हा बाप्पा
साधन सहज सुंदर, न मिळे हे वारंवार
मग का करता हो उशीर, आत्म्यावरी देहाचा भार
करे जो साधन अपरंपार, त्यावरी स्वामी हर्षति अपार
वर्षति कृपा अपरंपार, होता सहज होई भवपार!

*-*-*

ॐ

॥ श्री गणेशाय नम: ॥
॥ श्री सरस्वत्यै नम: ॥
॥ श्री सद्गुरुनाथाय नम: ॥

सकल विद्यांचा अधिपति । नामे प्रसिद्ध गणपति । तयासी धरोनिया चित्ती । नमन भावे ग्रंथारंभी ॥१॥ तत्प्रसादे होवोनि अमन । घडावे श्रीसद्गुरु कीर्तन । श्रीगुरुचरित्र शब्दांकन । करितो भावे याचन ॥२॥ तव सूक्ष्मदृष्टी द्वारे । घडावे श्रीगुरुलीला अवलोकन सारे । बोध-मोदक हाचि बा रे । वाचक श्रोतयांसी होवो प्रसाद ॥३॥ विश्वाचे मूळ स्वरूप ॐकार । तेचि तव स्वरूप अपार । त्यातूनि जैसा जगत्‌विस्तार । तैसा होवो ग्रंथाचा ॥४॥ अवस्था-गुण-कालातीत । स्वरूप तव अबाधित । स्वरूप तेचि श्रीसद्गुरुत । वर्णवेल केवि तव कृपेविना ॥५॥ करितो प्रसाद याचना । देई बुद्धी वर्णना । प्रासादिक रसाळपणा । अर्पी श्रीसद्गुरुचरित्र कथना ॥६॥ हंसवाहिनी श्रीसरस्वती । प्रसन्न होवो मज मंदमति । द्यावी मज स्फुर्ति-शक्ति । करितो तियेसी कृपायाचना ॥७॥ शक्तिविना ना चालना । ओघ जववरी येईना । असमर्थ मी लेखना । म्हणुनि शारदा वंदना प्रारंभी ॥८॥ शक्तिस्वरुप श्रीशारदेसी । वंदुनिया कमलपदासी । ग्रंथ लेखन सहायासी । विनवितो जोडुनि करांसी ॥९॥ श्रीगणेश शारदेसी आरंभी नमिता । आली चित्तासी स्वस्थता । होता श्रीसद्गुरुंसी एकात्मता । सहजी होय कार्यसिद्धी ॥१०॥ अनुभव न होय जववरी । वर्णन होय कैसेपरी । कल्पनारंजन अतिघात करी । ना उपेगी सर्वथा ॥११॥ लीलाचरित्र श्रीसद्गुरुंचे । श्रवण कर्णी पठण वाचे । श्रीसद्गुरुस्मरणे हृदय नाचे । दाटती अष्टभाव ॥१२॥ मनबुद्धी निर्मळ । तरीच प्राप्ति सकळ । मलिनता जरि अल्पांश केवळ । तरी न घडे सहजी ॥१३॥ श्रीसद्गुरुस्वामींसी । प्रार्थी दास विनितेसी । निर्मलता व्हावी मजसी । तेणे ग्रंथलेखन सुगम ॥१४॥ गणेश शारदा श्रीसद्गुरु । प्रार्थिता आला मना धीरु । आता चालवो तोचि करु । राहीन केवळ यंत्रवत् ॥१५॥ करवीर नगरी अवतरला श्रीगुरु । श्री कृष्ण सरस्वती दत्तावतारु । वर्णावया चरित्रसागरु । नम्र भावे प्रारंभ करु ॥१६॥ जगदुत्पत्ति स्थितिसंहारु । करिती विधि हरि हरु । जन्ममृत्यु भवसागरु । खेळविती जीवा अदृश्य रीती ॥१७॥ वासनासंगे भवबंधी । भ्रमती जीव अनादि । खंडण्यासी शृंखलादि । अवतरला गुरुराज श्रीदत्तगुरु ॥१८॥ अहेतुक कृपासागरु । सदा उभवित कृपाकरु । चिरंजीव स्मर्तृगामी मोक्षकरु । धावतो तात्काल भक्तकामी ॥१९॥ क्षणभरी निश्चल बैसोन । श्रीगुरुंचे धरु ध्यान । स्वरुप निराकार निर्गुण । अनुभव घेऊ जगदाकारु ॥२०॥ अनुभवाचा शब्दाकारु । प्रसव होई जो उद्गारु । त्या श्रीसद्गुरुस्वरुपाचा आदरु । घडेल यथार्थपणे ॥२१॥ श्रीगुरु दत्तात्रेय अवतारु । परंपरा

आली भूवरु । श्रीपाद श्रीवल्लभ नृसिंह यतिवरु । जाहले प्रसिद्ध तदनंतर ।।२२।। जन्मस्थान पीठापूर । तपस्थान कुरवपूर । श्रीपाद श्रीवल्लभावतार । वास्तव्य गुप्त कुरवपुरी ।।२३।। कारंजाग्रामी नृसिंहयति । जन्मले दत्तात्रेय त्रैमूर्ती । औदुंबर नृसिंहवाडी तप:पुर्ति । अंती आले गाणगापुरी ।।२४।। गमन कर्दळीवनी जरी । गुप्तरुपे वसती गाणगापुरी । भक्तजन भावे स्मरण करी । होय सदेह दर्शन ।।२५।। भवरोग पीडित आर्त जन । आधार ना जयांसी आन । भजुनिया श्रीदत्तदयाघन । संकटमुक्ति पावती कृपे ।।२६।। महाराष्ट्रप्रांती करवीर । आदिमाया अंबाबाई नगर । दक्षिणकाशी प्रसिद्ध भूवर । तेथ घेतला अवतार ।।२७।। श्रीअप्पा अन्नपूर्णा जोशी दंपति । नांदणीग्रामी सुखे नांदती । गोत्र भारद्वाज सुशील चित्ती । राहती तेथ सुखाने ।।२८।। व्यवसाये पुरोहित । असती अत्यंत संतुष्टचित्त । शनिवार पौर्णिमादिनी व्रत । वारी श्रीवाडीक्षेत्राची ।।२९।। एकनिष्ठ दत्तभक्त । दत्तस्मरणी उल्हास अत्यंत । नाम अप्पांचे मुखांत । गर्जे अखंड श्रीगुरुदत्त ।।३०।। पत्नी अन्नपूर्णासती । दत्तभक्ति तियेचेही चित्ती । मनी ध्यात नृसिंहसरस्वती । ऐसे असती दत्तभक्त ।।३१।। परि नसे उदरी संतान । हे केवल पूर्वप्राक्तन । सती अन्नपूर्णा मन । दु:खित तेणे सर्वकाळी ।।३२।। निपुत्रिकाचे मनी । सर्वकाळ असे टोचणी । स्त्रीमन कोमल सुमनाहुनि । कुचंबणा नित्य समाजी ।।३३।। स्त्रीसुलभ सहज भावना । व्हावे उदरी संताना । कां न प्रार्थावे श्रीदत्तदयाघना । वाडीसी जाता पौर्णिमादिनी ।।३४।। पतीस कथिले मनोगत । श्रीगुरुंसी प्रार्थावा सुत । जो होवोनि विख्यात । उद्धरेल नाव कुळाचे ।।३५।। अप्पाभटजी सांगे पत्नीते । याचना न करावी श्रीगुरुते । भोगावे निजप्राक्तनाते । न घालावा भार श्रीगुरुंसी ।।३६।। नानापरी बोधून । केले पत्नीचे समाधान । ऐशापरी चालले दिन । परी सूक्ष्म विचार अंतरी ।।३७।। आला पौर्णिमेचा दिन । केले नृसिंहवाडीसी गमन । अप्पा करिती गुरुपूजन । समाधान होय चित्ता ।।३८।। अप्पाभटजी अत्यंत भाविक । एकाग्र होता क्षणैक । श्रीदत्तपदी घेती भाक । शब्द उमटले मनामाजी ।।३९।।

आटले डोळ्यांतील पाणी, मज न दिसे चक्रपाणी
थकलो करिता विनवणी, शरणागत तुझे चरणी, गुरुमाई तुझे चरणी ।।
कां न जाणसी मनींचा भाव, पदी कां न हो देसी ठाव
आम्ही चुकलो आमुचा गाव, तू सत्वर अता धाव, गुरुमाई तुझे चरणी हा भाव ।।
अंतर्साक्षी तुजसी म्हणती, मनींचे भाव कां न कळती
जाणोनिया कां धरी अज्ञान, तू सत्वर अता धाव ।।
हिरमुसलो, झालो अति दीन, दीनदयाळ ब्रीद अता राखी
हा कंठ अनावर दाटी, डोळ्या पाणी हो दाटी ।।
मी चुकलो, वाटले आटले डोळ्यांतील पाणी,

हे न हो, जववरी मज न दिसे चक्रपाणी, जववरी मज न दिसे चक्रपाणी ।।

श्रीगुरुंचे ध्याता चरण । पाणावले नयन । झाले मन उन्मन । ध्यान लागले तत्क्षण ।।४०।। काही काळानंतर । अप्पा आले भानावर । साष्टांग नमिले श्रीदत्तचरणांवर । समाधान पावले ।।४१।। नमस्कारिता पूजेअंती । पत्नी मनीची विनति । प्रकटली सहजी मुखावरती । द्यावा सुत कुलोद्धारक ।।४२।। बोलुनि गेले मन । परि येता भान । अप्पांभटजीचे खंत मन । कैसे घडले याचन ।।४३।। विनीत कर जोडोन । केले क्षमायाचन । मोहग्रस्त वदले मन । तव इच्छा तैसे करी ।।४४।। करिता क्षमायाचन । अप्पाभटजीस समाधान । रात्रौ शांतचित्ते शयन । केले श्रीवाडीक्षेत्रासी ।।४५।। निद्रामग्न असता घडले अकल्पित । श्रीगुरुंचे दर्शन साक्षात् । मंजुळ वाणी ऐकू येत । मीचि होईन सुत ।।४६।। ऐकता समाधान अप्पाभटजींसी । झाले हर्षित मानसी । आशीर्वाद घेवोनिया ग्रामासी । आले लगबग गृहासी ।।४७।। पत्नीस कथिला वृत्तांत । नृसिंहमुनी पावला दत्त । स्वये होणार तव सुत । जाहला दृष्टांत सत्य सत्य ।।४८।। अन्नपूर्णेसी आनंद अत्यंत । आशीर्वाद होईल सत्य निश्चित । आली त्याची प्रचित । काही मास लोटता ।।४९।। गर्भधारणा खूण । प्रकट दिसे लक्षण । अप्पाभटजीअन्नपूर्णा मन । बहु आनंदले ।।५०।। जैसा गर्भाचा पिंड । तैसा डोहाळे छंद । ईश्वरी अवतार वंद्य । प्रकट तैसी लक्षणे ।।५१।। आवडे एकांत स्थान । मारुतीचे देवालयी मन । तहानभूक हारपोन । बैसे ध्यानस्थ बहुकाळ ।।५२।। माघ वद्य पंचमीदिन । शके सतराशे अठ्ठावन्न । नवमास होता पूर्ण । प्रसवली अन्नपूर्णा सुनंदन ।।५३।। हस्त नक्षत्र मकर लग्न । अवतरले श्रीदत्त दयाघन । अज्ञानांधकारी उदित जाण । रविवासरी जणू ज्ञानसूर्य ।।५४।।

जन्मला दत्तराज गुरुराज, जन्मला दत्तराज गुरुराज

नांदणीग्रामी करवीरक्षेत्री चला दर्शना आज, जन्मला दत्तराज गुरुराज ।।१।।

माघ वद्य पंचमी दिन हा, अवतरला हनुमंतचि हो आज

भावाचा जो अति भुकेला, निराकार सगुण झाला आज

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त अवधूत प्रकटला आज, जन्मला दत्तराज गुरुराज ।।२।।

कौमुदिनीसम सुवर्णकांती, रूप पाहुया आज

हास्यभरित मुखकमल पाहुनि, धन्य होऊया आज, जन्मला दत्तराज गुरुराज ।।३।।

बालक जरी ते आम्ही हो त्याचे, घेऊया कडेवरी त्या आज

क्षुधा वारितो जरी सर्वांची, प्रेमे त्या घास भरवुया आज

भावभक्तिच्या लेण्यांचा तो, लेववु त्यासी साज, जन्मला दत्तराज गुरुराज ।।४।।

सोऽहं बोध नित जो गाई, गाऊया अंगाई त्यासी हो आज

जागृत करी जो सर्व जीवांसी, पाळण्या चला निजवुया आज, जन्मला दत्तराज गुरुराज ।।५।।

वैराग्य असे रे मूळ निजबोधाचे, घ्या जाणुनि आज,

वैराग्याचे, निजबोधाचे दान मागूया आज, जन्मला दत्तराज गुरुराज ।।६।।

कृष्णदास म्हणे चिदानंद गुरु, नमुनि शरण जाऊया आज, जन्माचे सफल करी जो काज

जन्मला दत्तराज गुरुराज, जन्मला दत्तराज गुरुराज ।।७।।

पुत्रमुख पाहून । द्विजदंपतीस अतीव समाधान । लोटता द्वादश दिन । श्रीकृष्ण केले नामकरण ।।५५।। जन्मल्यापासोन । केले नाही स्तनपान । ना शब्द उच्चारण । जणू धरलेसे मौन ।।५६।। तरीही बालक तेज:पुंज । आश्चर्य करी सकल समाज । सामान्य नव्हे अनुसुयात्मज । नकळे परि कुणासी ।।५७।। सप्तवर्षी मौजीबंधन । विप्र उपदेशिती गायत्री वचन । कृष्णाचे ओंभूर्र उच्चारण । थक्क झाले ऐकता जन ।।५८।। कैसे बालकाचे मूढपण । अप्पाभटजीचा व्यर्थ नंदन । परि मायपिता जाणती खूण । असे हा ईश्वरी अवतार ।।५९।। जैसे बाल नृसिंहमुनि । तैसेचि हे श्रीकृष्णमुनि । परी ते वदले वेद मौजीबंधनी । कृष्णाचे मात्र असंबद्ध बोल ।।६०।। क्वचितचि करिती अल्पाहार । सवंगडी मेळवुनि खेळती अपार । म्हणे व्हा भवपार । आहोत आम्ही तारणहार ।।६१।। वाटती स्वये प्रसाद बालका । म्हणती घ्या पंढरीचा बुक्का । पुडी उघडिता जन आश्चर्ये थक्का । म्हणती हा केवळ सिद्धबालक! ।।६२।। मंगसोळीचा म्हाळसापति खंडेराव । जोशीयांचा कुलदेव । श्रीकृष्ण दर्शना घेती धाव । वारंवार मंगसोळीसी ।।६३।। जन्मसिद्ध श्रीकृष्ण । अवतारकार्य जाणून । मायपित्यांचा निरोप घेऊन । प्रयाण करती गुरुदर्शना ।।६४।। श्रीस्वामी समर्थ महाराज । वटवृक्षातळी सिद्धराज । करती लीला भक्तकाज । अक्कलकोटी प्रसिद्ध । ।।६५।।

अक्कलकोटी स्वामी समर्थ, देखिला ना दुजा समर्थ

दत्ताचा अवतारचि केवळ, योगिराज श्री स्वामी समर्थ ।।

गाणगापुरीचा नृसिंहमुनी, म्हणुनि नाव नृसिंहभान

कधीही ना कुणी पाहिले, असता यांना देहभान ।।

वटवृक्षातळी बैठक त्यांची, भक्त दर्शना जाती फार

प्रत्येकासी दाखविती ते, वेगवेगळे चमत्कार ।।

बाह्य कठोर वर्तन दर्शविती, परि अंतर त्यांचे प्रेमळ फार

भक्तां उद्धरण्या सदैव लक्षिती, हित हो त्यांचे वारंवार ।।

कृपाशीर्वाद लाभता होते, जीवन नौका सहजी पार

पवित्र चरणांवर त्यां मी नमितो, करुनी शिरसाष्टांग नमस्कार ।।

श्रीकृष्ण निघाले अक्कलकोटासी । श्रीस्वामी समर्थ भेटीसी । त्रिकाळज्ञानी श्रीस्वामींसी । उतावीळ भेटीसी कृष्णाच्या ।।६६।। 'येणार, येणार, कृष्णा येणार!' । श्रीस्वामीमुखी नित्य उद्गार । श्रीकृष्ण होता दृग्गोचर । श्रीस्वामी कवटाळीती सत्वर ।।६७।। हात धरोनि

त्वरित धावती । सांडोनिया जनसंगति । बैसले जावोनि एकांती । नाकळे सिद्धभेटी इतरांसी ।।६८।। सप्तदिन एकांती क्रमुनि । दोघे आले परतोनि । श्रीगुरुकृष्ण अभिधानी । गौरविले श्रीसमर्थांनी ।।६९।। 'चुरमा लड्डु आज खिलाना' । श्रीस्वामी फर्मावती भक्तजना । स्वये भरविती श्रीगुरुकृष्णा । पहा कैसे प्रेम! ।।७०।।

नजरेतुनि त्या प्रेमाची होते मजवरी पखरण

गुरुरायाची प्रभुरायाची होते मजसी आठवण

गुरुदेवांच्या रुपाची झाली मनी साठवण

गुरुप्रेमाच्या भावाची होते हृदयी उधळण

गुरुमंत्राच्या स्वरांची होते अंतरी घणघण

गुरुरायाच्या स्मरणी जगाचे होते विस्मरण

कृष्णदास हा गुरुरायासी स्मरतो निशिदिनी प्रतिक्षण ।।

ऐसे क्रमिता काही दिन । गाणगापुराहुनि आला ब्राह्मण । श्रीस्वामीसमर्थ असती कोण । पृच्छा करीत सर्वांसी ।।७१।। अंगे व्यापिला कुष्ठेसी । तप करिता गाणगापुरासी । जाहला दृष्टांत भेटण्यासी । अक्कलकोटी समर्थांसी ।।७२।। अक्कलकोटी राहता काही दिन । श्रीसमर्थ करती आज्ञापन । श्रीगुरुकृष्णासवे जाऊन । करावी सेवा मनोभावे ।।७३।। करवीर श्रीक्षेत्र पवित्र । श्रीमहालक्ष्मी वास नित्य । असे नियोजित कार्यक्षेत्र । श्रीगुरुकृष्णासी सर्व विदित ।।७४।। करवीरी निघाले श्रीगुरुकृष्ण । सवे असे कुष्ठी ब्राह्मण । वास राममंदिर पटांगण । स्थान अंबाबाई निकट ।।७५।। मार्गी पाहिले चमत्कार । ब्राह्मणा जडली श्रद्धा अपार । श्रीगुरुकृष्ण तोषता सत्वर । बाधा निरसन सहजीच ।।७६।। ब्राह्मण राहीला श्रीस्वामींसंगे । सेवाधर्म बाणला अंगे । भक्तिभावे मनी रंगे । श्रीगुरुसेवे पातक भंगे ।।७७।। देहपतनी आत्मे अतृप्त । विचरती भूतयोनीत । इच्छा मनी बाळगत । त्राता कुणीतरी भेटावा ।।७८।। दत्तात्रेय श्रीगुरुवर । मोक्षदाता एकचि सत्वर । भेटी होण्या संचार । करती देही दुर्बळांच्या ।।७९।। पीडिता त्यांसी अपार । तप-व्रते आचरिती घोर । संत-सत्पुरुषे घ्यावा कैवार । म्हणोनि धावती दर्शनासी ।।८०।। ऐसी एक बाधित ललना । आली राममंदिरा दर्शना । पाहता श्रीगुरुकृष्णा । संचारले समंध ।।८१।। श्रीगुरुकृष्ण दत्तदर्शनी । जो असे मोक्षदानी । अतृप्त आत्म्या मोक्ष लाभुनि । सुटली त्वरित ललना ।।८२।। पाहता हा चमत्कार । आश्चर्यचकित जन अपार । सर्वामुखी होत गजर । श्रीगुरु कृष्ण सरस्वती दत्त । ।।८३।। श्रीस्वामी किर्ति इये परी । पसरली करवीर नगरी । दर्शना लोटती जन अपारी । श्रीकृष्णसरस्वती स्वामींच्या ।।८४।। ऐसे जाता काही दिन । ब्राह्मणसेवे तोषले श्रीस्वामींचे मन । सांगती पातला कृपाक्षण । न करावा उशीर ।।८५।। करी पंचगंगास्नान । ठेवोनि आमुचे स्मरण । तेणे रोग निरसन । धाव धाव रे सत्वर ।।८६।। स्नान करता चमत्कार । कांति पूर्ववत सुंदर । हर्षे दाटोनि

अंतर । विप्रे गाठले राममंदिर ।।८७।। फडणवीस नामे भक्तगृहास । श्रीस्वामी आधीच गाठीती खास । भेट ना घडता विप्र उदास । बैसला खिन्न राममंदिरी ।।८८।। हर्ष-शोके भरले अंतर । नयन लक्षिती श्रीगुरुवर । अंती नयनी भरले नीर । विप्र करी प्रार्थना ।।८९।।

मज मनीची व्यथा ही सांगू कुणा, नयनांतील आसू मी दावू कुणा
दावील कुणी का हो मम नयना, सद्गुरुंचा मज हो ठावठिकाणा
मन दाटुनि येते क्षणोक्षणा, कुणी दाविल का हो मम राणा
मज वाचे वाटे गावे गुणा, दावा हो दावा त्याच्या खुणा
भावभक्तिसी जरी मी उणा, धरियेले धावुनि तव चरणा
कृष्णदास हा काकुळती, सद्गुरुनाथा तव शरणा ।।

देवोनिया स्वप्नदृष्टांतास । श्रीस्वामींनी पाठविले निजगृहास । काही दिन केला वास । गृही भक्त फडणवीसाच्या ।।९०।। लीला अनाकलनीय करीत । नित्य बालकभाव दावित । मुखी भरविल्याविना ना खात । देहधर्म विधी बैसल्या जागीच ।।९१।। फडणवीस भार्या तेणे क्रोधित । पतीसी नित्य विनवित । ह्या साधूचे लक्षण विपरीत । नसावे हे आपुले भुवनी ।।९२।। परी राममंदिरी चमत्कार दृग्गोचर । तेणे फडणवीसा श्रीस्वामीनिष्ठा दृढतर । हा केवळ दत्तावतार । नसे संशय तिळमात्र ।।९३।। बालोन्मत्तपिशाच वृत्ति । श्रीदत्तगुरु अंगिकारती । कुटील दुर्जन स्वार्थी मति । ठेवावया अतिदूर ।।९४।। श्रीस्वामी असता गृही । वदती अशुभ काळ आला पाही । फडणवीसपुत्र ज्वरग्रस्त होई । अंती पावला पंचत्व ।।९५।। सिद्ध जाणती कालगती । परि प्राक्तना ना बदलती । मोक्षसुखा जेणे आचवती । अंतरीचे भक्तजन ।।९६।। फडणवीसाचे सेवेसी तोषोनि । अर्पिला आशीर्वाद श्रीस्वामींनी । अपत्ये चार देवोनि । म्हणती मज जाणे होय ।।९७।। श्रीदत्त असता संगति । परीक्षा वारंवार कठीण घेती । निरोप घेता मात्र अंती अर्पिती । आशीर्वाद जे इच्छिले मन ।।९८।। महिसाळकर दुजा भक्त । श्रीस्वामींसी नित्य विनवित । येवोनिया मम गृहात । सेवा द्यावी मजसीही ।।९९।। फडणवीसाचा निरोप घेत । श्रीस्वामी जाती महिसाळकरासमवेत । वाटे शिरती कुंभार गल्लीत । शिर्केगृही मायेच्या ।।१००।।

अवधूताची झोळी फिरे कोल्हापूरी, भिक्षा मागतसे भक्तांच्या घरी
उभा राहुनि द्वारी, गजर करी, 'गुरुदेव दत्त', कानी पडे आरोळी
मीपण अर्पिता झोळी, संतोष अवधूता अंतरी,
साष्टांग नमस्कारिता, आशीर्वाद उभवी करी
कृपा खूण देता अंतरी, भान अवधूत उठे अंतरी,
दत्तध्यास लागोनी, ध्यानी मनी अवधूत उरी ।।

द्वाराबाहेर उभे राहती । 'माई भिक्षा द्यावी' वदती । गृहस्वामिनी ताराबाई येती । अतिथि कोण पहाया ।।१०१।। पाहता समोरी ब्राह्मण । भ्रांत ताराबाईचे मन । ब्राह्मणासी कैसे शूद्रान्न । द्यावे तरी भिक्षा ।।१०२।। भ्रांती पडता तारामनी । श्रीस्वामी हसती मनी । कालांतरे पटेल खूणी । जाती महिसाळकर गृहासी ।।१०३।। ताराबाई गणिका जरी । दत्तभक्ती मनी अपारी । पौर्णिमेसी करी श्रीनृसिंहवाडी वारी । उदरपीडानाशार्थ ।।१०४।। देहदु:ख अति प्रबळ । जीवाची होतसे तळमळ । भान नुरवी सकळ । इहभोग संसारसुख ।।१०५।। तैसी अवस्था ताराबाईची । करी विनवणी श्रीदत्तांची । सरो व्यथा उदरपीडेची । नातरी मरण देई मज ।।१०६।। करुणासागर श्रीदत्त भक्तांकित । जाळीतसे कर्मे अनंत । तयासी कां अशक्य होत । उदरपीडा निवारण ।।१०७।। पुढे जाता वाडीक्षेत्रास । श्रीदत्तदृष्टांत ताराबाईस । आलो होतो तुझिये गृहास । परि त्वा धाडिले विन्मुख ।।१०८।। तव भक्तिसी होवोनि प्रसन्न । मीच केले आगमन । महिसाळग्रामी सत्वर जाऊन । आणावे श्रीस्वामींसी ।।१०९।। श्रीगुरु कृष्णसरस्वती खचित । असे साक्षात् श्रीगुरुदत्त । सेवा करी तयांची नित्य । तेणे तुज प्राप्त सर्वसौख्य ।।११०।। ऐकता ताराबाई आनंदित । गेली महिसाळग्रामी त्वरित । श्रीस्वामीचरणी साष्टांग नमित । म्हणे नोळखले करा क्षमा ।।१११।। श्रीस्वामी धरोनि तियेचा हात । बैसले त्वरित रथात । प्रवेशता निजगृहात । ताराबाईस हर्ष मावेना उदरात ।।११२।। अनंत जन्मींचे फळले तप । घरा आला दत्त मायबाप । मम पुण्या नसे माप । हरेल सहजी भवताप ।।११३।।

करवीरी आले श्री कृष्ण सरस्वती,
गणिकागृही वास केला रुपे त्या दत्त यति
सामर्थ्य इतुके महान वर्णाया थोकडी मति,
कृपेने उद्धरिले कितीएक त्याची न गणती
बालरुपी वेश धरिला केल्या चेष्टा नाना अति,
गुप्तरुपे जनात वागुनि कळू न दिली महति
श्रीपाद श्रीवल्लभ पुढे झाले नृसिंह सरस्वती,
कृष्णदासा तेचि गुरु, अवतरले श्री कृष्ण सरस्वती ।।

ताराबाई नित्य सेवा करी । उदरपीडा जाहली दुरी । माता भीमाबाई मात्र अंतरी । नाखूष तारा कन्येवरी ।।११४।। सोडोनिया कुळाचारी । मूढाभजनी लागली नारी । दूषणे देई नानापरी । तारेसमवेत श्रीस्वामींसीही ।।११५।। ताराबाई समजावी नित्य । परी भीमाबाई मोहग्रस्त । शेवटी जाहलिया अतित्रस्त । उपाय योजिती श्रीस्वामी ।।११६।। भीमाबाईने एके दिनी । श्रीस्वामींसी ठेविले शयनगृही कोंडुनि । कालांतरे पाहता उघडुनि । श्रीस्वामी न दिसती अंतरी ।।११७।। भीमाबाई मूर्च्छित द्वारी । श्रीस्वामी दिसती औदुंबर वृक्षावरी । देखोनिया अद्भुतचि परी । भीमाबाई आली ताळ्यावरी ।।११८।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, हनुमंतचि हा करवीरी वसत
पुच्छ दावुनी खूण पटवत, हनुमंतासम औदुंबरी उडत
रामायणीच्या लीला अमित, सप्तसागर सामर्थ्ये लंघित
भवसागर मग तुच्छ तो गमत, कृष्णदास सहजी तो तरत ।।

चमत्कार तेथे जन नमित । हीच अखिल जगाची रीत । भीमाबाईसी सद्भाव उपजत । लागली श्रीस्वामीभजनासी ।।११९।। पुत्र असे श्रीस्वामीभक्त । तैसी माताही जाहली भक्त । पाहुनिया सौख्य अमित । जाहले ताराबाईसी ।।१२०।।

दत्त ध्याऊ दत्त गाऊ, दत्त चरणी नत हे होऊ ।
तेणे सर्व सुख हे पावू, आशीर्वच घेऊ अन् धन्य होऊ
निवास करी जो गिरनारी, ज्यासी सम नर आणि नारी ।
आलासे तो करवीरी, दर्शना लोक दाटले भारी
तो हा बैसलासे सिंहासनावरी ।
भक्त आरती करती सारी, पाववितो सर्वा निर्वाणी
नमन करित मी त्याचे चरणी, नमन करित मी त्याचे चरणी ।।

ईश्वरी अवतार । सवे आणितो लीलासहचर । तैसे आले भक्त अपार । श्रीस्वामींपासी हळूहळू ।।१२१।। कृष्णा लाड प्रथमभक्त । जातसे बाबुजमाल दर्ग्यात । पीर होऊनि साक्षात् । कथिले जा कुंभारगल्लीत दत्तपदी ।।१२२।। येता श्रीस्वामींपासी । खूण पटविती लाडासी । शरण आला चरणांसी । जाहला सेवक प्रथम तो ।।१२३।।

एकनाथांचा जो का नाथ, करवीरी हा तोचि नाथ
जेणे केले आम्हा सनाथ, नवनाथांचाही तो हा नाथ
त्याची असता आम्हा साथ, का हो समजू आम्ही अनाथ
अवधूतवेशे तो हा सजला, उपदेशिले त्याने मजला
सोऽहं शब्दे तोचि गर्जला, जीवभाव तत्क्षणीच हरपला! ।।

तद्नंतर आला दळवी वासुदेव । तारागृहानजिक ठाव । क्षणोक्षणी होतसे क्रोधोद्भव । परी सावरी स्वत:सी ।।१२४।। श्रीस्वामीचरणी येता । वासुदेवा वाटे अत्यंत पूज्यता । चित्त अति कळवळता । अंतरी उमटे प्रार्थना ।।१२५।।

अरे देवा, कां रे गोवियेले संसारी सर्वां,
वरी म्हणसी बांधिला, जो तो आपुलाले कर्मा
हासितोसी कसे मंद, पाहता नाना दु:ख क्लेश जीवा,
इतुकी कठोर माय देखिलि ना केव्हा
व्यापातुनि न मिळे क्षणभरी उसंत या जीवा,
कसे घेऊ नाम तुझे सांग बा रे देवा

पदी पदी गुंतता वाटे साधुसंतांचा हेवा,
वाटे अखंड हेचि की मज कां न मिळे तो मेवा,
काय तुझी लीला, दिला असे सर्वां, परि गुप्त हा ठेवा
विनवितो काकुळति मी, सत्वर उघडी हा ठेवा, देवा अता उघडी हा ठेवा ।।

श्रीस्वामी सांगती त्यासी । शेंडी देसी का आम्हासी । उमजता अर्थ अंतरासी । संन्यासग्रहण वासुदेवे ।।१२६।। कृष्णा लाडासही गोडी । घेतला संन्यास आवडी । वासु-कृष्णा संन्यासी जोडी । श्रीस्वामीचरणी राहिली ।।१२७।। रामदासबोवा गाणगापुरी । आत्मसाधनी दक्ष कठोरी । निंबपर्णे भक्षून करी । तप अति खडतर ।।१२८।। श्रीगुरुदर्शना जीव कासावीस । नीर लोटे नयनांस । भेटीस उतावीळ जीवास । भाव उमटे ह्रदयात ।।१२९।।

येरे येरे, गुरुदेवा येऽ रेऽ
भाव मनींचा जाणुनी घे रे, गुरुदेवा येऽ रेऽ
आर्त मनींची जाणुनि कळवळ, गुरुदेवा येऽ रेऽ
भक्त मनींचा ध्यास जाणुनि, गुरुदेवा येऽ रेऽ
पाडस मी तो फोडी हंबरडा, माय कामधेनू तू धावत येऽ रेऽ
कृष्णदास आळवितो तुजसी, धावुनिया येऽ रेऽ
येरे येरे, गुरुदेवा येऽ रेऽ ।।

तळमळीची पराकाष्ठा होत । प्रसन्न जाहला कृपावंत । रामदासबोवासी देई दृष्टांत । आज्ञापि गाठण्या कुंभारगल्ली ।।१३०।। करवीरी घेता श्रीस्वामीदर्शन । तोषले रामदासबुवाचे मन । म्हणे हेचि मम आश्रयस्थान । ना सोडू श्रीचरण कदाकाळी ।।१३१।। सुवर्णभूषण हरती चोर । त्रस्त रामभाऊ फारिक मुरगुडकर । आला शोधित दत्तावतार । सुवर्ण पुन:प्राप्तीसी ।।१३२।। श्रीस्वामीकृपा होता । गृहीच भूषण आले हाता । तेणे श्रीचरणी भाव जडता । जाहला शिष्य श्रीस्वामींचा ।।१३३।। करवीरी म्हादबा विणकर । बलभीमाचा भक्त कट्टर । द्विमुखी मारुती मंदिर । तेथ करी उपासना ।।१३४।।

।। जय हनुमान ।।

हनुमंता हनुमंता, बलभीमा हनुमंता,
वायुपुत्र हनुमंता, अंजनीसुत हनुमंता
शक्ति दे बुद्धि दे, तुजसम मज हनुमंता,
भक्ति ज्ञान दे वैराग्य, तुजसम मज हनुमंता
विनय दे सुशीलता, तुजसम मज हनुमंता,
पवित्र नम्र वाचा दे, तुजसम मज हनुमंता
भजनाप्रति प्रेम दे, तुजसम मज हनुमंता,

स्वामीपदी तुजसम दे, दासभाव मज हनुमंता
जाण दे ओळखण्या, स्वामींच्या मनोगता,
दे चपलता तत्परता, तुजसम मज हनुमंता
स्वामीसेवा करण्यासी, तुजसम मज हनुमंता,
आशीर्वाद दे मजसी, हे कृपाळू हनुमंता
स्वामी वास ह्रदयी अखंड, तुजसम हो हनुमंता,
हनुमंता हनुमंता, चिरंजीव हनुमंता,
कवच करुनी रक्षी नित्य, मजसी हे हनुमंता
कृष्णदास प्रार्थितसे, रामभक्त हनुमंता,
दर्शन दे आत्मरुपी, मजसी नित्य हनुमंता
।। जय श्रीराम ।।

देवालयी चाले कथाकीर्तन । नित्य करता श्रवण । श्रवणी पडता श्रीगुरुमहिमान । वाटे आपणासही व्हावा गुरु ।।१३५।। कोण असे मम गुरुदेव । कैसा कळेल मजसी ठाव । म्हादबासी अनावर होय भाव । सद्गदित करी प्रार्थना ।।१३६।।

का रे भेटीनासी मजला, का रे हा दुरावा
अंतरी तू राहसी मज परी, वियोग का व्हावा
गलबल गलबल घोर, लागला हा जीवा
ह्रदयीचाच ठेवा मिळण्या, तगमग जीवा
अंतर्यामी राहसी परी का, अंतरलास देवा
कृष्णदास अंतरी तुझा, करितसे धावा ।।

कळता श्रीस्वामींचे महिमान । आला म्हादबा घ्याया दर्शन । श्रीस्वामीआशिष लाभून । जाहला तोही श्रीस्वामीशिष्य ।।१३७।। वेणीमाधव कोकणप्रांती । नवससायासे तयाचि प्राप्ति । मायबापे अर्पिला देवाप्रति । ज्योतिषविद्या पारंगत ।।१३८।। स्वप्नी सांगे केदारनाथ । उठ लवलाही साधी स्वहित । करवीरी तव सद्गरुनाथ । जाई जाई दर्शनासी ।।१३९।। श्रीस्वामी हसुनि पुसिती कां जी । सद्गुरु कोठे पहाता भटजी । खूण पटली मनामाजी । माधव शरण श्रीस्वामींसी ।।१४०।।

भजूनिया अवधूतासी, जाणूया अवधूताला
कृपाशीर्वादे त्याच्या, जाणू अवधूत स्थितीला
लाधू तीव्र वैराग्याला, अंतरीच्या अवधूत स्थितीला
अनुभव त्याचा कृपे घेऊ, जाणू आत्मस्थितीला
कृपाळू तो दत्त अवधूत, वसतसे करवीराला
कृष्ण सरस्वती नामे, जाणती त्या दत्त यतीला

शरण जाऊनि भजता भावे, उपदेश करी कृष्णदासाला ।।

श्रीस्वामींस प्रिय शिष्यगणी अत्यंत । म्हणती माझी आवडती वेणी । जाहले प्रसिद्ध मालवणी । तेचि रांगोळी महाराज ।।१४१।। धारवाडचा नामदेव चव्हाण । श्रीस्वामीआज्ञा करी पालन । संसाराची होळी करोन । जाहलासे श्रीस्वामींसी अतिप्रिय ।।१४२।। श्रीस्वामीकृपे नामदेवासी । एकशेतीस वर्षे आयुर्मानासी । नामदेव उपदेशिती जनांसी । 'जयाची तृष्णा निमाली, तयासी जाहली सर्व प्राप्ती' ।।१४३।। जैसी उक्ति तैसी कृति । नामदेव भक्त आदर्श अति । नुरली त्याच्या भाग्या मिति । श्रीगुरुआज्ञापालने ।।१४४।। धारवाडकर बंधु विष्णु-दत्ता । गाणगापुरी तप करिता । द्वादशवर्षाती पावती दृष्टांता । जावे आता करवीरासी ।।१४५।। पर्णक्रीडा आवडे आम्हासी । परि ना कथिले नाम वा स्थानासी । कैसे शोधावे श्रीगुरुसी । प्रश्न मनी विष्णु-दत्तांच्या ।।१४६।। विष्णु-दत्ता आले करवीरी । शोधित फिरती सारी नगरी । प्रार्थना उमटे नित्य अंतरी । दर्शन द्यावे गुरुवरा ।।१४७।।

सद्गुरूनाथा मज करु नका उदास, तव पायी धरिलासे सर्व हा विश्वास
द्यावे मजसी आपण त्वरित दर्शनास, सुखवा रुपे तव मज भुकेल्या नयनास
तृषार्त चातका जेवी जीवनाची आस, ध्यातो तुजसी तेवी हा कृष्णदास ।।

एके दिनी वृक्षावरती । श्रीस्वामी पर्णक्रीडा करता दिसती । जवळी येता खूण पटविती । पर्णक्रीडा प्रिय आम्हासी ।।१४८।। ऐकता आनंदित होय मानस । बंधु जाहले श्रीस्वामीदास । लाभला तयांसी आनंद खास । करवीरी राहती सेवारत ।।१४९।। अक्कलकोटस्थ महादेवभट । एकनिष्ठ श्रीसमर्थभक्त । चौदा वर्षे सहवासात । दंग श्रीस्वामीस्मरणी ।।१५०।।

स्वामी स्वामी स्वामी, हा उपाय अति नामी
भवदु:खा ह्या साऱ्या, करिण्या त्वरितचि निकामी ।।
स्वामी असे तो त्रैलोक्याचा, दंग भक्तांच्या कामी
सर्व भार तो त्यावरी टाकुनि, राहूया विश्रामी ।।
भवरोगाचा कुशल वैदय तो, आत्यंतिक नामी
भवदु:खे अन् ताप हराया, भजा अखंड मनी ।।
उग्र दावितो अवतार तरी, प्रेमळ अत्यंत तो मनी
कृपा करिता हाती धरिता, रहा निश्चिंत मनी ।।
गुरुदत्ताचा अवतार तो हा, नाम नृसिंह मुनी
अक्कलकोटीचा हा गुरुराय, माझ्या अखंड ध्यानीमनी ।।

समाधिस्थ होता समर्थमुनी । चैन न महादेवा मनी । ध्यास घेतला अखंड मनी । श्रीस्वामीसमर्थ दर्शनाचा ।।१५१।। तयासी जाहला दृष्टांत । जावे आता करवीरात ।

वसतसो आम्ही तेथ सत्य । हनुमंतरुपे ।।१५२।। श्रीकृष्ण सरस्वती स्वामी दत्त । माझाचि अंश नामी खचित । शरण जावे तुम्ही त्वरित । समर्थे भटा कथिली मात ।।१५३।। श्रीस्वामीदर्शना केली त्वरा । महादेव आला करवीरा । लाभुनिया आशिष अभयकरा । मठी राहिला सेवारत ।।१५४।। परि ध्यास श्रीसमर्थरुपाचा । वियोग जाळीतसे नित्याचा । तेणे उदास गमुनि साचा । समर्थांसी विनवितसे ।।१५५।।

अक्कलकोट स्वामीराया, नमन माझे तुझिया पाया ।
अवधूत दिगंबर, अवतार रुपे तुझिया ।।
कामक्रोध अनिवार, दवडिसी निमिषभरा या ।
रुप तुझे मनोहर, पुष्प वर्ण गौर काया ।।
दर्शन दे त्वरित, निववी नेत्र लवकरी या ।
कर्ण आसुसले आता, वाणी मंजुळ ऐकावया ।।
आजानुबाहू देह हस्त, उभवी थोर कृपा कराया ।
पुरवि माझी आस त्वरित, दर्शना ये धावुनिया ।।
शब्द मुखासी न उमटे, गळा येता दाटुनिया ।
कृष्णदास विनवितो, देहभान विसरुनिया ।।
कृपा करा कृपा करा, श्री समर्थ स्वामीराया ।
नको पाहु अंत असा, जाण भावा मनाचिया ।।
येरे येरे धावुनिया, श्री समर्थ स्वामीराया ।
येरे येरे धावुनिया, श्री समर्थ स्वामीराया ।।

अंतर्साक्षी श्रीसमर्थमुनि । सर्व जाणती भाव मनी । महादेवभटा एके दिनी । पाचारिले शयनगृही ।।१५६।। श्रीस्वामीचरणी ठेवोनि शीर । महादेवभट पाहती वर । आश्चर्य दिसे मंचकावर । दिसती साक्षात् नृसिंहभान ।।१५७।। महादेवा पुसिले श्रीस्वामींनी । हनुमंतदर्शन इच्छा मनी । झर्र्दिशी मागे वळुनि । दाविले पुच्छ मारुतीचे ।।१५८।। पाहुनिया अपूर्व लीला । महादेव समाधान पावला । अभेद जाणले खुणेला । श्रीसमर्थ तेचि श्रीकृष्णसरस्वती ।।१५९।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, अक्कलकोटे धाडिला करवीरात
त्यासी ध्यातो मी मनात, व्यापुनि बैसला मम चित्तात
तेणे अखंड ध्यान मनात, कृष्णदासा निज कृपा वर्षित ।।

महादेवभट करी श्रीस्वामी प्रार्थना । ध्यानी घ्या मम याचना । तुजविन त्राता दुजा ना । आलो शरण तव पावन चरणा ।।१६०।।

करुणाकर श्री कृष्ण यतिवर, अक्कलकोटीचा तू गुरुवर,
निवासक्षेत्र हो करवीर, अवधूताचा तू अवतार, प्रार्थी मी तुजसी वारंवार ।।

कामक्रोधे छळियेले फार, न दिसे काही उपाव सत्वर,
ऐकोनि कीर्ति तू करुणाकर, प्रार्थी मी तुजसी वारंवार ।।
चित्त ही ना स्थिर निमिषभर, नाम ही न ये तुझे मुखावर,
संसारी या गांजियेले फार, प्रार्थी मी तुजसी वारंवार ।।
ध्यानी बैसता विविध विचार, मना गांजिति वारंवार,
आयुः ही सरते अति भरभर, जाणुनि मना बेचैनि फार,
प्रार्थी मी तुजसी वारंवार ।।
परमार्थ करता शीणलो फार, मनी अखंड हाचि विचार,
कधी दिसती मज चरण सुकुमार,
घेउनिया त्यांचा आधार, तरीन मी हा दुर्घट संसार,
प्रार्थी मी तुजसी वारंवार ।।

एकत्वाच्या मिळता खुणा । सरली महादेवाची वियोगभावना । श्रीस्वामीसंगति कालक्रमणा । करितसे मठी करवीरी ।।१६१।। शिदनोर्लीकर हरिपंत । कागलग्रामी असे वसत । शरण जाहला अल्पकाळात । श्रीस्वामीचरणी सुखे ।।१६२।। बाळकृष्ण राशिवडेकर । मनी मृत्यूचे भय अपार । शोधी सत्पुरुष आधार । अल्पायुषी जाणता ।।१६३।। श्रीस्वामी म्हणती त्याला । बाळकू भ्याला! बाळकू भ्याला! । देहनाश वृथा खेद मानला । ना कुणी अमर येथे ।।१६४।। श्रीस्वामीचरणी विश्वास जडला । नित्य दर्शना येऊ लागला । हा खुळ्याच्या नादी लागला । गृहीचे सर्व बोलती कटू ।।१६५।। परि बाळकृष्णाचा विश्वास अढळ । तेणे जाहले कार्य सफळ । विरोध आप्तांचा मावळला सकळ । सर्वही जाहले श्रीस्वामीभक्त ।।१६६।।

दत्ता अवधूताऽऽ दत्ता अवधूताऽऽ
निशिदिनी नाम तुझे मी गाता, निशिदिनी नाम तुझे मी गाता
नुरली भीती अन् चिंता, नुरली भीती अन् चिंता
दत्ता अवधूताऽऽ दत्ता अवधूताऽऽ ।।
तू प्रेमळ माता जनिता, वाही सकळ मम चिंता
दत्ता अवधूताऽऽ दत्ता अवधूताऽऽ ।।
नाम तुझे मी गाता, रमलो निशिदिनी ताता
दत्ता अवधूताऽऽ दत्ता अवधूताऽऽ ।।
कृष्णदास नाम गाता, व्यापिले सकळ त्या चित्ता
दत्ता अवधूताऽऽ दत्ता अवधूताऽऽ ।।

श्रीस्वामी निजपादुका देवोनि । सांगती षोडशोपचार अर्पुनि । करी नित्यपूजन प्रतिदिनी । वांच्छापूर्ति होईल ।।१६७।।

गुरुंच्या ह्या पादुका, ध्याता आनंद मनी निका
तन मन धन वाहुनि त्यावरी, निश्चिंत ना हो का
रक्षण मग तुज करितसे तो, दिनरात फुका
जाणुनि हे मग कां ना अपुला, भार त्यावरी टाका
प्रणिपातुनि ठेवी त्यावरी डोई, भक्तिभावे जो का
कृपाबळे त्या उद्धरुनि जाई, भवसंसार हा निका ।।

मरण कां कधी कुणा टळले । बाळकृष्णे मनी जाणिले । खंत भय पूर्ण लोपले । मृत्यूभयापहारी श्रीसद्गुरु ।।१६८।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, कृष्णासम वेधितो चित्त
ठाव न उरतो चित्ता अनित्य, स्वरूप दर्शनी गुंतवी नित्य
माया हतबल पहातसे फक्त, कृष्णदासा स्पर्शावया न धजत
स्वामींच्या या सामर्थ्या अमित, कृष्णदास लोटांगणी नित्य ।।

अल्पकाळेचि पुढे जाण । पंचत्व पावला बाळकृष्ण । पुढे पावला जनन । भगिनी पोटी ।।१६९।। त्या बालकाचा लळा श्रीस्वामींसी । वेळेवेळा जाती गृहासी । कवतुक करुनि नाना परीसी । उचलिती निज कडेवरी ।।१७०।। म्हणती बाळकृष्ण आमुचा । मनी छंद घेतला त्याचा । ठरला अतिअल्प आयुष्याचा । परि दिधला मोक्ष स्वसानिद्धी ।।१७१।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, धरिले मजसी निजकृपाकरात
गोंजारितो मज बाळ मी खेळतो करांत, मातेपरी सांभाळितो अखंडित
तोचि लक्षितो साधनी हित, कृष्णदास बाळ लडिवाळपणे खेळत ।।

ज्ञानोबांसम समाधिस्थ सत्पुरुष । देती कां सदेह दर्शनास । ऐसा शंकित श्रीस्वामी दर्शनास । आला एक विप्रबटु ।।१७२।। श्रीस्वामी कथिती त्यास । आळंदीस जाता होय निरास । करवीराहुनि क्षेत्र आळंदीस । गेला तात्काळ विप्रबटू । ।।१७३।। वास करिता तेथे मास । मनी दर्शनाची आस । अखंड मनी तोचि ध्यास । प्रार्थना करी ज्ञानोबांस ।।१७४।।

माऊली दर्शन देई मज आज, माऊली प्रगट होई तू आज
क्षणभरी सोडी समाधी आज, क्षणभरी येई बाहेरी आज
पुरवि मानस मनीचा आज, देई सदेह दर्शन मज आज
बाळ हट्ट हा माऊली माझा, पुरवि तू गे आज
दर्शन तव नयना इच्छितो, मनी दुजी न इच्छा आज
कृष्णदास आळंदी आज, येऊनि प्रार्थितो माऊली तुज
रुप दावुनी तव सुकुमार, यात्रा सफल करी गे आज
माऊली दर्शन देई मज आज, माऊली प्रगट होई तू आज ।।

तळमळ जाता पराकोटीस । प्रसन्न होती श्रीज्ञानेश । लाधला सदेह दर्शनास । ज्ञानोबांचा उपदेश ।।१७५।। कुंभारगल्लीतील सत्पुरुष । हनुमंताचा अवतार खास । जावे भावे शरण तयास । ऐसा आला शिष्य व्यास ।।१७६।। मांडिले पात्र घालुनिया रांगोळी । बैसा सेवण्यास पक्वान्ने पोळी । बोलती बोली ऐसी आगळी । अर्थबोध होय केवल व्यासा ।।१७७।। सर्व शिष्यांत लहान । शेंडेफळ ऐसे संबोधन । श्रीस्वामी करिती प्रीतिकरून । या व्यासशिष्यासी ।।१७८।। श्रीस्वामींच्या पश्चात् । निजबोधमठी निर्माणकार्यात । जयाचा मोलाचा वाटा असत । ऐसा सेवकभक्त व्यास ।।१७९।। ऐसे लीलासहचर । जमले नगरी करवीर । श्रीस्वामीसंगे आनंद अपार । तारागृह जणू गोकुळ ।।१८०।।

गुरुराज माझा कृष्ण सरस्वती, सिंहासनीस्थित शिष्य सभोवती
कृष्णा लाड वासुदेव द्वाड, म्हादबासी ना देहाची चाड
गाणगग्रामीचा बोवा रामदास, दत्ताने त्यास पाठविले खास
वेणीमाधवा दुजा न ध्यास, निजबोधमठीचा कर्ता व्यास
तात्यांनी पाठविले महादेव भटास, विष्णुअण्णा लिहिती स्वामी इतिहास
नामदेव हा आगळाची दास, प्रपंची असे सर्वदा उदास
हरीभाऊ, रामभाऊ, गणपती, बाळकू, अनंत, करवीरी गणती न त्यास
मुजुमदारांच्या चरित्रास आशीर्वच हे खास, वाचिता होई मायेचा निरास
तारा आईच्या पुण्या न गणती, बांधीला हनुमंत वैराग्यमठी
मनोभावे माझा नमस्कार खास, अवधूतास आणले करवीरक्षेत्रास ।।

ऐसे शिष्यमंडळ तारागृही । नित्य सेवारत राही । तिन्ही त्रिकाळ आरति होई । जन पाहती आनंदे ।।१८१।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, सिंहासनी बैसती शिष्यांसहित
छत्र धरिती अन् चवऱ्या ढाळीत, स्वामींच्या त्या लीला पहात
दर्शना समोर भक्त अनंत, कृष्णदास चरण चुरीत ।।

शुभ्र अंगरखा, टोपी हरित । कस्तुरी टिळा ललाटी शोभत । मौक्तिकमाळा गळा रुळत । छाटी भगवी खांद्यावरी ।।१८२।। सुहास्यवदन बालकापरी । दर्शने समाधान होय अंतरी । श्रीस्वामी संगति आनंद करी । भक्तमेळा करवीरी ।।१८३।।

स्वामी माझा करवीरीचा, अति सुंदर सुंदर, अति सुंदर सुंदर
गळा माळ रत्नहार, शिरी टोपी ती सुंदर, शुभ्र वस्त्र अंगरखा, घेई टोपी त्यावरीता
असा शोभे हा माझा, अवधूत दिगंबर, गुरुदत्त दिगंबर ।।
हास्य सुहास्य मधुर, जेणे भुलले नारीनर, असा हा जो यतिवर,
गुरुराज दिगंबर, स्वामीराज दिगंबर ।।
बालवत् क्रीडा करी, सोंगे घेई नाना परी, प्रकटला परि खास,

अवधूत दिगंबर, अवधूत दिगंबर ।।

भक्त रक्षायासी खास, हनुमंताचा अवतार, ताराआईच्या गृहासी, राहिला हा जीवनभर

तो हा दत्त दिगंबर, गुरुदत्त दिगंबर ।।

वाचे गाऊ नाम त्याचे, ध्याऊ चरण हृदयात, कृपा होता त्याची साची,

सांभाळेल निरंतर, सांभाळेल निरंतर, स्वामी दत्त दिगंबर, स्वामी दत्त दिगंबर ।।

श्रीस्वामी लीलागुणगानी । तल्लीन होऊनि नामगानी । क्षुल्लक वाटताती मनी । प्रारब्धभोग भक्तांसी ।।१८४।।

गुरु लाभले यति कृष्ण सरस्वती,

भेटताची निर्मल मति अति,

वाटे मज श्रीदत्त संगति

चुकली प्रारब्धाची गति,

रोमरंध्रेही नाम ते गाती,

कृष्ण सरस्वती, कृष्ण सरस्वती ।।

श्रीस्वामी म्हणती सर्वांसी । म्हणावे वैराग्यमठी तारागृहासी । तेणे तोष आम्हासी । मान्य जाहले सर्वांसी ।।१८५।।

दत्तांचा दरबार, करवीरी दत्तांचा दरबार

तारागृही त्या नित्य भरतसे, दर्शना येती लोक अपार

सिंहासनी त्या कृष्ण सरस्वती, बैसले अवधूत अवतार

या हो तुम्ही एक वार, सारे या हो तुम्ही एक वार

दु:खा करितसे तो वार, जेणे राहे सुखा न पार

घ्या दर्शन एक वार, गा हो नाम तुम्ही एक वार

होईल नौका भवपार, कृष्णदास सांगे वारंवार ।।

जन येती श्रीस्वामीदर्शनासी । भक्तमंडळी सांगती तयांसी । संपादा श्रीस्वामीकृपेसी । श्रीस्वामी असती साक्षात् दत्त ।।१८६।।

दत्ताचे ध्यान करा, दत्ताचे ध्यान, मिळे कृपादान तुम्हा, मिळे कृपादान

भक्ति ज्ञान वैराग्य, हेचि असे दान, दुर्मिळ अति मिळुनि ठराल, अति भाग्यवान

योग्यांचा मार्गदर्शक, तोचि एक महान, कृपाळू दीनवत्सल ज्यासी, उपमा ना आन

दत्त नाम स्मरणेची प्रगट उभा, द्याया कृपादान,

कृष्णदास कृपा लाभुनि, झाला भाग्यवान! ।।

दर्शना येती अमित जन । श्रीस्वामींसी प्रार्थून । घेती नित्य आशीर्वचन । तद्नंतर जाती नित्यकार्यासी ।।१८७।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, प्रभाती उठताचि नमन नित्य

तेणे जागवितो विवेक मनात, विचार सारासार नित्य अनित्य
अनित्य टाकोनी लक्षितो नित्य, कृष्णदासा न अहित दिनभरात ।।

दत्तस्थानी तप आचरिती । तयासी श्रीदत्त कथिती दृष्टांती । कुंभार आळीत असे वसति । जाता पुरती मनोकामना ।।१८८।।

करवीरा झाली दाटी, अवधूत आला वैराग्यमठी
शुभ्र अंगरखा हिरवी टोपी, खांद्यावरती भगवी छाटी
शरणांगत त्यासी होऊनि, चरणांवर शिर ठेविती
श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, नाम उठे भक्तां ओठी
बटूमूर्ति देखुनि नमिता, कृष्णदासा समाधान पोटी ।।

घेता श्रीस्वामी दर्शना । श्रीस्वामी हसुनि वदती जना । प्रश्नोत्तर उघड करिती खुणा । कळे जयाचे तयासीच ।।१८९।। बालकभाव करुनि धारण । सर्वकाळ श्रीस्वामींचे लीलाप्रकटन् । अभाविकांचे साशंक मन । परि भक्ता होय मार्गदर्शन ।।१९०।। श्रीस्वामींच्या लीला पाहून । लुब्ध होत भक्तजन । सहजचि स्व-विस्मरण । मनाचे होय अमन ।।१९१।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, चरण उमटले हृद्पद्मात
ध्याता गणी न दिन अन् रात, गुंतविले अवघे मतिसहित
उमलले हृद्पद्म अमित, मधुर संवेदन जाणवे तेथ
दर्शनी लुब्ध अखंड मनात, कृष्णदास गुंजारवी नित्य ।।

करवीरी अवतरले गोकुळ । गोपगोपी भक्त केवळ । लीलानाटकी घननीळ । श्रीकृष्णस्वामी ।।१९२।।

गोकुळी कृष्ण गोपाळ, करवीरी कृष्ण दयाळ, गळा मौक्तिक माळ, दोहोंच्याही
एक पांडवा रक्षित, दुजा भक्त हित लक्षित, वेणू वाजवोनि मोही, दुजा सोऽहं ध्वनि गाई
एक प्रेमाची नवाई, दुजी भक्तांसाठी आई, एक द्वारकेचा राजा, दुजा भक्तांचिया काजा
मारी कंस नी कौरव, दुजा मारी षड्रिपु थोर, वर्ते आनंद हा थोर, नाही त्याला अंतपार
म्हणुनि भजा हो तत्पर, दत्ताचा हा अवतार, गर्जा वारंवार, नाम त्याचे हळुवार
श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त ।।

मुखी भरविता अल्पचि सेवित । संचार ग्रामी आवडे अमित । भाव पाहुनि तोषे त्वरित । श्रीगुरु कृष्ण सरस्वती दत्त ।।१९३।। शुक्रवार पेठेतुनि गंगाकिनारी । बैसोनि शिष्य खांद्यावरी । श्रीस्वामींची निघे स्वारी । दृश्य ते अति मनोहरी ।।१९४।। कृष्णा लाड, बाळकृष्ण राशिवडेकर । आवडते वाहन फार । कधी निवडिती कृष्णा स्वार । तर कधी रामजी फारिकासी ।।१९५।। कधी आरोहण तट्टूवरी । कधी अश्वरथावरी । परि भक्त खांद्यावरी । बैसायाची आवड भारी ।।१९६।। सुमनतुल्य हो भक्तांसी । पर्वततुल्य

नास्तिक अहंमन्यासी । उचलिता अहंकार जाय लयासी । श्रीस्वामींची लीला ऐसी ।।१९७।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, अहंकाराचा वारा न खपत
ताडण्याची अभिनव पद्धत, अंतरीच दासा जाणवत
कृपेनेच असे खूण कळवत, कृष्णदास निजमनी जाणत ।।

चालती ही चपळगति । सवे चालता शिष्य थकती । प्रार्थिती देवा घ्या विश्रांती । चालता थकलो पहा किती ।।१९८।। श्रीस्वामी हसुनि वदती । सेवाधर्म कठीण अति । करिता देहस्थिति परती । लाभते कृपे परमस्थिति ।।१९९।। अवधूताची सत्ता पंचमहाभूती । कधीतरी दाविती तयाची प्रचिती । सूर्याकडे पाहुनि करिता विनती । तात्काळ अभ्र दाटुनि येती ।।२००।। वाटे एखादे गृहांतरी । शिरुनिया करती कृती न्यारी । जनांसी होय कालांतरी । अर्थबोध लीलेचा ।।२०१।। जाहलिया शेजारती । श्रीस्वामी शयनगृही राहती । दर्शन ना कुणा देती । प्रभातकाळपावेतो ।।२०२।। जन म्हणती श्रीस्वामी निद्रिस्त । परि असती विश्वकार्यी व्यस्त । इहपरलोकींचे जन जे त्रस्त । तयांसी करावया स्वस्थ ।।२०३।। श्रीस्वामीमंचकी प्रभातकाळी । दिसे मृत्तिका बहुतवेळी । आश्चर्यचकित सेवकजन ते वेळी । पुसती श्रीस्वामींसी हे काय! ।।२०४।। श्रीस्वामी म्हणती गेलो घरा । काही कार्यानिमित्त जरा । नृसिंहवाडीसी जाहला फेरा । असे मतितार्थ श्रीस्वामींचा ।।२०५।। वाडीस जाता करवीरचे भक्त । वाडीकर सांगती श्रीकृष्णसरस्वतीदत्त । होते बहु दिन वाडीत । ऐकता जन आश्चर्यचकित ।।२०६।। हरिपंत करी देवालयी मंत्रपठण । एक मार्जार बैसे येवोन । संपेस्तोवर मंत्रपठण । असे शांत बैसोनि ।।२०७।। एके दिनी क्रोध येऊनि । हरिपंते मार्जारमुखा ताडुनि । नित्यपाठ तो संपवुनि । आला श्रीस्वामी दर्शनासी ।।२०८।। सेवक सांगती श्रीस्वामी निद्रिस्त । बाहेर आले तितुक्यात । सर्वा सुजला गाल दाखवित । मारिले म्हणे हरिपंते ।।२०९।। हरिपंताचा पाठ ऐकाया । गेलो असता देवालया । ताडिले मुखावरी या । हा कैसा देवभक्त ।।२१०।। ऐकता हरिपंत ओशाळला । म्हणे श्रीगुरु नाही ओळखिला । तेणे घडले ऐसे मजला । निंद्यकर्म ।।२११।। नेत्री लागली अश्रुधार । क्षमा क्षमा क्षमा त्रिवार । साष्टांग वंदुनी वारंवार । धरिले श्रीस्वामीचरण हरिपंते ।।२१२।। परमात्मा असे सर्वाभूती । बोध जाहला मज निश्चिती । उरली नाही संदेह-स्थिति । तिळमात्र ।।२१३।।

श्रीगुरुराया सद्गुरूराया, रूप दिसो तव ठाया ठाया
चरणी तव मम प्रेम जडू दे, नामसंकीर्तन तव नित गाया
स्मरणी तव रे हृदय फुलु दे, प्रेम भावी त्या रमवी राया
कृष्णदास मग प्रेमानंदी, रंगुनि जाई सद्गुरूराया ।।

श्रीस्वामीसन्निध असता हरिपंत । पाहिले चमत्कार अनंत । तेणे तयासी जाणवत । श्रीस्वामींचा अधिकार ।।२१४।। हरिपंताचा धूर्तस्वभाव । मनी उमटला विपरीत भाव । गणिकागृही दत्तयोगिया ठाव । सर्वथैव अयोग्य ।।२१५।। वेणीमाधव रामदासा सवे घेऊन । मांडावे तीव्र अनुष्ठान । श्रीस्वामींसी नेऊ स्थळा आन । हरिपंते ऐसा केला पण ।।२१६।। चतुर्दश दिन सरत । तिघांसही होय दृष्टांत । स्तंभा बांधोनि हनुमंत । ताराबाई दिसे चरणासन्निध ।।२१७।। म्हणे मी धन्य भाग्यवंत । जन्मोजन्मी तप अनंत । अंती बांधिला हनुमंत । ऐसे अगाध तप माझे ।।२१८।। त्याआधीच श्रीस्वामींनी । कथिलेसे माधवासी कर्णी । तप व्रत अनुष्ठानांनी । न घडे कदापि ऋणमुक्ति ।।२१९।। समजुनि चुकले सर्व मानसी । श्रीस्वामी न सोडती या स्थळासी । वार्ता कळता ताराबाईसी । जाहली अभिमानग्रस्त ।।२२०।। श्रीस्वामी माझे अंकित । मीच भरविल्या जेवत । मीच आहे भाग्यवंत । सर्वात श्रेष्ठ मीच केवळ ।।२२१।। अभिमान जडता भक्तास । करावा सत्वर नि:शेष । हे श्रीगुरुंचे कार्य विशेष । करती तैसेचि श्रीस्वामी ।।२२२।। गेले असता माघस्नाना । सवे घेऊनिया वासु कृष्णा । श्रीस्वामींनी त्यजिले स्थाना । न कळे गेले कुठे कुणा ।।२२३।। आले ताराबाईच्या ध्याना । पोटी धरिले अभिमाना । ते नावडले श्रीस्वामींना । म्हणुनि जाहला वियोग ।।२२४।। शिष्य शोधिती इतस्तत: । परि न कळे काही पत्ता । वियोगदु:खे शोकाकुल चित्ता । ताराबाई विव्हळतसे ।।२२५।।

दत्ता कुठे तुला शोधू, दत्ता कुठे तुला शोधू ।।

जनी वनी धुंडिता दिसेचि ना तू, लपला कुठे कळेचि ना तू, दत्ता कुठे तुला शोधू ।।

म्हणवीसी दीन दयासिंधु, आटले कां सर्वचि ते बिंदू, दत्ता कुठे तुला शोधू ।।

जन्मोजन्मीचा दृढ संबधू, मम नयना का आणीसी जलबिंदू, दत्ता कुठे तुला शोधू ।।

रुप दावी मम नयना तव हे, मग होईल आनंदू

कृष्णदास तुज ध्यातो दत्ता, नयना लोटला जलसिंधू, दत्ता कुठे तुला शोधू ।।

उपोषण मांडुनिया । क्षमा करा प्रार्थुनिया । रुप दावा गुरुराया । ताराबाई करी धावा ।।२२६।।

दयेचा साठा झाला कां रिता, कृपेचा सागर आटला कां आता

दिससी न जरी निशिदिनी ध्याता, कृष्णदास म्हणे शोधू पाहू कसा आता

कृपा करा कृपा करा कृपा करा आता, देवुनिया दर्शन निववी मला त्वरिता ।।

त्रिदिन जाता होय दृष्टांत । श्रीस्वामी ताराबाईस कथित । दोष न मजकडे किंचित् । तुज अभिमान बाधला ।।२२७।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, हास्य मुखासी रमे बालभावात

तेज अमित परि सारे लपवत, शरणागतासी कृपा अमित

काही न मागे, मीपणा परि न खपत, कृष्णदास मी-पण अर्पित ।।

देव अंकिला भक्तीसी । परि घेता अभिमानासी । न साहे तयासी । मग वियोग निश्चित श्रीगुरुंचा ।।२२८।। शोध ठरती व्यर्थ सारे । एकविसावे दिनी आम्हा पहारे । ही अमुची भाक घ्या रे । कथुनिया श्रीस्वामी जाहले गुप्त ।।२२९।। घेऊनिया वासु-कृष्णासी । श्रीस्वामी गेले राजापूरासी । एकविसावे दिनासी । परतले तारागृही ।।२३०।। वासु-कृष्णाची याकाळी । परिक्षा घेती वेळोवेळी । सेवाधर्माची काठिणता आगळी । शिष्यद्वया दाविली ।।२३१।। एके वर्षी कार्तिकवारीसी । भक्तांसहित श्रीस्वामींसी । नेले ताराबाईनी यात्रेसी । पंढरपुरा विठ्ठलदर्शनासी ।।२३२।। ग्राम एक मार्गावरी । कहर होता महामारी । तारा विनवी देवा आवरी । श्रीस्वामी रोविती मोळा भूवरी ।।२३३।। तात्काळ थांबली महामारी । ग्रामी लोकांसी आनंद भारी । घेती कृपाशीर्वाद सत्वरी । श्रीस्वामीदर्शनी येवोनिया ।।२३४।। पुढे पंढरीसी मंदिरी । भक्त येता गाभारी । देव पाहता विटेवरी । भाव दाटला उरी ।।२३५।।

घननीळ वर्ण प्रभा दाटली, मुखी लावण्यप्रभा फाकली, माझे विठाईची मूर्ति हासली ।।
समोर भक्ता दाटी जाहली, मुखी गाती विठ्ठल विठ्ठल, ऐकोनि विटेवरी नाचे विठ्ठल
भक्तही नाचती, नाचे देवही, देखण्या तो अनुपम सोहळा,
सुरवरांची दाटी जाहली, माझे विठाईची मूर्ति हासली ।।
अवचित मी त्या राऊळी शिरता, समोर सारे दृश्य पाहता,
रोमांचित अन् पुलकित काया, भान विसरुनि उडी घातली
चरणांवर त्या मिठी घातली, मी चरणांवर त्या मिठी घातली,
माझे विठाईची मूर्ति हासली ।।

श्रीस्वामी जाती विठ्ठलासामोरी । विठ्ठल पगडी ठेविती स्वशिरी । पुन: ठेविती विठ्ठल शिरी । ऐसे करिती त्रिवारी ।।२३६।। ऐसी दाविती लीला न्यारी । नकळे कुणा परि अर्थ भारी । विठ्ठल मी भेद ना परी । खूण उघड दर्शविती ।।२३७।। सज्जनगडीचा येता भक्त । श्रीस्वामी त्यासी खूण पटवित । अभेद असती सारे संत । न ठेवावा किंतु मनी ।।२३८।। झोळी कुबडी राहिली गडा । कल्पना खुळी त्वरे सोडा । पद्दा पुच्छ लाभ जोडा । रामदास वायुनंदन ।।२३९।। जैसा समर्थे एके दिनी । ज्वर ठेविला घोंगडीत बांधुनि । तैसेचि ठेवला श्रीस्वामींनी । कौपीन बांधोनि पलंगासी ।।२४०।। अण्णाबुवा दिगंबर मिरजेसी । कृष्णातीरी समाधि सुंदरशी । श्रीस्वामी जाता तेथ दर्शनासी । समाधीतून येई ध्वनि ।।२४१।। तुज पाहता कृष्णा । अक्कलकोटीचे देसी स्मरणा । ऐसे बोलती अण्णा । तात्पर्य दोघे अभेद ।।२४२।। श्रीगुरुसंग अति भाग्याचा । महत्पुण्ये लाभ जीवाचा । परि भाग अज्ञानाचा । तीर्थयात्रे धावती जन ।।२४३।। असता श्रीस्वामी संगति । कृष्णा लाड गेला यात्रेप्रति । पावला मास कष्ट अति । अलंकापुरी पंढरपुरी ।।२४४।। ज्ञानोबा विठोबा सांगती दृष्टांती । ऐसा शिष्य नावडे आम्हाप्रति । त्यजुनिया सदेह श्रीगुरु संगति । पक्वान्ने

सांडुनि तुकडे मागती । ।।२४५।। कृष्णासी तव कळले मनी । त्यजिता श्रीगुरु चिंतामणी । लाभ ना केवळ हानी । आला परतुनि श्रीस्वामी सन्निधानी ।।२४६।। तद्पश्चात् लाड कृष्णा । गेला ना कधी इतर स्थाना । तेणे जाहले सार्थक जीवना । श्रीदत्तस्वामीकृपे ।।२४७।। हरिपंते एके दिनी । आमंत्रिले श्रीस्वामींसी निजभुवनी । करावे धन्य गृहा येवुनि । अन् घ्यावा भोजनलाभ ।।२४८।। वासु कृष्णा कनिष्ठ याति । याकारणे त्यांसी वगळती । अंतर्साक्षी श्रीस्वामी जाणिती । हरिपंताचे कुटील मन ।।२४९।। करुनिया गृह सुशोभन । सिद्ध जाहले पक्वान्न भोजन । अधीर जाहले होणार आगमन । श्रीस्वामी येणार गृहासी ।।२५०।।

येणार येणार आज मम, गुरुदेव येणार
सगुण साजिरी मूर्ति गोजिरी, नयना या दिसणार
भावे नमुनि दत्तपदी त्या, मस्तक मी ठेवणार
तोष होऊनी अर्पिता गुरुदेवांचा, आशीर्वाद मी घेणार
आशीर्वाद तो सफल होता, आत्मानंदी रमणार
आत्मानंदी कृपे गुरुदेवांच्या, कृष्णदास रमणार ।।

ऐसी तयारी करुनिया । सवे रथ घेऊनिया । आला वैराग्यमठीसी श्रीस्वामींसी न्याया । तव श्रीस्वामी करिती लीला ।।२५१।। वासुदेव आला माधुकरी घेवोनि । श्रीस्वामी बोलती जवळी येवुनि । भुकेले आम्ही देता का भोजनी । ऐकता आनंदित वासुदेव मनी ।।२५२।। वासुदेव भरविता घास । श्रीस्वामी भक्षिती सावकाश । येता हरिपंत पाहुनि दृश्यास । मानिला मनी त्रास ।।२५३।। श्रीस्वामी बोलती त्यास । सारिले मी भोजनास । सुखे जावोनिया स्वगृहास । करावे तुवा भोजन ।।२५४।। ऐकता हरिपंत होय दु:खित । वृथा जाहला भोजन हेत । अपराध काय नाही कळत । विचार करी मानसी ।।२५५।। श्रीस्वामी कथिती त्यास । शूद्रे भ्रष्टविले आम्हास । आणावे सोवळे ब्राह्मण खास । ऐकोनि खजील हरिपंत ।।२५६।। श्रीगुरु असे दासाभिमानी । ना गणावे उच्चनीच तुलनी । भाव ऐसा उपजता मनी । श्रीगुरुंसी नावडे भक्त ।।२५७।। समस्त शिष्यवर्गावरी । श्रीगुरुंची कृपादृष्टी एकसरी । परि मानिती अहंकारी । मीच एक श्रेष्ठ दक्ष ।।२५८।। वेणीमाधव बालब्रह्मचारी । विचार उपजला त्याचे अंतरी । एके समयी देखता परनारी । क्षणिक नाडिले मना कुविचारी ।।२५९।। परि श्रीगुरु जागृत अंतरी । उपजवी विवेक सारासारी । तेणे सावरला सत्वरी । श्रीस्वामीकृपे वेणीमाधव ।।२६०।।

ह्रदयात स्मृति जागते, कोण बरे ती देते
जाणुनी अंतरी त्याते, ह्रदयी नमू गुरुरुपाते
खूण मनी कां न ती कळते, ह्रदयीच ठाव असे श्रीगुरुते
विसंब ना क्षणभरही ते, कृष्णदासा अनुभव ह्रदयाते ।।

विवेक हेचि श्रीसद्गुरुरुप । मनी उद्भवता कुविचार पाप । नाश होई आपोआप । असे सामर्थ्य श्रीगुरुंचे ।।२६१।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, जेंव्हा कधीही आठव करीत
उठे अंतरातुनी प्रतिध्वनि त्वरित, काळजी नको मी आहे जागृत
विवेकरुपे तोचि लक्षित, कृष्णदासाचे हित नित्य ।।

ऐसी श्रीसद्गुरुस्मरणाची थोरी । जागृत असे नित्य अंतरी । विस्मरण कदा होय जरी । प्रेम वृध्दिंगत बहुत तद्नंतरी ।।२६२।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, कौपीनधारी जणू हनुमंत
अंशावतारी करवीरी प्रगट, कामापासुनी दासा रक्षित
दासभावे श्रीरामा नमित, कृष्णदासही त्यासी नमित ।।

वार्ता कळता नामदेवा । अभिमान भरला जीवा । उपदेश करावा वेणीमाधवा । धावला त्वरे तयाच्या गावा ।।२६३।। गेला वेणीमाधवा शिकवाया । प्रचित श्रीस्वामींची पावोनिया । उगीच धजलो उपद्व्याप कराया । कळले त्यासी स्पष्टपणे ।।२६४।। वाटले होते वेणीमाधव भ्रष्ट । व मीच एकला असे श्रेष्ठ । परि श्रीस्वामीदर्शन जाहले स्पष्ट । माधवापासी नामदेवा ।।२६५।।

दत्ताचे बाळ मी दत्ताचे बाळ,
कामक्रोध डसू न शके, मजसी विषय व्याळ
शोभितसे मज ह्रदयी, विरक्तिची माळ
भावभक्तिची अर्पितसे मी, दत्तासी माळ,
तोषितसे तेणे मजसी, दत्त गुरु कृपाळ
निरंजनी अंगे खांद्या, खेळितसे, कृष्णदास बाळ ।।

तेणे जाहला गलिताभिमान । वाटला भ्रष्ट परि वेणीमाधव भक्त महान । खाली घालुनिया मान । नामदेव परतला करवीरी ।।२६६।। श्रीस्वामींपासी अधोवदन । लज्जित नामदेवाचे मन । प्रार्थून करी क्षमायाचन । चुकलो चुकलो क्षमा करा ।।२६७।।

स्वामींसी करितो विनवणी, अगुणी मज करा सद्गुणी
काढीन न कधी मी कुणाची उणी,
ढळे जेणे चित्त तुजवरुनिया झणी
दुर्गुणांचा डोंगर मी, स्वच्छ करा झणी,
कृष्णदास विनवितो नेत्रा आणुनिया पाणी ।।

श्रीसद्गुरु चिंतनात । प्रत्येक भक्त असे मस्त । भाव भक्ताचा अंतरात । नाकळे इतरा श्रीसद्गुरुविना ।।२६८।। शहाणपणा उपदेश इतरांसी । न करावे अट्टाहासासी । आपाआपुले साधनासी । असावे निमग्न ।।२६९।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, अभिनव त्या दीक्षेची रीत
अप्रकटरित्या चालवी मार्गात, तेणे न उठे दंभ किंचित
अहंकारापासून रक्षितो नित्य, पतनाचे जेणे भय न किंचित
साधनापथ हा सहज चालत, कृष्णदासाचा स्वामी हा दत्त ।।

श्रीस्वामींची धुण्या छाटी कौपीन । सेवा कृष्णा लाडालागून । तारुण्यमदे कुविचारव्याप्त होऊन । चळले चित्त तयाचे ।।२७०।। श्रीस्वामी आज्ञापिती त्यासी । तूर्त द्यावी सेवा रामजीसी । न करी काही खेदासी । कालांतरे देऊ परत तुम्हासी ।।२७१।। कळले अंती कृष्णासी । निजकर्मे अंतरलो सेवेसी । जाण येता अंतरासी । सावध जाहला नित्यवत् ।।२७२।। मनोमनी क्षमायाचना । श्रीस्वामींपासी करी कृष्णा । लाभता पूर्ववत् सेवा पुनः । आनंद वर्तला कृष्णासी ।।२७३।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, अखंड लक्षितो मम हित
साधनी मज नित्य जागवत, बेसावध क्षणी सावध करी नित्य
साधनेची वाही काळजी अशी नित्य, कृष्णदास होई निर्भर चित्त ।।

वासुदेव मूळचा तापट अति । श्रीस्वामी त्यासी उपाय योजिती । एके दिनी त्यासी वदती । त्यजी भोजन जरी मजवरी प्रीति ।।२७४।। सच्छिष्याचे लक्षण । करावे श्रीगुरु आज्ञापालन । जरी लागे त्यजावा प्राण । वासुदेव ऐसा निश्चयी ।।२७५।। तत्क्षणी सोडले भोजन । केवळ चणाडाळ सेवन । श्रीस्वामींचे न दिसता अनुमोदन । त्याग केला त्याचाही ।।२७६।। ऐसे व्रताचरण कठोर । वासुदेवाचा पाहुनि निर्धार । श्रीगुरुंसी जाहला तोष अपार । आज्ञापिती भोजन करी सुखे ।।२७७।। अन्नगत असे मन प्राण । अन्न त्यजिता होय क्षीण । ऐसे होता शुद्धीकरण । बरवे होय साधकांसी ।।२७८।। ऐसा उपाय श्रीस्वामींचा । परि निश्चय व्हावा शिष्याचा । छंद घेता आज्ञापालनाचा । सुखप्रद शिष्यासी ।।२७९।। शिऊबाई एक स्त्रीभक्त । श्रीस्वामी तिजसी आज्ञापित । स्मशानवास बरा एकांत । वैराग्य निर्भयत्व अंगी बाणे ।।२८०।। श्रीगुरुस्वामी ऐशा रिती । जी जी काही आज्ञा करिती । कल्याणप्रद असे अंती । शिष्यभक्तजना सर्वथैव ।।२८१।। गुणलाभार्थ शिष्यांसी । श्रीस्वामी शिकविती परोपरीसी । पाहू कैसी गुणरासी । जोडावी श्रीगुरुकृपार्थ ।।२८२।।

मनाचे निर्मळपण, लाभे तो भाग्यवान
मनाचे मोकळेपण, मत्सराचे नाही ठाण
मनाचे मोठेपण, परसंतोषे सुखी जाण
मनाचे शांतपण, क्रोधाचे उठले ठाण
मनाचे प्रसन्नपण, मुखी हास्या नाही वाण
मनाचे तृप्तपण, काम निष्काम तत्क्षण

मनाचे स्थिरपण, विचारांचा लोप जाण
मनाचे सात्विकपण, आळसाला नाही ठाण
मनाचे लीनपण, भाग्या नाही उणेपण
मनाचे शुद्धपण, अनीतिला न जागा जाण
सत्साधका आवश्यक, मनाचे हे सर्व गुण
अंती मनाचे अमन, गुरुकृपेची ती खूण ।।

करवीरदरबारी अनंत आळतेकर । धान्यकोठीचा तया अधिकार । नि:स्वार्थी सर्व व्यवहार । परोपकारी पुण्यात्मा ।।२८३।। सच्छिल निजकार्यकुशल । श्रीस्वामीचरणी भाव अविचल । सेवाभक्तिचे तप:फल । लाभले अंती अनंतासी ।।२८४।।

हृदय अति कोमल, चित्त अति निर्मळ, अंतरी विचार, भगवत्प्रेमाचा केवळ
भावरूपी मेघांनी, अखंड दाटले आभाळ, तेणे वाहे नयनी, अश्रूंचा ओघळ
इतरा मदतीस, अखंड तळमळ, निजस्वार्थाचा त्यासी, स्पर्श न केवळ
जन काकदृष्टी, टोचिती केवळ, स्वार्थी कलुषित, मति ती केवळ
सत्याचे अखंड, असता पाठबळ, भीतीस उरले, न कारण केवळ
पाठीशी उभे अखंड, सद्गुरूचे कृपाबळ, गोपाळ तयांचा करी, अखंड सांभाळ ।।

एके दिनी जाता श्रीस्वामी दर्शना । मठी इतर कुणी असे ना । श्रीस्वामींनी उचलुनि निजसिंहासना । अनंतासी बैसविले ।।२८५।। बैसताचि मति कुंठित । स्वत: श्रीस्वामीरुपी दिसत । अन् श्रीस्वामी निजरुपी दिसत । ऐसा दिधला अद्वैतानुभव ।।२८६।। जपतप साधन । नुरे काही कारण । येता श्रीगुरुकृपाक्षण । लाभती सर्व सिद्धी ।।२८७।। जन्मोजन्मी करुनि तप । कष्ट पावती साधक अमाप । तरीही न ये जो समीप । अनुभव क्षणे अनंतभक्तास ।।२८८।। निजसिंहासनी बैसविता । अनुभवले अनंतभक्ता । श्रीस्वामींसी एकरुपता । असे नित्य दासाची ।।२८९।। ऐशा रिती अनंताचा । सफल ध्यास हृदयीचा । भाव निष्काम कर्मभक्तिचा । फळला श्रीस्वामीकृपे ।।२९०।। अनुभव येता हृदय भरिता । अनंत जाहला श्रीचरण धरिता । श्रीस्वामींसी साष्टांग नमिता । भाव उमटले अंतरी ।।२९१।।

आता नतमस्तक व्हायचे, गुरुचरणी नतमस्तक व्हायचे
न बोलता काही, पायी शिर ठेवायचे, पायी शिर ठेवायचे
कृपेसी त्या दयाळी मी काय वर्णायाचे, मी काय वर्णायाचे
देत असे अखंड मजसी, भान न राहिले घ्यायाचे, भान न राहिले घ्यायाचे
विचार अखंड मनी, कैसे एकरुप व्हायाचे, कैसे एकरुप व्हायाचे
खूण कळली मज मनी, सारे त्यासी अर्पायाचे, सारे त्यासी अर्पायाचे
'मी'पणही अर्पिता साचे, भान उरते आत्मरुपाचे, भान उरते आत्मरुपाचे

गुरुशिष्य एकरुपतेचे, गूढ वर्णिले मी मनचे, गूढ वर्णिले मी साचे ।।

म्हादबा कोष्टी विणकर । भक्त निर्धन परि सज्जन फार । ठरला थोर भक्तवर । श्रीस्वामीचिंतने अखंड ।।२९२।।

स्वामींचे ध्यान करी नित्य दास, स्मरतो चिंतितो ना आणिकास
लौकिकाचा त्यास न उरे हव्यास, मोहमायेचा तेणे होई तो निरास
तुटती हळुहळु सर्व आशापाश, अजगरापरी वर्ते संसारास
दास असा होई आवडता स्वामींचा खास, कृपे त्याच्या लाभे अवीट आनंदास
देहभाव विरोनिया स्पर्शे आत्मभावास, जन्ममरणाच्या चुकवे फेऱ्यास
कृष्णदास स्वामीदास, त्यास, स्वामी भजनी नित्य उल्हास ।।

संपूर्ण देहविस्मृति म्हादबासी । ना जाणवे डंख मच्छरमाशी । श्रीस्वामीकृपे स्वानंदस्थितीसी । रमलासे अखंड ।।२९३।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, दास नेई हळुहळु उन्मनीत
मनाचा करितसे अंत, जीवभावाचा हो अंत
कृपा करितसे अशी अनंत, कृष्णदासा चित्ती अनंत ।।

श्रीस्वामींची छायाचित्रे सारी । तयांची कथा असे न्यारी । शिष्य विनविती परोपरी । परि न ये श्रीस्वामी अंतरी ।।२९४।। छायाचित्रे काढता अनेक । प्रयत्न विफल प्रत्येक । शिष्ये सोडिली आशा नेक । छायाचित्र घेण्याची ।।२९५।। परि पातला तो सुदिन । छायाचित्रकार एक प्रवीण । करवीर दरबारी आगमन । श्रीशाहूछत्रपतींकारणे ।।२९६।। सिद्धता जाहली छायाचित्राची । वाट पाहती छत्रपतींची । चला चला बोली श्रीस्वामींची । वैराग्यमठी शिष्यांसी ।।२९७।। श्रीस्वामी निघाले त्वरितगति । शिष्य मागे मागे धावती । आले सर्व राजवाड्याप्रति । छायाचित्रस्थळी प्रवेशले ।।२९८।। मौक्तिकमाळा गळा घालुनि । बैसले राजसिंहासनी । शिष्य धुंद रुप पाहुनि । श्रीस्वामी हसती मंद मंद ।।२९९।। त्यासमयीची छायाचित्रे तीन । प्रसिद्ध जाहली कालेकरुन । तेणे लाभ श्रीस्वामी दर्शन । सकळ भाविकांसी आजही ।।३००।।

शिरी टोपी अन् वर्ण सावळा, माझा गुरु हा दत्त सावळा
तारागृही सिंहासनी स्थितसे, सवे अखंड भक्त गोतावळा
सुवर्णकांती तेजे सगळा, हनुमंताचे रुप आगळा
कृपा करिता त्या लागेना वेळा, म्हणुनि नमितो मी वेळो वेळा

कृपा करितो प्रेमे आगळा, माझा गुरु हा दत्त सावळा, माझा गुरु हा दत्त सावळा ।।

श्रीस्वामींचे शिष्यभक्त । काही ज्ञात बहु अज्ञात । । काही नामे परिचित । असती ती पाहूया ।।३०१।। देवधर संन्यासी करवीरात । येवलूज ग्रामी गणपति भक्त । गोकुळशिरगावी समाधीबाबा असत । नातू तयांचा जत्रटकरबाबा ।।३०२।। गाणगापुरी

आठल्येबुवा वसत । कर्नाटकी बसाप्पा राहत । कारखाननीस, शिवूबाई स्त्रीभक्त । नाना खंडोबा, दादा पंडित ।।३०३।। शिष्यांसी श्रीस्वामीसंगति । आनंदासी नाही मिति । जन्म जाहला सार्थक इति । श्रीस्वामीकृपालाभ जोडता ।।३०४।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती यतिवर, लाभे आम्हा थोर गुरुवर
चरण मी नमितो वारंवार, सर्व सुखाचे जे का आगर
अवधूताचा हा बाजार, खेळणी सर्वां विविधचि फार
सोऽहं डमरु वाजे थोर, अनुहताचा करीत गजर
ऐकोनि माया होई पसार, मग वर्तले सुख हे अपार
चरण मी नमितो वारंवार, चरण मी नमितो वारंवार ।।

अनंत सिद्ध अपरिचित । जे जे आले करवीरात । श्रीस्वामीदर्शनी महति कळत । जाहले श्रीस्वामी कृपांकित ।।३०५।। परिव्राजकावस्थेत करवीरात । स्वामी विवेकानंद येत । श्रीस्वामी दर्शनी त्यांसी लाभत । वाचासिद्धी कृपाप्रसाद ।।३०६।। श्रीस्वामी वैराग्यमठी असती । परी नाना स्थळी दिसती । ऐसी अनेकांसी प्रचिती । अशक्य ना श्रीगुरुदत्तांसी ।।३०७।। श्रीस्वामीआज्ञा महादेवभटासी । वाची पुराणकथा अंबालयासी । आम्ही येऊ ऐकावयासी । ठेवा मनी ही खूण ।।३०८।। बहुत काळ वाचिता पुराणा । एके दिनी आले मना । श्रीस्वामी ऐकती की नां? । कैसे मनी मानावे? ।।३०९।।

श्री गुरुराया सद्गुरूराया, दे अस्तित्वाची प्रचित मजला
ध्यानी बैसता सुरम्य मूर्ती, दाखवी मिटल्या नयना मजला
आशीर्वाद तव मंजुळ वाणी, ऐकू दे या कर्णी मजला
कृपाकरांचा कोमल स्पर्श, जाणवू दे मम शिरी मजला
ध्यानी तव सगुणाच्या रमवुनी, नेई निर्गुणी त्वरितचि मजला
कृष्णदास लडिवाळ बाळ हा, प्रार्थितो गुरुराया तुजला ।।

मनी प्रबळ होता भावना । तन्मय जाहला करिता वाचना । वाचता वाचता रमला ध्याना । जाहले श्रीस्वामींदर्शन ।।३१०।। मुखकमल हास्यभरित । वातावरण सुगंधित । अंत:करण प्रसन्न होत । आनंदलहर महादेवभटा ।।३११।। नयन उघडिता त्वरी । हरिद्रा-कुसुम ग्रंथावरी । खूण पटली खरी । श्रीस्वामी अस्तित्त्व निश्चितचि ।।३१२।। एकनाथी भावार्थ रामायण । भक्त करी पारायण । ग्रंथांतरी आढळला न । त्रयोदशाक्षरी राममंत्र ।।३१३।। शंका येता अंतरी । श्रीस्वामी आले सत्वरी । ग्रंथ उघडुनिया त्वरी । दाविले पृष्ठ राममंत्रासहित ।।३१४।। सर्वसाक्षी सर्वज्ञ ऐसे । श्रीस्वामी साक्षात् दत्तराज असे । चरणी लाभता आश्रय भाग्यवशे । भक्तांस वाटे धन्य धन्य ।।३१५।। स्मरता भक्त संकटकाळी । श्रीस्वामी धावती तात्काळी । त्रिभुवनी कुठल्याही स्थळी । असो तो भक्त ।।३१६।।

राजापुरा भक्त बुडता सागरी । श्रीस्वामींनी आणिले तीरावरी । छाटी पिळुनि औदुंबरी । श्रीस्वामी दाविती क्षार जीवन ।।३१७।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, वसतसे अवधूत करवीरात
फेरी करी त्रिभुवनात, भक्त रक्षिण्या त्रिजगतात
विविधरुपे दर्शन देत, कृष्णदास दर्शना इच्छित ।।

बालवृत्ती करुनिया धारण । लीलया लपविले ज्ञान । परि शरणागतासी मार्गदर्शन । करिती श्रीस्वामी प्रेमभरे ।।३१८।। यवनी, आंग्ल, संस्कृत, तामीळ । अस्खलित बोलती क्वचित् वेळ । आश्चर्य करिती जन सकळ । म्हणती हा दत्त केवळ ।।३१९।। करवीरीचे जन सगळे । त्यासी भावती श्रीस्वामी खुळे । महत्त्व परि आकळे आगळे । पुण्यवंत कृपावंतांसी ।।३२०।। पूर्वकर्मे जन इहलोकासी । भोगती नानाविध पीडांसी । श्रीस्वामी दावुनिया प्रेम तयांसी । अर्पिती सहनशक्ति अन् बळ ।।३२१।। समंधपीडा रोगपीडा । हरिल्या अनेक भक्तआपदा । जे जे आले शरण पदा । श्रीगुरुकृष्ण दत्तासी ।।३२२।। गोविंदराव करजकरा । पीडा करती आसरा । श्रीस्वामी फिरती सभोवारा । सप्तदिन गोविंदाभोवती ।।३२३।।

दत्त दत्त दत्त दत्त, त्रिशूल हाती धरी नित्य ।
शरणांगत जीवासी, रक्षण दत्त करी नित्य
स्मरणेची जो प्रगट नित्य, कृपावंत असे सत्य ।
कृष्णदास ध्यातो दत्त, ह्रदयी त्याच्या वास नित्य ।।

रक्षिता कृपावंते आसरांपासून । शांत जाहले गोविंदाचे मन । पुढे काही जाता दिन । उद्भवले दुजे प्रारब्ध फल ।।३२४।। महारोगाप्रत व्याधी अवचिती । उपजली गोविंद देहाप्रति । निरसनार्थ जाता श्रीवाडीक्षेत्राप्रति । दाह वाढला अपरिमित ।।३२५।। परतला श्रीस्वामीचरणी । दु:खे करी विनवणी । चुकलो देवा उपकारखाणी । ना होई पीडा सहन ।।३२६।। श्रीस्वामी अति कृपावंत । ब्रीद शरणागतासी रक्षित । स्वये धरुनि गोविंदाचा हात । फिरावयासी नेती स्वये ।।।३२७। ऐसे जाता काही दिन । गोविंदाचे जाहले रोगनिरसन । विनीत दोन्ही कर जोडून । प्रार्थना करी श्रीस्वामीराया ।।३२८।।

आता माझे मज कळोनिया आले, श्रीगुरुसी म्यां वाया कष्टविले
प्रारब्ध ज्याचे त्याने पाहिजे भोगिले, चुकविता पुढल्या जन्मावरी गेले
विधिलिखित अति अटळ जाणले, कृष्णदासे गुरुकृपे भोगुनी सारिले
पाहुनिया श्री गुरु अत्यंत तोषले, तोषोनिया अपार कृपा वर्षले ।।

ऐशा रिती देऊनिया धीर आधार । भोगवुनिया प्रारब्ध खडतर । गोविंदाचे केले पापनिरसन । श्रीगुरुदत्तस्वामींनी ।।३२९।। मोहमायेचा करुनि निरास । संसारी करुनिया निराश । वासना करुनिया निशे:ष । पावविले मोक्षपदी सकल दास ।।३३०।।

विषयासक्त कुंभार गल्ली । जाहली वैराग्यसन्मुख श्रीस्वामीकाली । लीला-गुण चिंतनी रंगली । विषयसुख अवघे विसरली ।।३३१।।

दत्त आला वैराग्यमठीसी, दत्त आला वैराग्यमठीसी
अर्पिण्यासी वैराग्यासी, दवडिण्यासी कामक्रोधासी
अंबेच्या करवीरासी, कृष्ण-ताराई सदनासी
कृष्ण सरस्वती नामासी, रमे अवधूत करवीरासी
बैसलासे सिंहासनीसी, पहा पहा हनुमंतासी
धरियेले बटूमूर्तीसी, धरियेले बालभावासी
शुभ्र अंगरखा तनासी, हरित टोपी शोभे शिरासी
भगवे उपरणे खांद्यासी, कस्तुरी टिळा शोभे ललाटीसी
चला चला दर्शनासी, नमा नमा सर्वभावेसी
निवती नेत्र पाहता हास्यासी, निवती गात्र चरणस्पर्शेसी
जाणे अंतरीच्या भावासी, पुरवी भक्त मनोकामनेसी
लाधू चला कृपादृष्टीसी, होऊ धन्य लाधुनि कृपेसी
डोई शरणांगत चरणांसी, कृष्णदास धन्य मानसी ।।

संत बहुत जनांसी आधार । सिद्ध संतांसी आधार । ऐसिया अनंत सिद्धांसी आधार । श्रीगुरुदत्तस्वामींचा ।।३३२।। तारागृहासी करवीरी । श्रीस्वामींनी दाविल्या लीला अपारी । श्रीस्वामी जाहले शोकाकुला भारी । ताराबाईने देह ठेवता ।।३३३।। आई गेली आई गेली । श्रीस्वामीमुखी असे बोली । त्यजुनिया बालभाव बोली । श्रीस्वामी वर्तती गंभीरपणे ।।३३४।। आवडे नित्य पर्यटन । परि ते सर्वथा त्यजून । श्रीस्वामी न सोडती मठीलागून । शांत राहती सर्वकाळ ।।३३५।। बोध शिष्यांसी करिती उदंड । व्हा सावध रहा अखंड । तरीच चुकेल यमदंड । स्वहितास्तव झटाल जरी ।।३३६।। आमुचा हस्त असे शिरी । अल्पस्वल्प केले जरी । फळ पावाल कोटीवरी । जन्मजन्मांची ती शिदोरी ।।३३७।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, स्वामी असता दास कां भीत
पाठी उभा त्रैलोक्याचा नाथ, स्पर्शावया काळही तो भीत
मायेचा न लागे पाडाव तेथ, कृष्णदास गमतो सनाथ ।।

ऐशा लीला दावुनि करवीरास । अवतारकार्य येता समाप्तीस । शके पातले अठराशे बावीस । निजानंदी निमग्न जाहले श्रीस्वामीराज ।।३३८।। वद्य दशमी मास श्रावण । नामदेवाहाती आरती करवून । श्रीस्वामींनी स्थिर केला प्राण । ब्रह्मरंध्री पहाटेसी ।।३३९।। श्रीस्वामी समाधीचे निजगृहा स्थान । ताराबाईने केले पूर्वीच निर्माण । केलासे यथाविधि

श्रीस्वामीदेह जतन । पूजिती नित्य भक्तगण ।।३४०।। श्रीस्वामी वैराग्यमठीसी । रमले निवांत निजस्थितीसी । जाता तेथ दर्शनासी । लाभे कृपा भाविकांसी ।।३४१।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, चला दर्शना कृष्ण-तारा गृहात
समाधीत बैसला दत्त, जागृत प्राण सहस्त्रारात
माथा टेकिता अनुभव येत, कृष्णदास होई रोमांचित! ।।

नूतनीकरण जाहले सांप्रत । दिसे वैराग्यमठी भव्य प्रशस्त । आनंदी एकाग्र स्वस्थ चित्त । प्रवेशिता मठी त्वरितचि ।।३४२।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, अखंड वास वैराग्यमठीत
विवेक वैराग्य प्रसाद तेथ, जाता नमिता लाभे त्वरित
कृपा दर्शनी होई अनंत, कृष्णदासही भाग्यवंत! ।।

श्रीस्वामी पुण्यतिथीसी । भक्त करिती उत्सवासी । सजविती श्रीस्वामी समाधीसी । दिसे रुप अनुपम ।।३४३।। श्रीस्वामी जात नित्य पर्यटनासी । शुक्रवारपेठमार्गे पंचगंगेसी । श्रीस्वामींसी घेऊनिया पालखीसी । भक्त जाती त्याच वाटे ।।३४४।। टाळ मृदंग गजरात । भक्त मुखे भजन गात । श्रीस्वामी झुलती स्वानंदात । आनंद सोहळा भक्तांचा ।।३४५।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, पालखी निघाली चला त्वरित
स्वामी झुलती आनंदात, भक्तही डोलती आनंदात
ताल मृदुंग चिपळया गर्जत, दत्त नामाचा गजर होत
आनंदाला उधाण येत, कृष्णदास भोई तेथ! ।।

परतता मठी माध्यान्ह प्रहरा । होय आरती प्रसाद-भंडारा । लाभ घेता आनंद अपारा । भक्तजनांसी नगरीच्या ।।३४६।। श्रीस्वामी समाधिपश्चात् । व्यासभक्त निजबोधमठी निर्मित । श्रीशाहू छत्रपति महाराज अर्पित । भूमी मठाकारणे ।।३४७।। नामाची अखंड वीणा । चालविता आनंद भक्तजना । आजही जाता दिसेल नयना । निजबोधमठीसी अपूर्व ।।३४८।।

एकतारीची एकतानता, लाभे नाम गाता गाता
एकचि आठव होतो चित्ता, श्री गुरुदत्ता श्री गुरुदत्ता
योगिजनांचा माता पिता, षड्‌रिपु पळती बघुनी ताता
वासनांचा जो थार पुसता, मायेचा जो गळा घोटीता
तार वाजते त्र्यं त्र्यं करता, अंतर्नाद जो ऐकता त्याचा
भानचि विसरु लागे आता, जगद्‌भास विसरु तो पुरता
समोर त्यासी उभा पाहता, अंतरीही मज तोचि दिसता
नाम अखंड जपतो आता, श्री गुरुदत्ता श्री गुरुदत्ता ।।

कलियुगी नामसाधन सार । सुलभ तरावया भवसागर । जपती भक्त भाविक अपार । अखंड श्रीस्वामींचे ॥३४९॥

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, नामाचे सामर्थ्य अमित
उद्धरिले अखंड अगणित, शरण जाता कृपा त्वरित
कृपाळू दत्त लक्षितो हित, कृष्णदास शरणी त्वरित ॥

नाम जपता प्रेमभरे । इच्छावासना त्वरित सरे । चित्त होय हर्षभरे । ऐसा महिमा श्रीसद्गुरुनाम ॥३५०॥

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, नामाचा उगम ह्रदयात
अखंड झरा असे स्फुरत, प्रेमलहरी सर्वांगी पुलकित
स्मरणी शरीर रोमांचित, कृष्णदास नित्य अनुभवत ॥

श्रीस्वामी पादुका बाळकृष्णापासी । त्याचि स्थापिल्या निजबोधमठीसी । जाता तेथ दर्शनासी । पुरती मनोकामना भाविकांच्या ॥३५१॥ श्रीस्वामीभक्त जन । निजबोधमठी एकत्र जमून । नित्य करिती भजन पूजन । श्रीस्वामींसी प्रार्थिती मनोभावे ॥३५२॥

देई गुरुभजनाचे प्रेम, मजसी गुरुभजनाचे प्रेम
नयनी गुरुमूर्तीचे प्रेम, नयनी गुरुमूर्तीचे प्रेम
श्रवणी गुरुबोलाचे प्रेम, श्रवणी गुरुबोलाचे प्रेम
वाचे गुरुनामाचे प्रेम, वाचे गुरुनामाचे प्रेम
चित्ती गुरुचरणांचे प्रेम, चित्ती गुरुचरणांचे प्रेम
देही गुरुसेवेचे प्रेम, देही गुरुसेवेचे प्रेम
कृष्णदास प्रार्थितो गुरुंसी, चालवी अखंड माझा नेम, चालवी अखंड माझा नेम ॥

निजबोधमठीचेही नूतनीकरण । भक्तभाविके केले जाण । पार्श्वभागी ध्यानगुंफा विस्तीर्ण । नाम ध्यान वा करा हवे ते ॥३५३॥ श्रीस्वामींची सिंहासनस्थित । मोहक मूर्ती प्रतिष्ठित । रुप नवनवे लेववित । सजविती भक्त साजिरी ॥३५४॥ सर्वकाळ दोन्ही मठीसी । भक्त येती दर्शनासी । साष्टांग नमिती श्रीचरणांसी । मना पावती समाधाना ॥३५५॥

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, शिष्ये स्थापिला निजबोध मठीत
दर्शना मूर्ति पंचधातूंकित, दिसती स्वामी सिंहासनीस्थित
दर्शन करुनी भावे नमिता, कृष्णदास निजबोधी सद्गदित! ॥

जणू प्रत्यक्ष साकार । श्रीकृष्णसरस्वती दत्तावतार । मनमोहक रुप फार । दर्शनी अतिसमाधान भाविकांसी ॥३५६॥

सद्गुरू सूर्य ज्ञान राशी, प्रकटलासे सिंहासनासी
चला चला करवीरासी, कृष्ण सरस्वती दर्शनासी
बटूमूर्ति हास्य मुखासी, मौक्तिकमाळी गळा शोभसी

भक्त भावा भुलला पाहसी, तेज अमित मुखा दाविसी
चमत्कार नित्य करिसी, सोंग दावुनि गुप्त वर्तसी
पीठापूराहुनी गाणगापुरासी, तेथोनि आलासी करवीरासी
नृसिंहभान गुरु तुजसी, शिष्य अंगिकारिला कृष्णदासासी
पहा पहा अवधूतासी, कृष्ण सरस्वती दत्तावतारासी
दत्त दत्त नामे मुखासी, जपे तोषवि दत्त यतीसी
चरणी पडुनि शिरसाष्टांगेसी, लाधू आशीर्वाद कृपामृतासी
आशीर्वादरुपी कृपाबळासी, जाणू चला आत्मरुपासी
रमुनिया त्या आत्मरुपासी, अनुभवू सर्वात्मक दत्तरुपासी
अनुभवे त्या साक्षात्कारासी, एकरुप होऊ गुरुरुपासी
कृपे साधुनि एकरुपतेसी, जाणू जीवनमुक्त स्थितीसी
मुक्तिवरील रमू भक्तिसी, गाऊनि दत्त नाम मुखासी
प्रेमे आळवू दत्त यतीसी, प्रेमे रमू दत्त भक्तिसी
रमुनि नित्य प्रेमरुपासी, होऊ आपण प्रेमरुपचि
प्रेमभक्तिचा प्रसार करुनि, प्रेमविश्वातचि राहू रमुनि
कृष्णदास रमे नित्य, कृष्णसरस्वती ध्यास घेऊनि! ।।

जरी श्रीस्वामी समाधिस्थ होत । सदेश दर्शन होय साक्षात् । तेज:पुंज बालार्क रुप दिसत । आजही अनन्य भक्तासी ।।३५७।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, अवतार ताराया जन जे भ्रमित
करवीरी केल्या लीला अमित, वेश बावळा दावुनी लपला नित्य
शरण भावे जाता उद्धरिले त्वरित, कृपाळूपणे जन हे अनंत
आजही अदृश्य कार्या नाही अंत, दासभावे मी प्रार्थितो नित्य
स्वीकारले मजसी उद्धराया त्वरित, प्रेमात भान विसरतो मी नित्य
असा गुरु माझा कृपाळू दत्त, श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त ।।

देहत्यागानंतर नामदेवाघरी । श्रीस्वामी येत माडीवरी । नामदेव सांगत आली फेरी । स्वारी आली स्वारी आली ।।३५८।। येतसे स्वर्गिय सुगंध लहरी । नामदेवा दर्शन होय सशरीरी । ऐसी संजीवन समाधीची थोरी । श्रीदत्तराज स्वामींच्या ।।३५९।।

पहाटेच्या पारी, आली कृष्ण सरस्वतींची फेरी
आली त्यांना लहरी, भक्त देखण्या अंतरी
झोपले असती डाराडुरी, पूर्ण देहभावांतरी
षड्रिपु ढेकूण रक्त शोषिती परी, जाणीव त्यांना नसेचि खरी
देहोऽहं अखंड घोरी, ज्ञानचक्षू निजले परी

स्वामी मग चमत्कार करी
कृपाकराचा स्पर्श करुनि, सोऽहं बोध फूंक मारुनि,
कृपामृताचे जल शिंपुनि, अनुहताचे ढोल नगारा,
खडबडुनि उठे होता तो मारा
ज्ञानचक्षू ते त्वरित उघडता, उभा समोर प्रेमळ जनिता
भानावर मग तो येता, सद्गदित अत:करणी,
स्वामीचरणी झाला नमिता, श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्ता ।।

स्वामी माझा दत्त दयाघन । कृपाळूपणे अंगिकारुन । केले मज दीक्षाप्रदान । पूर्वपुण्य आले फळा ।।३६०।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, सद्गुरूंचा मी कृपांकित
आठव पूर्वी भेट करवीरात, ते वेळी मज केले सनाथ
सांभाळितो तैपासुनि नित्य, कृष्णदास शरणी नित्य ।।

श्रीस्वामी नित्य चिंतन । गुणचरित्र लीलागान । तेणे होऊनि प्रसन्न । हृदयी प्रकटेल अवचिता ।।३६१।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, चरणी जडली मज मति
भवसागराची मजप्रति, उरलीसे ना ती भीती
केली असे अखंड वसति, गुरुराये हृदयाप्रति
कृष्णदास शरण यति, श्रीगुरुदत्त कृष्ण सरस्वती ।।

हृदयीच दर्शन घडता । सर्व सुख येईल हाता । मी-पण निशे:ष होता । भवसागराची काय वार्ता! ।।३६२।। दास होता कृपांकिता । श्रीस्वामी सर्व कर्ता करविता । कृपे सोऽहं बोध अनुभवता । होय सार्थक जीवनाचे ।।३६३।।

नयन कृपामय सद्गुरुंचे मम, ध्यानी मनी वसे निरंतर
रुप व्यापुनि हृदयधाम, अशांत चित्ता लाभे विराम
पावन सुमधुर सद्गुरु नाम, चित्ता करी त्वरित निष्काम
कृष्ण सरस्वती दत्त ध्यान, कृष्णदास करी निरंतर ।।

प्रेमरुप श्रीसद्गुरु । स्मरणे शिष्य हृदयभरु । नयनी तैसे भरे नीरु । ऐसा निर्व्याज प्रेमप्रकारु ।।३६४।।

सद्गुरुची मूर्ती प्रेमाची घडली, विश्वप्रेम सारे पोटी सामावली
प्रेमाठायी नसे स्वार्थाचा लवलेश, जनहितापायी सारा उपदेश
देणे घेणे नाही तेथ व्यवहार, भरुनि वाहतसे केवळ कृपाचि अपार
प्रेमापायी घडले गुरुशिष्य आकार, निर्गुण निराकाराचा साकार अवतार
करवीरी आला तोचि गुरु, श्री कृष्ण सरस्वती दत्तावतार,

कृष्णदास प्रेमे त्यांसी स्मरतसे वारंवार ।।

ऐसा लाविला प्रेमलळा । श्रीगुरुराज मम दत्त सावळा । तोचि पंढरीचा निळा । लावण्यपुतळा श्रीहरी ।।३६५।। तयाचे स्मरणी चित्त । अंतर्बाह्य होवोनि पुनित । भावविभोर होत नित्य । तेचि अवस्था सहजध्यान ।।३६६।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, हृदयभावा बहर अमित
भावतीर्थी डुंबतसे नित्य, स्नान करता काया पुनीत
ध्यान करता अंतरी पुनित, कृष्णदास सर्वांगे पुनित! ।।

ऐसा दत्तावतार करवीरात । श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त । संक्षिप्त चरित्र केले लिखित । नित्यपठणा आनंददायी ।।३६७।। तल्लीन होता चरित्रगानी । भक्त सहजी धुंद ध्यानी । लीन होता अवस्था उन्मनी । लाभेल श्रीस्वामीकृपे ।।३६८।।

सद्गुरु प्रेमरस, नाहीऽऽ जीवा दुजी आसऽऽ
सद्गुरु दर्शनाचा ध्यासऽऽ, मजऽऽ लागो या नयनांसऽऽ
सद्गुरु चरण स्पर्शासऽऽ, उतावीळ या कायेसऽऽ
कर्ण उतावीळ नित्यासऽऽ, सद्गुरुऽऽ मंजुळ वाणीसऽऽ
सद्गुरु अवीट नामासऽऽ, चाखायाऽऽ जिव्हेसी या आसऽऽ
घ्राणी चालावा अखंडऽऽ, सद्गुरुंचाचि सोऽहं श्वासऽऽ
पिऊनि प्रेमरस ऐसा, लागोऽऽ सद्गुरुचाचि ध्यासऽऽ
श्री कृष्ण सरस्वती दत्तासऽऽ, विनवितो कृष्णदासऽऽ ।।

प्रसिद्ध श्रीकृष्णसरस्वती विजय । श्रीस्वामीचरित्र ग्रंथ अद्वितीय । प्रत्यक्षदर्शी शिष्य लेखक होय । कै. गणेश नारायण मुजुमदार ।।३६९।। तोचि असे लेखनाधार । लेखनासी या संक्षिप्तसार । मन गेले आनंदून अपार । स्वांत:सुखाय लेखन होता ।।३७०।। शके एकोणीसशे पस्तीस, चैत्र वद्य चतुर्थीसी । जाहला प्रारंभ लेखनासी । चैत्र वद्य चतुर्दशीसी । संपूर्ण जाहली श्रीदत्तचरित्रगुटिका ।।३७१।। विनति श्रीस्वामी चरणांपासी । करावी इच्छितसे मानसी । सेविती गुटिका भावे तयांसी । व्हावे तव कृपादान ।।३७२।। श्रीदत्तचरित्रगुटिकेसी । अर्पिता श्रीस्वामीचरणांसी । कृष्णदासाचे अंतरासी । अत्यानंद वर्तला ।।३७३।।

*-*-*

– ८ मे २०१३ – द्वितिय संस्करण १० डिसेंबर २०१६

# ।। चित्-स्फुर्ति * चिंतनामृत ।।

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्ता, ध्यातो तुजला निशिदिनी चित्ता
शरणागत या दीन आर्ता, का रे बा नुद्धरीसी त्वरिता
बटूमर्ती परी अगाध सत्ता, जननीहुनि तू तारक भक्ता
अल्पही न धरी मी चित्ती चिंता, त्रयमूर्ती तू तारक दत्ता
विश्वी एक तुझीच सत्ता, जाणुनि हा तुज शरण मी दत्ता
भावभक्तियुत होऊनि आर्ता, तरलो संसाराची गर्ता
काम क्रोधे व्यापियेलि सत्ता, निजदासा तू तारक दत्ता
निशिदिनी आठव देई चित्ता, स्मरणचि मोडी भवभय वार्ता
कार्यकारणाचा तुचि एक ज्ञाता, शरण तुज जाता न दु:खवार्ता
मोक्षपदाचा करी अधिकारी, दत्ता तुज हे नच नवलाई
हास्य मधुर तव लोभवी चित्त, भुलुनि जाहलो तव पद भृत्य
करवीर क्षेत्री अप्रकटचि राही, निजभक्ता परी जवळची घेई
नमन करीत अमन मी होई, कोण मी कोठील सरली वार्ता
सहजचि सुखद अवस्था येई, दत्त ही बाप अन् दत्त ही आई
सोऽहं सोऽहं गाई अंगाई, ऐकत जीव शिवस्वरूपचि होई,
ऐकत जीव शिवस्वरूपचि होई!

*-*-*

कृष्ण सरस्वती कृष्ण सरस्वती घोष नामी अति
जपता निशिदिन प्रसन्न होतो अवधूत दत्त यति
होता ऐसे उरे न त्याच्या भाग्या काही मिति
कल्पवृक्षातळी बैसता मग काय चिंता भीती
जपता नाम रुप कसे ते दडेल कुठे क्षिति
खचितची होती प्रकट सामोरी तत्क्षणी दत्त यति
रुप मनोहर दर्शन होता भूल पडे चित्ती
अंतर्बाह्य तन मन बुद्धि व्यापुनि राही दत्त यति
दत्ताचा अवतार करवीरी श्रीकृष्ण सरस्वती यति
कृष्णदास हा ह्रदयी वास त्या करतो दत्त यति

*-*-*

चला नमूया श्री दत्तासी, करवीरीच्या अवधूतासी
हास्य शोभे श्रीमुखासी, कौपीन छाटी टोपी शिरासी
केले धारण बाल वृत्तीसी, रुप लपविले अशा रितीसी
वेड्यापरी सोंग दाविसी, भक्त हृदयी प्रवेश करिसी
तनमनधन अन् चित्त चोरीसी, निजदासासी वेड लाविसी
एक त्यातला कृष्णदासही, सद्गुरूवेडा केला त्यासी

*-*-*

प्रेमाचा पुतळा अंतरीचा जिव्हाळा,
प्रगटला भूवरी रुपे सद्गुरु दयाळा
लाविलासे तेणे मज जो भ्रूमध्यी टिळा,
त्याचिया कृपे मी न भी कळीकाळा
भीमातटी उभा जो घालुनि वनमाळा गळा,
करविरी बैसला तोचि सिंहासनी घालुनि मौक्तिकमाळा
कृष्णसरस्वती स्वामी रुपे दत्त अवतरला भूतळा,
कृष्णदास भावे नमितो त्यासी अंतरी वेळोवेळा

*-*-*

यतिरुप श्री कृष्ण सरस्वती, वर्णिली ज्यांची बहु कीर्ति
जाणुनिया आर्त स्थिती, कृपा करी कनवाळूरिती
ध्यानी मनी दिसे मूर्ती, कृष्णदास दंग गुरुप्रीति

*-*-*

बटूमूर्तिची अगाध कीर्ति, कृष्णगुरुंची सुरम्य मूर्ति
अवधूताचा अवतारचि तो, करवीरी हे रमली मूर्ति
श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, नाम गाऊनी पूजिली मूर्ति
शरणागत जीवांची अगणित, तळमळ शमविली ती ही मूर्ती
प्रसन्न हास्ये वेड लावुनी, हृदयी वसली ती ही मूर्ती
अंतर्बाह्य व्यापुनी उरली, विश्वी भरली ती ही मूर्ती
कृष्णदास हा शरण जाऊनी, निशिदिनी गातो श्रीगुणकीर्ति

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, बीज रोविले अंतरात
वाढत वाढत असे देखत, रुपांतरले वटवृक्षात
वटवृक्ष स्वामींची परंपरा, कृष्णदास हा असे अनुभवत

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, शिरी शोभे टोपी हरित
पापताप जो अखंड हरीत, जन्म मृत्यूचा पाश हरीत
आत्मभावाचा बोध करीत, कृष्णदास आत्मभावे नमित

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, मोतियांची माळ गळयात
मुखी हास्य तेज गगनात, मूर्ति बटू परि व्यापुनि ब्रह्मांडात
चरण धरुनी कोंडिली हृदयात, कृष्णदास पुलकित हृदयात

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, आठव मनी क्षणाक्षणात
विसर क्षणभरीही न होत, वाटे लाधलो कृपा अनंत
कृपाळू दत्त नच विसंबत, कृष्णदासा स्मरण नित्य

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, नामाचा मज घोष हा नित्य
नाद ऐकता माया पळत, स्वरूप अनुभवी मी नाचतसे नित्य
भाग्य वर्णाया शब्दही थकत, उचंबळतसे प्रेमभाव हृदयात
कंठ सद्गदित, नेत्र जलभरित, कृष्णदास लोटांगणी नित्य

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, गुरु मज हा जन्मजन्मांतरित
अखंड सोबत हृदयांतरित, विस्मृतीची कशास बात
निशिदिनी मजसी जागृति नित्य, कृष्णदास चरणीचा भृत्य

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, अंतरात ज्योत उदित
नामघोष चाले सतत, रमतसे तेथ नित्य
मार्ग क्रमितो प्रकाशात, चालता देई हात
कृष्णदास चरणी त्या, शरणी तो सांभाळत

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, नामाचे सामर्थ्य अमित
उद्धरिले अखंड अगणित, शरण जाता कृपा त्वरित
कृपाळू दत्त लक्षितो हित, कृष्णदास शरणी त्वरित

*-*-*

चरण माझ्या गुरुचे, अति कोमल कोमल,
चिंतिता निशिदिन, बुद्धि विमल विमल

होई क्षणात निर्बल, प्रारब्धाचे हे तो बल,
पहा सकल सकल, गुरु कृपेचे हे फल
तेणे आम्ही हो सबल, गुरु चरण सकल, गुरु चरण सकल
*-*-*
हृदयीच्या भावफुला उमल उमल रे,
सद्गुरूकृपा प्रभातकाल झाला पहा रे
सद्गुरूभानू अंबरी उदय तळपे पहा रे,
कृपाकिरणी निजमना न्हाऊ घाल रे
भावगंध परिमळ रोमरोमी भिनवी रे,
अनुहत गुंजारव नित्य श्रवण करवि रे
चंचल मनभृंग नित्य लुब्ध करवि रे,
आत्मरंग मकरंद तोचि नित्य सेवी रे
कृष्णदास मानसी आस नाही दुजी रे,
भावगंधी आत्मरंगी नित्य रमवी रे
*-*-*
मनीऽऽ ध्याऊ रे, मनीऽऽ गाऊ रेऽऽ
दत्त दिगंऽऽबर रेऽऽ, दत्त दिगंऽऽबर रेऽऽ ।।धृ.।।
निशिदिनी रमुनिऽऽ उन्मनीत जोऽऽ, क्रीडी निरंजनी रेऽऽ
दीनदयाळ तोऽऽ, करील आम्हांऽऽ, त्रिगुणांपरता रेऽऽ ।।१।।
दत्त नाम तेऽऽ, किती अति मधुरऽऽ, रसने सेवू रेऽऽ
नाम सुधारसऽऽ, पिऊनि दंगऽऽ, भजनी डोलू रेऽऽ ।।२।।
टाळ चिपळयाऽऽ, अनाहताच्याऽऽ, संगे वाजती रेऽऽ
मृदंग दिम् दिम्, मान डोलतेऽऽ, त्या तालावरी रेऽऽ ।।३।।
त्रिकुट शिखरीऽऽ, दत्त दिसतो, भजनी गुंगऽऽ, दर्शन करितोऽऽ
कृष्णदास हाऽऽ, डोलत डोलत, विनटलाऽऽ, दत्त पदांसी रेऽऽ ।।४।।
*-*-*
स्वामींचा मी बाळ, अति लडिवाळ, कापे आम्हा पुढे काळ, मी निश्चिंत सर्वकाळ
स्वामी अति प्रेमळ, असे की कृपाळ, जणू तो गोपाळ, रक्षाया गोपगोपी,
जाणुनिया सद्भाव, करवीरी अवतरला
जरी असे दत्त साक्षात, ज्यासी काळही तो भीत, लोकामाजी वेडापिसा, तो हा गमला
जे भक्त, चरण त्याचे ध्यात, मनी दिन रात, त्यासी कल्पवृक्ष तो गमला

म्हणुनि मी नित्य, रमवी वाचा हे सत्य, श्री कृष्ण सरस्वती दत्त, मार्ग सुखाचा हो सत्य,
भावे नमू चरण हे नित्य, तेणे तुष्टतो अत्यंत, होईल कृपावंत, भाग्या नाही अंत, करु नका हो खंत
म्हणुनि सुजन हो ऐका, विनवितो, कळवळुनि अत्यंत, गा हो गा हो, ध्या हो ध्या हो
श्री कृष्ण सरस्वती दत्त, श्री कृष्ण सरस्वती दत्त
तेणे सत्वर तुष्टत, त्वरे ह्रदयी प्रकटत, सोऽहं भाव थाट, प्रबळ अति अचाट, अवधूताची ही वाट, जरी अति बिकट, कृपा होता त्याची खास, मार्गामधे नीट, सांभाळी तो नीट
असा गुरु दत्त, असता जो साक्षात, का हो तुम्ही भीत?
मायेचा थयथयाट? चला घेऊ तिचा घोट, तेणे स्वामी तो तुष्टत, नेई अवधूत मळ्यात,
सोऽहं भाव तळ्यात, सवे हो क्रीडत, हीच परमार्थाची वाट, सुजन हो ऐका, मनामध्ये नीट
बसा आसनी हो ताठ, डोळे मिटा हो ते घट्ट, ह्रदयी ठेवा ही गोठ, मनी बांधा खूण गाठ,
दत्त हा साक्षात, उभा समोर तिष्ठत, आशीर्वाद द्याया, आशीर्वाद द्याया,
कृपा आशीर्वाद होता, फिटे संसाराची व्यथा, सोऽहं भाव संगीता, रमाल हो नित्य, रमाल हो नित्य,
या कारणे हो सत्य, सांगतो अमित, ध्यावे चरण नित्य,
श्री कृष्ण सरस्वती दत्त, श्री कृष्ण सरस्वती दत्त

*-*-*

## ।। साधना ।।

डोळे मिटुनी बसायाचे, साधन वाटे सर्वां खोटे,
बोलणे हे वृथाचि ऐकुनि, मज मनी हा विस्मय दाटे
थोर थोर ते सारे संत, गेले परि ते ह्याच वाटे
जल दे सरिता जेवी सहजी, पय दे माता जेवी सहजी,
तेवि दासा लेववि रमवि, आत्मानंदी सहजासहजी
आहे हे किती नेटके, सोपे, सरळ, सुलभ नि गोमटे
नाही कोऽहं चा विचार, नाही सोऽहं अनिवार,
येथे काहीच ना करायाचे, नाही काही पाहायाचे,
अलक्षासी सुद्धा काही, नाही नाही लक्षायाचे
मग बुवा कसे काय, पाहिजे ते साधायाचे?
ऐका आता तुम्ही सर्व, बोलणे माझे जे गमतीचे,
स्वामींवरी भार घालुनि, दासा निश्चिंत राहायाचे
साधनांचे नानाविध, सार ते मी सांगतो की
बालकाचे जेवि कोड, माय पुरविते गोड,

तेवि रिती दासाचेही, गुरुमाई पुरवि कोड
एकभावे शरणतेची, मात्र आधी द्यावी जोड
शरणतेची मोठी खोडी, येत असे ही थोडी थोडी,
येता येता हळु हळु, जीवपणा मोडी मोडी
देहातील शिवपण, हळु हळु थोडे उघडी
जीवपण जैसे जाई, शिवपण उघडे होई,
जैसे ज्याचे जितुके उघडी, तितुके शरण तो तो गडी
शरणतेची होता सीमा, स्वामी प्रकटे तत्कालसा,
साही चक्रांचे पदर फोडी, कैवल्या नेई तो गडी
हे तो घडे अति तातडी, कारण की हीच प्राप्त घडी,
ज्या वेळी प्रकटे, दास्यत्वाची परम घडी
पुरुषार्थाचे नाही काम, हे स्वामींचे कृपादान
आता समजले ना साधन महान
डोळे मिटुनी बसायाचे, साधन आहे अति महान
अवधूताचे हे तो दान, वाटे मीच भाग्यवान्, वाटे मीच भाग्यवान्

*-*-*

हनुमंताचा भाव दास, रामकृष्णही वर्णिती खास
दासभावाचा भाव आगळा, ना ठेवी तो आस केवळा
धन्याचीच ती मर्जी सगळा, परि राखतो तोचि केवळा
ना स्वयेचि इच्छा काही, सर्व समर्पिले धन्यापायी
त्या योगे मनाची गति, होई ती केवळ निर्बळा
क्षणोक्षणी तत्पर हो राही, स्वामी आज्ञा सत्वर पाळाया
धनी चि सर्व मी नच काही, हा मनींचा भाव सगळा
त्या भावे तो तुष्ट जो होई, दासा रक्षितसे सगळा
फळ ते त्याचे अर्पितो सत्वर, काय मी वर्णू ते हो खास
धनी होई तो दास हो त्याचा, अन् दास तो धनी धन्याचा!

*-*-*

दासा मनी भाव काय, स्वामी पाहतो क्षणोक्षणी
उणे अधिक देउनि पाहतो, भाव उठे काय मनी
उणे पडता क्रोधे काय, अधिक होता माजे काय
दुर्लक्ष करता पळे काय, नित्याची ही परीक्षा होय
सफल उतरता मग ती माय, दासाचा त्या दास होय

✻-✻-✻

दासासी कठीण, मनाचा फास, तोडावा लागे, आधी तो खास
स्वामी पायी, अढळ विश्वास, त्याने होई, मायेचा विनाश
होताचि घडे, मनाचा नाश, दास मग शोभे तो, स्वामींचा खास

✻-✻-✻

स्वामींसी मागणे, हे तो दासासी उणे
स्वामी इच्छे वर्तणे, दास तो उत्तम गुणे
शरणागताच्या ह्या खुणे, गुरुकृपा अंगी बाणे

✻-✻-✻

मागणे लागे दासासी, हे तो स्वामींसी उणे
लक्षण हे दर्शविते, स्वामींचे दासावरी लक्ष उणे
शरणागतासी मनी न येणे, गुरुकृपाच ह्या खुणे

✻-✻-✻

स्वामीपण दासामुळे, दासपण स्वामीमुळे, एकमेका गुंतली मुळे, भूमीमध्ये भावबळे
प्रेमभाव पाण्यामुळे, वृक्ष वाढे आभाळे, होताची पूर्ण थोर, लागती आत्मफळे

✻-✻-✻

दास दास म्हणता नुरे, संसाराची आस । दासाचा तो स्वामी नेई, दासा कैवल्यास
कर्तेपण नुरे काही, दासाच्या मनास । घडवितो दडवितो, स्वामी प्रारब्धास
संसारी या दासा करी, सर्वथा उदास । स्वामी प्रेमी चिंतनी होई, देहभाव नाश
देहभाव नाश होता, मी तू पण नाश । कृष्णदास म्हणे होई, स्वामीरुप दास

✻-✻-✻

दास भाग्य वर्णू काई, काळजी वाही स्वामी साई ।
अजाण त्या बालकापरी, माता वाही काळजी सारी
गोड लाड करी त्याचे, धपाटाही घाली त्याते ।
कृती काही परी मनी, सर्वकाळ लक्षी हिते
कृष्ण सरस्वती स्वामी, दास झाला कृष्णदास ।
समर्थाचा होता दास, भाग्यवान ठरला खास

✻-✻-✻

बाळ रडे आई आई, माता त्वरे धाव घेई ।
हवे नको जाणुनि त्यासी, जे जे लागे ते ते देई
बाळा अन्य कष्ट न काई, निवांतचि रमे पाही ।
पहुडे तो निजानंदी, स्वानंदाचे भान घेई

कृष्णदास म्हणे दासा, तेवी स्थिती का न व्हावी ।
सोपवा सर्व स्वामी पायी, मग सुखा पार नाही

*-*-*

पंढरपुरी जाता विठ्ठला पाहण्या, काम क्रोध बडव्यांनी मारियले मजला
मी तो तान्हे बाळ, रडोनिया तेंव्हा, आळविले देवा, धाव सोडवि गा मजला
विठ्ठला ना वेळ, गुंतला तो भक्ता, ऐकोनी ती आळी धाडिले गा गुरुला
धावोनिया गुरुमाये बडविले बडव्या, त्वरित सोडवुनि बोधियेले मजला
कडेवरी घेवोनिया नेले राऊळाला, विठ्ठलाचे सामोरी उभे केले हो मजला
हासोनिया बोले विठ्ठल, का रे रडलासी? गुरुविना मी न भेटे, तू न का जाणसी?
हासोनिया बोलिलो, मी तो अज्ञानाची राशी, काय बा रे तू विचित्र खेळ मांडिलासी?
देव भक्त गुरु या त्रिवेणी संगमासी, भोवऱ्यात बुडे सर्व तेव्हा कोणा रे भेटसी?
ऐकोनिया विठ्ठल मनी गजबजला, अलगद उचलोनि मज कडे हो घेतला
पाहोनिया दृश्य, गुरु मनी तो हसला, क्षणातचि तो विठ्ठलामाजी हो लपला
विठ्ठल गुरु एकरुप पाहुनिया भान मी हारपलो, विटेवरी विठ्ठलाशी एकरुप झालों
अशा रिती त्रिवेणी संगमात मी हा न्हालो,
भोवऱ्यात बुडताचि अद्वैती लोपलो, मी अद्वैती लोपलो

*-*-*

जय अंबे कुलकुंडलिनी शक्ति, मूलाधारी तुझी वस्ती
विश्व उत्पत्ति स्थिति लय कर्ती, योगीजनांची माता चित्ती
सर्परुपी ही तुझी आकृति, रक्तोत्पल असे तुझी कांति
अखंड निद्रिस्त राहे भगवति, गुरुकृपेने उर्ध्व उठे ती
उठता उर्ध्व भेदी चक्रां,
हळुहळु उमलवि साऱ्या त्या कमळा,
वर्ण नाद ते वेगवेगळे
मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत
आज्ञा भेदुनि सहस्त्रारी धक्का, धक्क्याने सत्रावी उलथवी
चंद्रामृते त्या देहा पोसवी, पिंड ब्रह्मांड ऐक्य घडवी
जीवा शिवाचे मीलन घडवी, ब्रह्मानंदी अखंड बुडवी
नाथाघरची उलटी खूण ही, गुरुकृपांकित सहजी अनुभवी
द्वैताच्या त्या चालता वाटे, अद्वैतात सहजी पोहोचवी, अद्वैतात सहजी पोहोचवी

*-*-*

नाथपंथी आम्ही बाळे रे, ल्यालो गुरुकृपा चिलखत रे
गुरुमंत्राच्या ढाल तलवारे, संसाराच्या खेळू रणा रे
अनुहाताच्या शंख भेरी त्या, शत्रूंसी त्या भिववू सारे
षड्‌रिपु बलाढ्य शत्रूंचे ते, वार परतवू क्षणात सारे
संसाराच्या मायेला त्या, सप् सप् करुन कापू सारे
सुषुम्नेवरी सरसर करुनि, चक्र भेदुनि चढू वरी वरी रे
त्रिकुटावर त्या आरोहुनी ते, विजयपताका फडकवू सारे
कृष्णदास घण घण घण घंटा, चिदाकाशी नाच पहा रे

*-*-*

भगवंत निराकार । स्थानी वसे सहस्रार । भेटण्यासी देहात । सुषुम्नेचे महाद्वार
गुरुकृपे उघडे ते । प्रवासाचे राजद्वार । मूलाधार सहस्रार । श्वास उठे वारंवार
ध्यानी तो घेताचि । एकाग्रे एकवार । साक्षित्व घडे त्याचे । सहजीच वारंवार
उलटवोनि हुंकार । खेचिताचि सकार । सरसरसर चढे वायू । ब्रह्मरंध्री सहस्रार
निरालंब निराधार । भान तेथ महदाकार । स्थल काल ना विकार । नुरे तेथ अन्य विचार
कृष्णदास तेचि स्थळी । जाहला तदाकार!

*-*-*

दृष्टी जिथे पडो, दिसो देवापरी । द्यावी देवा तुम्ही, नजर मज खरी
रमो मी मजमाजी, एकल्याचि परी । द्वैत भावना समूळ, नाश करा त्वरी
कनक कांता दिसो, मज विषापरी । संग असुनिया राहो, नि:संग अंतरी
असल्याचे भान, नसल्याची वाण । आनंद दु:खाच्या, न उठो लहरी
मुखे हो उच्चार, हरि हरि हरि । सोऽहं ध्वनी गजर, होवो अंतरी
देहभान कधिची, ना हो शरीरी । अखंड ठेवा, आत्मभावावरी
द्यावी देवा मज, हीच ती फकीरी । कृष्णदास मागे, कृपादान तुज हरि

*-*-*

फकीरी ही खरी, वाट तिची न्यारी । तेणेची उमटतसे, सोऽहं अंतरी
अवधूताची असे, हीच कृपा खरी । जरी झालात तुम्ही, नि:संग अंतरी
सांगाति तुमचा, सोऽहं हाचि खरी । अहम् भान विसरुनी, रमा त्या हुंकारी
जाताची तुम्ही, औटपीटावरी । गडगडाट त्याचा, नाद ना इतरी
पोहोचल्या तिथे मग, पुढे गंमत सारी । लुटण्यासी कृष्णदास, चाले वाट त्वरी

*-*-*

खऱ्याखुऱ्या परमार्थात नसेचि कुणास गम्य ।
बाह्य साधना सोहळे यापरता विचार ना अन्य

अंतरीचे साधन मिळते असता गाठी पुर्वपुण्य ।
जाण त्याची येण्या लागे अति महापुण्य
रमा त्यात एकलेचि एकांती होऊनिया अनन्य ।
संग सोडा जनांचा व्हा उपद्रव शून्य
एकलेचि चाला मार्गी ना तरी कठीण ।
कृष्णदास सांगे पटेल माझे जरी गाठी कोटीपुण्य
*-*-*
प्रत्येक जीवाचा स्वभाव भिन्न, इच्छा वासनांचा कोष भिन्न
वागण्याची तऱ्हा भिन्न, सभोवतीच्या लहरी भिन्न
प्रत्येकाची मति भिन्न, अहंकारासी तादात्म्य अभिन्न
आपल्या मते चालावे, आपल्या ताले नाचावे, नसे यापरता आग्रह अन्य
परमार्थाची साधना म्हणजे नसे काही अन्य
जीवावरील ही सारी परिधाने दूर सारावी अन्य
संगति जाता इतरांच्या, सूक्ष्म आवरणे चढती वरे
आजपावेतो केलेली साधना, निष्फळ ठरे त्वरे
सत्साधक सत्संगति मिळणे, जगात अति दुर्लभ खरे
कृष्णदास सांगे मतितार्थ, सारे सोडुनि एकांती रमा त्वरे
*-*-*
विखुरला भाव होता एकाकार, सगुण साकार दर्शन ते
विखुरले चित्त होता एकाकार, निर्गुण निराकार दर्शन ते
नाम भजनी भाव एकाकार, ध्यान निर्गुणी चित्त एकाकार ।
गुरुकृपेचाचि जाणा, सर्व हा प्रकार
होउनि तो साकार, उपदेशी निराकार ।
भाव घ्या पोटी, मिळे कृपा अपार
*-*-*
झाला जीव अति मोकळा, सुटला मायेचा तो पिळा ।
चालू सोऽहं श्वास गळा, दिसतो प्रकाश निळा निळा
खेळे चिदाकाशी खेळा, त्या सत्रावीच्या तळा ।
कर्णी दशनादांच्या कळा, उन्मनीच्या त्या ह्या वेळा
खुणा कृपेच्या आगळ्या, त्या दत्ताच्या सावळ्या ।
शरणांगत भक्तांसी तो, अर्पितो त्या सगळ्या
*-*-*

आशा चिंता संकल्प, लक्षण मन भविष्यात ।
स्मृति खेद आनंद, लक्षण मन आहे भूतकाळात
लक्षणे दोही त्यजिता पहा, मन आहे का अस्तित्वात ।
कृष्णदास सांगे घेता शोध, मग रमाल परमानंदात

*-*-*

संकुचित 'मी'पणासी, का घ्यावे आपणासी ।
आत्मरुपे तेणेचि ना का, व्यापियेले विश्वासी
घटरुपी 'मी'पणा तू, जोवरी ना फोडितोसी ।
विभुरुपी 'मी'पणा तू, तोवरी ना अनुभवसी
मिळविण्याचे काहीच ना ते, सर्व काही जेथिचे तेथे ।
अनुभवाचा फरक तेथे, का तू ना हे जाणतोसी
सोऽहं सोऽहं ध्यास घेता, अहम् जाई विलयासी ।
अनुभवा येण्या कृष्णदास, नित्य रमे त्या अभ्यासी

*-*-*

'मी'च माझ्या स्वरूपासी जाहलो रे पारखा ।
स्वरूप तेचि जाणण्यासी पाहतो 'मी' सारखा
विसरलो 'मी' जाणतो, 'तो' कोण, 'त्यासी' विसर कां?
विसरल्याचा 'कुणा' आठव, जाहला 'तो', 'तोच' का?
जाणणारा 'मी' स्वयेचि, भान घेतो 'मी' स्वयेचि ।
भान 'ज्याचे' घेतसे 'तो', ना दुजा रे स्वये 'मी'चि
जाणीव माझी, तीच जाणीव, होतसे त्या सकल जीवा ।
शुद्ध जाणीव मिटवी ती, 'मी' 'तू' पण भेदभावा
'मी'च येथे, 'मी'च तेथे, व्यापितो 'मी' चराचराते ।
अनुभव हा 'मी'च करितो, वसतसे 'जो' सर्व जीवा
जाणीव हो 'माझीच' 'मजला', जाणीवे 'त्या' 'कोण' रमला?
जाणीवेचि होत नेणीव, नेणीवे 'त्या' 'कोण' उमगला?
जाणीव ती पार करुनि, नेणीवेत स्थिर झाला ।
कृष्णदास नित्य लक्षी, असे रे तो 'त्या स्थितीला'!

*-*-*

प्रेम घेऊया गुरुरायाचे, रमुया गुरुप्रेमा या साचे ।
हृदयकुंभी ते भरुया साचे, नाम मुखावर येईल त्याचे
रमता गुरुनामी त्या वाचे, विरेल बीज वासनांचे, येईल भरते आनंदाचे

रमता आनंदा त्या साचे, रोमरंध्रीही नाम ते साचे, उमटेल ते परा वाणीचे
परा वाणीचे नाम ऐकता, होईल उन्मन या मनाचे ।
उन्मनीत त्या भान विसरता, देईल अनुभव आत्मरुपाचे
आत्मरुपी त्या जग हे दिसता, प्रेमरुप जग गमेल सारे ।
कृष्णदास त्या प्रेमी रमता, प्रेमरुपची गमतो साचे
प्रेमरुपाच्या खेळा रमता, प्रेमरुपातची प्रेमी नाचे

*-*-*

नित्यसाक्षी असे जो का, नमन माझे तयाला
तिमिरनाशक ज्ञानप्रकाशक, त्या सद्गुरू स्वरूपाला
गुरुरुपे उपदेशितो जो, शिष्यरुपे क्रीडतसे जो
अद्वैतात राहुनिया करितसे, द्वैतातल्या लीलेला
'मी'पणा उठताचि लपतो, लोपता 'मी' प्रकटतो जो
नेति नेति शब्द उठती, वर्णिता ज्या रुपाला
दर्शन होता स्वरूपाचे त्या, काय येई अनुभवाला
'द्रष्टा दृश्य दर्शन' त्रिपुटी, लोपतसे त्या क्षणाला
जगत् केवळ भास जेथे, काळही ना उरे तेथे
नित्य सत्य शिव सुंदर, केवलानंद विभु रुपाला
अवस्था ही काय आहे, द्यावी मजसी अनुभवाला
कृष्णदास प्रार्थितो आज, श्री कृष्ण सरस्वती गुरुरायाला

*-*-*

नयन भुकेले मम नयन भुकेले ।
दावा चरण कोमले, दावा चरण कोमले
प्रेम अंतरी दाटले, तन भावे रोमांचले ।
भाव हृदयी उमले, नयन भरले हो जले
कृष्णदासे विनविले, कृष्ण सरस्वती माऊले

*-*-*

करितो गुरुदेवांचा धावा, करितो गुरुदेवांचा धावा
प्रेमळ नामाचा तव पावा, वाजवितो तव ध्यानी घ्यावा
हृदयकपाटा करितो टकटक, ऐकुनिया तव कानी धावा
भावाची मम गुणगुण गुणगुण, जाणुनि चित्ती त्वरितचि धावा
कृष्णदास तव करितो धावा, जाण मनींच्या शुद्ध भावा
धावा धावा गुरुदेवा तुम्ही, गोजिरी मूर्ति नयनी दावा

*-*-*

नाम गातो सद्गुरूचे, रुप ध्यातो सद्गुरूचे
चित्ती प्रेम सद्गुरूचे, नयनी रुप सद्गुरूचे
स्मरणी मंत्र सद्गुरूचे, तेचि तंत्र साधनेचे
कृष्णदास सद्गुरूचे, करी पान बोधामृताचे

*-*-*

मन रंगे गुरुरायाचे संगे, मन रंगे आनंद तरंगे
मन रंगे हरिनामाचे संगे, मन रंगे गुरुनामाचे संगे
कृष्णदास दंग गुरुप्रेमाचे संगे

*-*-*

मन रम रम रे, मन रम रम रे, गुरुचरणीं मन रम रम रे
गुरुमूर्तीते नयनी रम रे, गुरुध्यानी त्या तू रम रे
गुरुमंत्राचा करी जागर रे, नादमयी त्या तू नित रम रे
गुरुभजनाच्या प्रेमा रम रे, गुरुनामाच्या स्मरणी रम रे
गुरुकृपे त्या तू नित स्मर रे, गुरुप्रेमी तू नित रम रे
अविचल अति हे श्रद्धा बल रे, अवीट अनुपम त्याचे फल रे
कृपा फली त्या आनंदाच्या, आनंदाचे निजतरंग रे
कृष्णदास नित रमतो त्या रे, आनंदाच्या डोही अपारे

*-*-*

ध्यानी बैसलो गुरुदेवा, मन्मना तुम्ही त्यात रमवा,
एकरुप मजसी करुनी, दृश्य भेद मिटवा
अंतरी स्फुरण जे होते, श्रवणी तेच दावा,
नामरुपातीत जे का, आत्मरुप दावा
मागतो ना आणिक काही, हेत मज हा पुरवा,
कृष्णदास प्रार्थी तुजसी, विनती ऐक देवा
पुरवि पुरवि हेत हा माझा, समर्थ कृपाळा,
दासपणे मिरवी मज या, कृष्णदास बाळा
दास हट्ट पुरवि हा माझा, अता गुरुदेवा,
शरण शरण आलो तुजसी, पहा गुरुदेवा

*-*-*

निशिदिनी तुजला ध्यातो मी दत्ताऽऽ
करवीरपुरी वससी परी, त्रिभुवनी तव ही सत्ता

लोभस अति तव हास्य, वेधितसे मम चित्ता
नयने रुप निरखिता झालो, सहजी विषयांपरता
नयन कृपामय अति तव, वर्षितसे प्रेम भक्तां
अंतरी उमलिवतसे, प्रेमाचा निर्झर त्वरिता
न्हाता त्या जलधारे सर्वांगी होता विगलित गात्रा
कृष्णदास भावविभोर शरण स्वामी चरणांवरताऽऽ

*-*-*

श्री दत्तगुरु जय दत्तगुरु, प्रेमे भावे तुम्हा स्मरू
वससी जरी गिरीनारू, वास करसी हृदयांतरू
तव प्रेमातचि नित्य रमू, तव बोधाते नित्य स्मरू
सोऽहं सोऽहं होय स्फुरु, अनुसंधान त्याचे धरू
कृष्ण सरस्वती करवीरू, तुझाचि तो अवतारू
कृष्णदास नित्य स्मरू, ध्यानी मनी भरुनि उरु

*-*-*

भज मन अवधूता, भज मन अवधूता,
करुणाकर श्री दत्ता, भज मन अवधूता
योगिजनांच्या वससी चित्ता, शरणांगतासी तूचि त्राता
भक्त जनहो तुजसी ध्याता, भक्तवत्सल त्यांसी रक्षिता
कृपाकर्ता दु:खहर्ता, संसारातुनी तू उद्धरता
श्री गुरुदत्ता श्री गुरुदत्ता, कृष्णदास ध्यातो चित्ता

*-*-*

सद्गुरू माळी शिंपीतसे मळा, वर्षुनिया प्रेम सांभाळी तो बाळा
दीक्षारुपी बीज रोवितो हृदयी, अंगिकारी त्यासी भ्रूमध्यी टिळा
त्रिविध तापाचे ऊन लावुनिया, शरणांगत करी अहंकार हराया
सद्गुरू वचने तेचि होई खत, त्याने बाळासी अखंड पोशित
अर्पितो वैराग्य त्याचा किटकांसी मारा, तेणे न मिळे त्या षड्रिपुंसी थारा
कृपादृष्टी अखंड निरखितसे बाळा, उणे ते सत्वर पुरवितसे खाया
भक्तिप्रेम पाणी पाजितसे त्यासी, भावरूप फुले त्वरे येती त्यासी
भाव घनीभूत होताची तो साचा, ज्ञानरूप फळे तीच होई देखा
बोधरुपी बीजा ऐशा रीती फळे, गुरुकृपाबळे चमत्कार देखा
याचिसाठी सद्गुरूचे महत्व अपार देखा, शरण जाई त्याचा उद्धार होई फुका!

*-*-*

सांगती संत आत्मज्ञानी पुरुष, जगात जीवा स्वातंत्र्य ना रे
कठपुतळीसम नाचवितो त्यासी, जगद् रंगभूमीच्या खेळा रे
वृक्षाचेही पान न हालते, त्या अनंत सत्तेविना रे ।
प्रश्न मग उठतो मनी माझ्या, जीवा स्वातंत्र्य काय रे
सुकृत दुष्कृत घडते हाती, स्वेच्छा त्यात काय रे ।
ईशशक्तिपेक्षा बलवान आहे, कोणी जीव काय रे
जे जे घडते ते ते सर्व, पूर्वनियोजित काय रे ।
विचार उठतो मनी जो जो, स्फुरण कारण काय रे
विधिलेखिता ओलांडुनि, कुणीतरी का जाई रे ।
पराशराचा पुत्र व्यास, जन्म अपघाताने काय रे
बऱ्यावाईट कर्मांचा कर्ता, कोणी जाणतसे काय रे
विचार पुष्कळ करता अंतरी, अंती जाणिले मी असे रे ।
ईश्वराचा खेळचि सगळा, येथ कोणी न कर्ता रे
दिसतो जीव जरी कर्मी गुंतला, भोगिता अन् त्या कर्म फला ।
सुटण्या यातून दुसरा काही, उपाय येथे नाही रे
कर्म कर्ता फल ते विसरुनी, साक्षित्वे रहा दृढ मनी ।
'आत्माचि मी' हा बोध धरुनी, खेळ खेळा नटावाणी
जन्ममृत्यूचा खेळ सारा, अविरत चालू रहाणार रे ।
आत्मरुपाला जाणा धरुनि, सद्गुरूंचे पाय रे
जन्मोजन्मी तोचि जीवाला, भवतारक तारु रे ।
शरण जाऊनी त्यासी नित्य, आत्मरुपी खेळू रे

✻-✻-✻

मन नाचे रे मन नाचे रे, मायेसंगे नाचे रे
विषयसुखाच्या स्मरण वृत्तीने, तळमळ तळमळ करिते रे
विषयानंदी रमण्या निशिदिनी, धडपड धडपड करिते रे,
विषयानंदी क्षणिक सुखासी, रमण्या किती ते आतुर रे
आनंदाचा झरा अंतरी, ध्यानी नच ते घेते रे
निज हृदयांतरी वळुनी साचे, सेवन ते ना करिते रे
चंचल चंचल किती अति चंचल, स्थिर कधी ना होते रे
कृष्णदास गुरुचरणा रमतो, उपाय त्यासी तोचि रे

✻-✻-✻

जाणावे भेटावे आत्मरुपाला, इच्छा सर्वांच्या मनाला

परि अंतरात डोकावण्याचे, न वाटे जीवाला
इच्छा वासना आकांक्षांचा, डोह काठोकाठ भरलेला
स्वच्छ करुन तळ पाहण्याचा, विचार ना तो कुणाला
जिकडे तिकडे काय चाले, दृष्टी अखंड बाह्याला
याचमुळे ना होय भेटी कधीही, अंतरीच्या परमात्म्याला
डोळे कान बंद करुन जो, जाणेल या खूणेला
गुरुकृपाबळे होईल त्याची, भेट निजात्मरुपाला

*-*-*

जीवाला हवी आत्मानुभूति, अखंड अविरत आनंदस्थिति
जी त्याची मूळ सहजस्थिति, पण जी दुरावली असती
उपाय त्यासाठी नाना किती, जप ध्यान भजन इति
पण तरी येत नसे सहज ती, कारण जीवभाव वासनांची गुंती
विषयानंदी लाभे सहज परि असे क्षणिक ती, कारणविरहित नसेची ती
मूळ स्वरूपी लक्ष वळविता चित्ती, आत्माकार होई वृत्ति
वासनांची उकलते गुंती, जीवभावाची विसरते स्थिति
क्षण क्षण लाभे आनंद स्थिति, स्पर्शता हळुहळु मूळ स्थिति
अभ्यासे होई तीच अखंड सहजस्थिति, गुरुकृपेची असे पूर्ण खूण ती

*-*-*

अध्यात्माच्या अंती, मिळते सुखशांति ।
जीवाची जी निजस्थिति, मिळविण्या धावपळ असे ती
विचार करा चित्ती, निजस्थिति असता ढळते कां ती
होण्या सुखाची प्राप्ति, नाना इच्छा कल्पिती ।
तृप्त होता लाभे ती, या भ्रमात जगती
इच्छा तृप्तीस विचरती, साधनांची कमतरता भासती ।
मिळविण्या झटता ती, तेणे लोपते मनीची शांति
येणे रिती असता, जीवाची निजस्थिति ।
अभाव कल्पने वाटे दुरावली, इच्छा शमता वाटे परतली
ही मायाच सकळ जाणली, त्यांसी निजठायीच लाभली ।
अशी ही सुखशांति, गुरुकृपे असे लाधली

*-*-*

प्रेम श्रद्धा अविचल निष्ठा, साधनेचा भक्कम पाया
मिळण्या सारे चला प्रार्थुया, सद्गुरुंसी भावे हृदया

प्रेम विसरविते जगासी साऱ्या, मिलन केवळ आस हृदया
उत्कट प्रेमा रमुनि सारे, देहासह जगद्भान विसरुया
श्रद्धा केवळ गुरुचि तारक, दास मी अन् स्वामी राया
विश्वासे या संसाराची, फिकीर सारी क्षणे दवडुया
अविचल निष्ठा साधनेवरी, ठेवुनि सारे मार्ग क्रमूया
मार्गेचि त्या सहजी सारे, ध्येय आपुले चला गाठूया
कोजागिरीच्या पौर्णिमेसी, विनवुनिया सद्गुरु सदया
पूर्णचंद्र त्या कृपाप्रकाशी, कृष्णदास म्हणे न्हाऊ या या

*-*-*

विवेक वैराग्य संपत्ति मागा तुम्ही सद्गुरूप्रती,
साधन भजनाचा पाया असे तोचि भक्कम अति
वैराग्य असावे अति तप्त निखाऱ्याप्रती,
विवेकाचा दीप तेवावा अंतरी अखंड नंदादीपाप्रती
ऐसे होता तुम्हा काहीच ना भीती,
सकल साधनांचे सार चढेल तेणेच हाती
कृष्णदास सांगे मग गुरुकृपे तुम्ही,
सहजी पोहोचाल परमपदाप्रती

*-*-*

अद्वैताच्या अनुभवी जाण्या पाहता, द्वैतभावना न मुळी सोडण्या पाहता
अंतरी सर्वांच्या एकचि सोऽहं सत्ता, मी-तू पणाचा भेद मग का हो करता
विशाल दृष्टीसी हो अंगिकारा आता, प्रेमरुपाने जगी हो पहा सर्व आता
श्रेष्ठ कनिष्ठ भावासी त्यजा सर्वथा आता, प्रत्येक जीवात पहा एकली आत्मरुप सत्ता
करा प्रार्थना कळवळुनि निज सद्गुरूनाथा, कृपे त्यांच्या येईल अद्वैतानुभूती त्वरिता
कृष्णदास प्रार्थितो श्री कृष्ण सरस्वती दत्ता, कृपे त्यांच्या रमतो या अभ्यासी सर्वथा

*-*-*

दु:खाचे ते चटके, सद्गुरूंचेचि ते फटके,
मलिन चित्तावरती, जणू धोब्याचे ते फटके
आईबाप गण गोत, स्वार्थी जन संबंध लटिके,
स्वार्थी संसारबंधाचे, फोडी जणू ते मटके
सोशिता दु:ख कळा त्या, येती वैराग्याचे झटके,
एकाग्र दक्ष करुनी, रमवी साधनी नेटके
गुरु अन् गुरुमंत्राचे, जाणवी महत्व नेटके,

मायेतुनी त्या लटिके, जीवा सोडवी नेटके
प्रसाद गुरुंचा जाणुनि, कृष्णदास ध्यानी रमतो नेटके!

*-*-*

विशालता हृदयाची, साधका कां न ती येते ।
वाचिता शात्रग्रंथही, खूण कां न ती कळते
संकुचित विचारांनी हृदय, त्यांचे कां हो मळते ।
जळमटे जोवरि न निघती, गुरुकृपा नच ती फळते
जरुर त्यांसी सर्व हे कळते, परि कळुनि कां न ते वळते ।
पाहुनि हृदय कळवळते, परि उपाय त्यासी न कळते
जोवरि स्पर्श न आत्मरुपाते, नच विशालता ती येते ।
गुरुचरणा स्पर्श तो होता, खूण कृपे ती ही कळते
आत्मरुपी सर्व अनुभवता, मत्सरा स्थान न उरते ।
कृपेनेच केवळ असे, हृदय विशाल ते होते
अहम् भान विसरता, सोऽहं अनुभवासी येते

*-*-*

गुरुनामाची कास धरा रे, विषयासी तुम्ही नका भुलू रे ।
भ्रम दावी तो तुज मनाला, त्यासी सत्वर पार करा रे
नाम जपा ते वाचे सद्गद्, गुरुरायासी करेल गद्गद ।
उचलोनिया तुजसी तो अलगद, देहबुद्धीच्या पार करील रे
आत्मरुपा तुम्ही जाणता, जन्ममरणा व्हाल परता ।
सच्चिदानंदी तुम्ही डुंबता, आनंदाला पार ना रे
कृष्णदास वृत्तीवरी नित्य, करी गुरुनामाचा वार रे

*-*-*

काय करावे न वळते हे मन ।
संकल्पिते नाना वृत्ती प्रतिक्षण
करावे ते वाटे नवे प्रतिक्षणी ।
सिद्धि न होता होय दु:ख क्षणोक्षणी
विचित्र ते कळा संसाराची जाचणी ।
सुखा हानी करी, घाली दु:खाची गवसणी
वृत्तीसी उदय मूळ ध्यानी आणी ।
स्फुरण सोऽहं तेचि लक्षा प्रतिक्षणी
कृष्णदास म्हणे आधी संकल्पा लाथ हाणी ।

'आत्माचि मी' ह्या विचारेचि केवळ सुख क्षणोक्षणी

*-*-*

ब्रह्मस्थिति ही सहजचि जीवा, कामनेने झाला दुरावा ।
निरास तिचा करुनि स्वभावा, इंद्रियांसी द्या विसावा
निश्चल चित्ते बसुनि ठावा, ब्रह्मस्थितिसी सहजी अनुभवा
कृष्णदास म्हणे सद्गुरु कृपे, अभ्यास करुनि गोडी अनुभवा

*-*-*

गुरुदेवांच्या विरहाने ज्या अश्रू नयनी आले, त्यांसी मी मनोमनी नमिले
गुरुकृपेचे महत्व ज्या क्षणोक्षणी जाणिले, त्यांसी मी मनोमनी नमिले
खूण दाविता निजगुरुंनी त्याचे भान ज्या घेतले, त्यांसी मी मनोमनी नमिले
गुरुप्रेमाच्या तरल तरंगी, जे जळावरी क्रीडले, त्यांसी मी मनोमनी नमिले
गुरुप्रेमापुढे मोक्षसुखही तुच्छ ज्या मानिले, त्यांसी मी मनोमनी नमिले
गुरुकृपेने तृप्त होऊनि, अद्वैताचा घास घेऊनियाही ।
जे दास म्हणुनियाच मिरविले, त्यांसी मी मनोमनी नमिले
विचार करता त्या थोरांचा, कृष्णदासा उणेचि रे गमले ।
त्यांसी मनोमनी नमिले, त्यांच्या कृपेसी प्रार्थिले

*-*-*

विश्व हे चालते तुझ्याची सत्ते । तुझीच सत्ता घडविते बिघडविते
हस्तक्षेप नको आपुल्या अज्ञ बुद्धिमत्ते । नको खेळ शक्तिचा ढवळाढवळ करायाते
कशासाठी धरावे साधके या मार्गाते । अंती जे होते कारण पतनाते
कृष्णदास लक्षितो केवळ शुद्ध परमार्थाते । प्रार्थितो सद्गुरुंसी सांभाळुनि न्यावे परमपदाते

*-*-*

ईश्वरासी जाणायाचे?? मग काय करायाचे??
काही नाही करायाचे! काहीच नाही करायाचे!!
पंचज्ञानेंद्रियांसी विषय नाही पुरवायाचे
तेणे काय साधायाचे, तेणे काय साधायाचे?
चित्तचतुष्ट्यासी नुरे काही चघळायाचे
जळावरील तरंग जणू असे रे थांबवायाचे
निश्चल स्थितीत त्या हळुहळु रमायाचे
स्वसंवेद्य आत्मरूप स्वत:शीच अनुभवायचे
अनुभवतो तो कोण अन् जाणितो त्यासी कोण
तोच तो मी नव्हे आणिक हेच केवळ जाणायाचे

काळ ठरे कल्पना, दुजे ना शांतिविना
हेच रे हेच केवळ, हेचि असे रे अनुभवायाचे
स्थितिते या पार करता काय तेथे उरायाचे
शब्द पांगुळती जेथे, ते कसे रे वर्णायाचे
विश्व सारे कल्पनाचि, नुरे काही तेथ बा रे
कृष्णदासे गुरुकृपे, सांगितले मर्म सारे

*-*-*

देउनिया दीक्षा गुरु झाला गुप्त,
वियोगे तो शिष्य हृदयी होई तप्त
संसारी होई उदास अन् विरक्त,
साहवेना मनी त्याचे स्थिति ही विभक्त
रात्रंदिन अश्रू ढाळीतो कृष्णदास गुरुभक्त

*-*-*

दीक्षा देता गुरु होई शिष्या हृदयी गुप्त,
गुरुस्मृती कालवते शिष्य हृदय नित्य
हृदयीच लपला परि हृदयीच वियोग व्यक्त,
कृष्णदासा गमे हे आश्चर्य निश्चित

*-*-*

गुरुमूर्तीवरी शिष्य, होई अनुरक्त,
इच्छी रुप डोळ्यासमोरी, राहो नित्य व्यक्त
दर्शन ते न होय होता, गुरु विलीन अव्यक्त,
कृष्णदास म्हणे भावे, पुन: करीन त्यासी व्यक्त

*-*-*

नाही मी कुणाचा, गुरुराया, तुजविण नाही मी कुणाचा
दास काया मने वाचा, सर्वथा, तव दास मी रे साचा
ध्यास मज ना आणिकाचा, गुरुराया, एकल्या तवचि रुपाचा
क्षणन्क्षण संगतीचा, अमोलिक आठव क्षणोक्षणी त्यांचा
एकांती पूर ये अश्रूंचा, गुरुराया, विरह साहवे ना त्याचा
करुणा सागर तू साचा, गुरुराया, निववि कृष्णदासा साचा

*-*-*

जळ भरले नयनांसीऽऽ, जळ भरले नयनांसीऽऽ
कुणी पुसेल का हो त्यांसीऽऽ, कुणी पुसेल का हो त्यांसीऽऽ,

दाऽऽवुनिऽऽ गुरु चरणांसीऽऽ, दाऽऽवुनिऽऽ गुरु चरणांसीऽऽ
हाऽऽ विरह गुरुंचा जाळीऽऽ, शमवेल कुणी का त्यासीऽऽ
दावा हो गुरुमूर्तीसीऽऽ, शोधा हो लपला कुठेसीऽऽ
कृष्णदासऽऽ करी विनतीसी, हो प्रगट होऽऽ, गुरुरायासीऽऽ

*-*-*

शिष्य शोधितो गुरुरायाला, येथे तेथे निजदृष्टीला
ध्यास हाचि तो अखंड त्याला, शोध शोधुनि अखंड दमला
आठव होता प्रेमकृपेला, धार लागते त्या नयनाला
हृदयी येई विकलतेला, कळवळ कळवळ त्या चित्ताला
रात्रंदिन तो ध्यास घेतला, शोधितो प्रेमळ गुरुमायेला
कृष्णदास शोधितो गुरुला, करुणा का न परि येई गुरुला
ये रे ये रे धाव लवकरी, दर्शन दे रे मम हृदयाला,
दे रे दे रे दर्शन मजला, दर्शन प्रार्थी निज हृदयाला
कधीतरी तो पाझर त्याला, फुटेल त्या गुरुरायाला
विश्वासे त्या काळ कंठितो, आशे जगतो या जीवनाला

*-*-*

जाणू कसे रे सद्गुरुराया काय तुझे ते रुप,
मानवापरी तुज लेखिता ना कळले कधी स्वरुप
सीमित आमुच्या देहबुद्धीसी ना कळले चिन्मय रुप,
क्षमा करा मी तुम्हासवे जरी सलगी केली खूप
दास म्हणुनि मी जरी मिरविलो, वर्तनासी परी त्या मी चुकलो,
सच्चिदानंद स्वरुप तुझे ते, आकळण्यासी मी रे मुकलो
करा क्षमा अपराधासी, तुच दुजा ना स्वामी मजसी,
कृपा करुनिया सद्गुरुराया, दे ओळख दे तव स्वरुपासी
जाणुनिया अपराध अंतरी, हुरहुर विकल होय मानसी,
कृष्णदास हा लोटांगणी तव, विनती करितो तव चरणांसी

*-*-*

गुरुरायाच्या आठवणीने येतो कंठ दाटुनिया
ये रे ये रे गुरुराया तू कोठे असशी धावुनिया
देव जाणण्या पूर्वसुकृते आली भेट तव घडुनिया
कृपाळूपणे अंगिकारीले तू भाव मनींचा जाणुनिया
स्वरुप तव ते अगाध अपार थकले वेदही वर्णुनिया

अवताराची महति परी तव नच दिधली तू जाणवुनिया
प्रेमळ मातेपरी चालविले तू अलगद साधनपथावरुनिया
प्रारब्धाचे फटके पडता, सावरिले मज न कळुनिया
चरणांची तव सेवा घडली नच मज ती हातुनिया
स्वरुप तव ते अज्ञालागुनि नच दिधले आकळुनिया
सदेह मूर्ती असता दिधले नच ते प्रेम तव कळुनिया
अज्ञ बालका ज्ञान बोल तव आले नच कधी उमजुनिया
द्वादश वर्षे सहवासाच्या येती आठवणी मनी दाटुनिया
कृष्णदास हा वेडापिसा गमतो घळघळ रडुनिया!

*-*-*

नाही मी जाणिलेऽऽ, नाही मी जाणिलेऽऽ,
गुरुदेवा, तव कृपेऽऽ, नाही मी जाणिलेऽऽ ।।
विषयातचि लोळत असता, अंधासम वर्तलेऽऽ,
तव कृपेऽऽ, नाही मी जाणिलेऽऽ ।।
पुर्वपुण्यही नसता सबळ, मजसी अंगिकारिलेऽऽ,
तव कृपेऽऽ, नाही मी जाणिलेऽऽ ।।
सलगी करता तव रुपासी, मर्यादे लंघिलेऽऽ,
तव कृपेऽऽ, नाही मी जाणिलेऽऽ ।।
बोधामृत ते देता मजसी, मनन नाही रे घडलेऽऽ,
तव कृपेऽऽ, नाही मी जाणिलेऽऽ ।।
मम उद्धाराची कळवळ तुजसी, तुवा उगीच रे श्रमविलेऽऽ,
तव कृपेऽऽ, नाही मी जाणिलेऽऽ ।।
कृपाहस्त उभवुनि नेता उर्ध्व, मार्गी पुन:पुन: घसरलेऽऽ,
तव कृपेऽऽ, नाही मी जाणिलेऽऽ ।।
ब्रह्मरस तू पाजू जाता, त्यासी झिडकारिलेऽऽ,
तव कृपेऽऽ, नाही मी जाणिलेऽऽ ।।
आस मजवरी तव हृदयाचि, त्यासी नाही रे जाणिलेऽऽ,
तव कृपेऽऽ, नाही मी जाणिलेऽऽ ।।
कृष्णदास हा केविलवाणा, येतो, शरण चरणकमलेऽऽ,
पाहिजे आपंगिलेऽऽ, गुरुदेवाऽऽ, पाहिजे आपंगिलेऽऽ ।।

*-*-*

प्रेम प्रेम म्हणजे जाणसी ते काही ।

देह सौख्य केवळ म्हणजे प्रेम नाही
अंतरीची मिठी हृदयाहृदयी भेटी ।
स्मरणेचि होय साऱ्या जगासी तूटी
सद्गुरु माझा अन् मी त्याचा केवळ ।
विश्वासे आनंदे कृष्णदासा अंतरी घळघळ

*-*-*

क्षमेची कशी करु याचना, क्षमेची कुठे करु याचना? ।।
तव संगति असता, कळत नकळत, मर्यादेसी कसे लंघिले, कळलेचि ना अज्ञ मना...
क्षमेची कशी करु याचना, क्षमेची कुठे करु याचना? ।।
मुखावाटे तू वर्तनाची मज, जाण कधिचि दिली ना,
अज्ञानी मज तव महत्ता, जाणवली ना मना...
क्षमेची कशी करु याचना, क्षमेची कुठे करु याचना? ।।
गुरुरायाची मजवाटे ही, झाली कशी अवहेलना,
वर्तनाची त्या वाटे आज, स्वत:सी स्वत:चीच ही घृणा...
क्षमेची कशी करु याचना, क्षमेची कुठे करु याचना? ।।
आज उमजता चूक मजला, तू नयनांसी दिसशी ना,
मग कुणासी कथू ही वेदना, कुणासी कथू मम वेदना...
क्षमेची कशी करु याचना, क्षमेची कुठे करु याचना? ।।
रुप तुझे हे लुप्त जाहले, चरणकमलेही दिसेना,
दु:ख कुणाशी मज मनीचे, कुठेचि ते वदवेना...
क्षमेची कशी करु याचना, क्षमेची कुठे करु याचना? ।।
कृपाशील तू क्षमा करुनिया, दूर करी अपराधी भावना,
कानी घेऊनि विज्ञापना, ध्यानी घेऊनि विज्ञापना ।।
कृष्णदास हृदयासी, निशिदिनी होताती यातना,
गुरुराया तू उदार हृदयी, करशील ना रे क्षमा?
करी रे मजलागी तू क्षमा, गुरुराया मजलागी तू क्षमा!!

*-*-*

'जसे असेल तसे', 'जसे असेल तसे' ।
ईश्वराकडे जाण्याचा राजमार्ग हा असे
स्वीकारता साच भावे मनाची खळबळ नासे ।
नि:स्तब्ध शांत अवस्थेत उमटतील ईश्वराचे ठसे
आनंदरूप स्वत: असुनि मन फिरवते दाही दिशे ।

कल्पनांच्या जाळ्यात अडकता हित काही बा नसे
ईश्वरदर्शनाचा काही ठराविक नियम नसे ।
जीवा जीवानुरुप ती पध्दत भिन्न असे
ईश्वर ईश्वर म्हणजे बाहेरी कुठेच नसे ।
अंतरीच प्रगट परी अहंकाराच्या आवरणात लपला असे
'मी माझे' ही कल्पना लोपताचि जसे ।
प्रकट होय ईश्वर तत्क्षणीच सहजी तसे
कर्ता करविता तोचि केवळ बाहुली मी असे ।
कळता साच भावे शरणागती तीच असे
जीवन सारे गुंफले सुसूत्र नियतीचे असे ।
इकडे तिकडे ना होई तसूभरही त्यात कसे
शरणागती शरणागती म्हणजे दुजी काही नसे ।
जे जे घडे ते ते ईश्वराचीच इच्छा असे
'मी केले, करतो, करीन', भाव जरी हा नासे ।
दु:खाचा लाग मग तो स्पर्शेल तुम्हा कसे
अंतरीच्या आनंदाला मग बाधा काही नसे।
आनंदाचे डोही उठती आनंद तरंग जसे
डुबी द्या डुबी खोल त्या अवस्थेत तुम्ही तसे ।
परमार्थाची साधना हीच हीच केवळ ती असे
मनाची लुडबुड व्यर्थ कार्य सारे नासे ।
कर्तृत्वाची दोरी सारी गुरुरायाची हाती असे
गुरु घडवितो कसा साक्षित्वे पहा तुम्ही कसे ।
ऐशा रिती राहता अवघी चिंता फिकीर नासे
चिंता फिकीर नुरता अवस्था आनंद तरंग जसे ।
घ्या घ्या रे तुम्ही याचा अनुभव कसा असे
समर्थ गुरु असताना शंका मनी का वसे ।
शरणागत भावे त्या सामर्थ्याचा अनुभव घ्या हो कसे
कृष्णदास म्हणे जरी वाटे लागावे ईश्वराचे पिसे
स्वीकारा आधी साच भावे - 'जसे असेल तसे' 'जसे असेल तसे'

*-*-*

अहम् विलयाची क्रिया, जणू प्रलयाची प्रक्रिया ।
देहमनाच्या अंतर्गत, घडती त्या नाना क्रिया

क्षणोक्षणी घडतसे, आत्मपरीक्षणाची क्रिया ।
बरे-वाईट योग्य-अयोग्य, सार-असार शाश्वत-अशाश्वत ।
निवाडा करिता घडतसे अंतरी, तीव्र घर्षणाची प्रक्रिया
वासनांचा बेधुंद धुमाकुळ, शांतण्याची असे ती क्रिया ।
वैराग्याच्या तप्त मुशीत, हीन अशुद्ध जळण्याची क्रिया ।
चित्त चतुष्ट्य शुद्धिकरणाची, घडतसे सर्व प्रक्रिया ।
मनाचा त्या नाश होवुनि, अमनाची घडे क्रिया मीपणाचा असह्य बंध,
तोडण्या जीवाची तगमग तगमग । मी पणे मृत्यू पावुनी, शिवपणे जगण्याची क्रिया
सुखदुःख भान देह मनाचे, लोपण्याची असे ती क्रिया ।
अहंतेचा लोप होऊनी, साक्षित्व उदयाची क्रिया
अहंभाव नष्ट होवुनि, सोऽहं भाव उमलण्याची क्रिया ।
द्वैत सारे नाश पावुनी, अद्वैतात रमण्याची क्रिया
अज्ञानता नाश पावुनी, ज्ञानसूर्य उगवण्याची क्रिया ।
गुरु सर्व कर्ता करविता, दासावरी घडे प्रक्रिया
कृष्णदास साक्षित्वे आज, निरखितसे सर्व प्रक्रिया ।।

*-*-*

वर्ष नवे काळ नवा पण तोच मी जुना जुना । देह नवा जन्मोजन्मी पण तोच मी जुना जुना
युगे युगे जन्मोजन्मी भटकलो स्थिर ना । कोण मी कोण मी परि मज कळेचिना
सुखरुप स्वये मी साधने सुख ना । साधनांचा गुलाम कसा झालो कळेचिना
शुद्ध स्फुरण अंतरीचे मन हे लक्षेचिना । जाणवे कोणासी ते तोचि मी जाणेचिना
अहम् अहम् अधोगती सहज झाली पहा ना । सोऽहं भान घेवोनिया श्वास तो उठेचिना
तोच तो मीच तो ईश्वर हे स्फुरेचिना । नश्वर या जगतीची ओढ ती सरेचिना
वैराग्यज्योत अंतरीची प्रखरपणे उजळेचिना । माया मोह ओल तिसी कोरडी ती होईचिना
विखुरले जगद्भासी मन स्थिर होईचिना । दास करुनि मने मजसी भुलविले कळेचिना
ईश, जगत् सत्यरुप मनाने कळेचिना । मनोनाश केल्याविना कोण मी कळेचिना
अहम् भाव बलिष्ठ तो न होय किंचित उणा । सोऽहं भाव वरिष्ठ तो अनुभवा येईचिना
कृष्णदास सांगे हे न घडे गुरु कृपेविना । शरण जाऊनिया त्यासी त्वरित हे साधा ना

*-*-*

परमेश्वराच्या मार्गात असे एक गंमत, अगणित सत्पुरुषांचे असती मार्ग अगणित
हा सोपा की तो सोपा याचे काही ना गणित, अंतीच्या अनुभवा मात्र अणुमात्र भेद नसत
नका होऊ तुम्ही त्या योगे भ्रमित, निजसद्गुरूंच्या मार्गाची अभ्यासावी रित
काय असे तो मार्ग कैसे त्याचे फलित, अभ्यासुनि तोचि एक अनुभव घ्यावा हृदयात

कां बरे दुसऱ्या मार्गाने जाण्याचे मनी उठत, लक्षात ठेवा त्याचमुळे विलंब तुम्हा होत
जागोजागी विहीर खणाया जरी पाहत, उपयोग काहीच ना अंती शीण मात्र होत
गुरुरुप नव्हे बरं कां गुरुतत्व असे उपदेशत, चाला ना एकाच मार्गे ते तत्त्व असे तुम्हा पाहत
मिळविण्याचे अथवा पोहोचायाचे येथे काहीच ना असत, स्वरूप अंतरी स्वयंसिद्ध ते परि माया अंहकार वेष्टीत
अहंकाराचा नाश हेचि सकल साधनांचे मथित, मेख त्याची गुरुकृपा हेचि तुम्ही ना जाणत
विवेक, वैराग्य, श्रद्धा अन् शरणता अंतरात, या आधारे चाला मग निजमार्ग आनंदी गमत
कृष्णदास नाही हा लेशमात्र भ्रमित, कृष्ण सरस्वती गुरुंचा मार्ग एकचि चालत

*-*-*

गुरुआज्ञा पालन करण्या मनुजा कधी तू लाजू नको
विनम्रभावे सद्गुरुसेवे मागे कधी तू सरू नको
क्षणभरही गुरुउपदेशा विसर कधी पडू देवू नको
विवेक लटिका पडो देऊनि मोहा बळी कधी पडू नको
निजगुरुंचा कृपानुभव कधी अश्रद्ध जनांसी सांगू नको
अंतरीच्या भावभक्तिचा चुथडा ऐसा करू नको
गुरुउपदेश संदेश अमोल जनात वटवट बोलू नको
जनांसी उपदेशिण्याचे ते शिवधनुष्य तू पेलू नको
परमार्थाची चावटी करुनि साधनमार्ग तू बुडवू नको
लोकेषणेच्या फशी पडुनिया नाश स्वत:चा करु नको
अज्ञानी तव बुद्धीद्वारे घात स्वत:चा करु नको
कृष्णदास म्हणे तू दास गुरुंचा, दासभाव कधी सोडू नको
देहभाव तो नाश होईतो आस भलती धरू नको

*-*-*

बोलणे माझे सलगीचे, लोकहो, हसण्यावारी तुम्ही नेऊ नका
जन्ममृत्यूच्या चक्रामध्ये पुन्हा पुन्हा तुम्ही अडकू नका
इंद्रियांच्या क्षणिक सुखा त्या पुन्हा पुन्हा तुम्ही सेवू नका
सुखाच्या स्मृतींचा तो कोष दाट तुम्ही करू नका
सुखरुप तुम्ही स्वये जाणा, बाह्य साधना रमू नका
माया केवळ माया सगळी, पाशा तिच्या तुम्ही भुलू नका
अमृताचा अंश तुम्ही हो, मर्त्य स्वत:ला समजू नका
देह नव्हे तुम्ही शाश्वत आत्मा, सोऽहं भावा विसरू नका

मुक्तीचा मार्ग काय तो गुरुंसी पुसण्या चुकू नका
गुरुमार्ग तो लाभ होता शंकासंशय त्या घेऊ नका
गुरुमार्गा चालत असता वाटे मध्ये कुठे थांबू नका
कृष्णदास म्हणे याच जन्मी मोक्षप्राप्तीची संधी अमोलिक दवडू नका

*-*-*

टाळ चिपळया बोले वीणा, दत्त नाम घ्या ना घ्या ना
जोवरि तो सावळा प्रकटेना, भक्त तिष्ठती द्वारी नाना
नाम घेता तल्लीन व्हा ना, मग हा हृदयीच कां ना
अनुभवी जाणती अंतरीच्या खुणा, हाचि की चमत्कार जाणा

*-*-*

क्षण एक असो देवाचा, ज्यात मी नाही कुणाचा ।
विसर साऱ्या जगाचा, अन् आठव केवळ देवाचा
विचार न उठो अन्य फुकाचा, क्षण आत्मानंदी केवळ त्या रमण्याचा
मनाचे व्यापार सरुन, शांतिब्रह्म अनुभवण्याचा ।
कृष्णदासा ध्यास मनी, नित्य त्या क्षणाचा

*-*-*

**।। श्रीस्वामी स्तुति ।।**

दत्तात्रयगुरु यति त्रिमूर्ती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
श्रीपादवल्लभ नृसिंह सरस्वती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
ब्रह्मसनातन सद्गुरुमूर्ती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
करवीरग्रामी अवतरले यति, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
हनुमत्स्वरुप अवधूत मूर्ती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
समर्थस्वामीगुरु अभेदमूर्ती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
सिंहासनीस्थित वामन मूर्ती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
ब्रह्मानंदीनित बालवृत्ती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
हास्य लोभस चिद्घन कांती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
कस्तुरीतिलक सुशोभित मूर्ती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
मौक्तिक माला विलसित मूर्ती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
गूढ मितबोली चाल चपळ गति, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
वैराग्यमठी संजीवनस्थिती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
निजबोधमठी गुंजारव गीती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
षडरिपुनाशक हारक भवभीती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती

सच्चिदानंददायक किर्ती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
भक्तपालक दायक मुक्ती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
स्मरणे अर्पित सहजी निजस्थिती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
कृपावंत अति अगाध किर्ती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
कृष्णदास शरण आर्ती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती
निशिदिनी गातो तव गुणकिर्ती, श्री गुरुदत्त कृष्ण सरस्वती

*-*-*

## ।। आरती ।।

आरती कृष्ण सरस्वती दत्ता, करुणाकर दीनवत्सल दत्ता ।।धृ.।।
बटूमूर्ति तू भाव ही बालक, आम्ही तुझे रे सर्वही बालक
तूचि असे रे अमुचा पालक, धरी करि सत्वरि उद्धरी ताता
आरती कृष्ण सरस्वती दत्ता, करुणाकर दीनवत्सल दत्ता ।।१।।
कुरवपुरीचा श्रीपादचि तू, गाणगापुरीचा नृसिंह यति तू
तोचि प्रकटला करवीरी, उद्धरिण्या हो आम्हा भक्ता
आरती कृष्ण सरस्वती दत्ता, करुणाकर दीनवत्सल दत्ता ।।२।।
सुहास्य मूर्ति तुझी गोजिरी, सुवर्णकांती तेजे आगळी
भाळी टिळा अन् टोपी मखमली, रुप पाहता तत्क्षणी पडली, भूल आम्हा चित्ता
आरती कृष्ण सरस्वती दत्ता, करुणाकर दीनवत्सल दत्ता ।।३।।
सर्व जगाचा तू रे चालक, तुला प्रार्थितो आम्ही बालक
तुचि केवळ आमुचा तारक, पटली खूण आम्हा चित्ता
आरती कृष्ण सरस्वती दत्ता, करुणाकर दीनवत्सल दत्ता ।।४।।
जाणुनिया आम्ही तुलाचि शरण, सत्वर करी आमुचे उद्धरण
निशिदिनी तुजला गातो ध्यातो, अखंड या चित्ता
आरती कृष्ण सरस्वती दत्ता, करुणाकर दीनवत्सल दत्ता ।।५।।

*-*-*

## ।। प्रार्थना ।।

नांदणीग्रामी जोशीवंशी अवतरलासी तू देवा
श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, नाम तुज गुरुदेवा ।।१।।
अप्पा अन्नपूर्णा सुत हा झालासी तू देवा
अजन्मा ऐसा भक्तकाजा अवतरलासी देवा ।।२।।
बालवयातचि गुरुदर्शना त्यागिलेसी गृह विभवा
अक्कलकोट स्वामीराये तुजसी, अंगिकारिले देवा ।।३।।

करवीरक्षेत्र अवधूतक्षेत्र, वसलासी तेथ देवा
श्रीपादयति तू नृसिंहयति तू अवधूतचि तू बरवा ।।४।।
सुरवरा वंद्य गुरुराज दत्त तू आला करवीर गावा
शिर्केभुवनी निवास केला देखुनि ताराईच्या भावा ।।५।।
शुभ्र अंगरखा हिरवी टोपी उपरण्याचा रंग भगवा
कस्तुरी टिळा शोभे माथा हास्य लोभवी जीवा ।।६।।
बालभाव सोंग घेवुनि दाविले अगणित लीला विभवा
कुंभार आळी वसुनि धरिसी कुंभार स्वामी उपनावा ।।७।।
वैराग्यमठी अन् निजबोधमठी भक्तजन करिती तुझाचि धावा
दर्शना येती भक्त त्यांसी अर्पिले वैराग्य विभवा ।।८।।
वासनांचा कोष सभोवती करी जीवा शिवा दुरावा
नाश करण्या समर्थ तुजविण ना दुजा कुणी गुरुदेवा ।।९।।
षड्‌रिपुंचा नाश करुनिया निर्मळ केले जीवा
माया मोह नाश करुनिया फास तोडिला देवा ।।१०।।
जीवासी ज्या अंगिकारिले, भेटविले तू शिवा
बद्ध जीवांसी मुक्त करुनिया दाविलेसी निजठावा ।।११।।
मर्त्य जीवांसी निजबोधुनिया अमर केलेसी देवा
नामाची तव अखंड वीणा मठी करी गुंजारवा ।।१२।।
भक्तकाजा धावलासी तू देखुनि शुद्ध भावा
उद्धरिलेसी अनंत अगणित भक्तजन गुरुदेवा ।।१३।।
शुद्ध मति दे मजसी गावया तव अगणित किर्ती विभवा
नाम गानी अन् ध्यानी रमता होवो ब्रह्मानंद जीवा ।।१४।।
विश्वी जे जे रुप दिसे ते भास तुझाचि व्हावा
द्वेष मत्सरा थारा न मिळो अशा रिती मज ठावा ।।१५।।
कायावाणी मनासहित मज पवित्र करा हो देवा
विकल्प दवडुनि अज्ञ मनाचे दृढ करी गा भावा ।।१६।।
चंचलता सारुनि दूर आघवी स्थिर करा हो देवा
भावभक्ति अन् विवेकवैराग्य लेणे मज लेववा ।।१७।।
पावन सुमंगल तव नामाची ललकार अंतरी उठवा
भावभक्तीच्या आनंदाच्या डोही मज त्या रमवा ।।१८।।
स्मरणी चिंतनी रमता तव या काळाचेही भान नुरवा
दिक्कालातीत सच्चिदानंद स्वरूप मजसी दावा ।।१९।।

कृपादृष्टी अन कृपाहस्त तव मजवरी सत्वरी उभवा
मानवत्व ते देवत्वाचा प्रवास मजसी घडवा ।।२०।।
जन्मोजन्मी दास तुझाचि परि कदापि विसर न व्हावा
विश्वव्यापक तू भरला अणूअणू प्रचित मजसी दावा ।।२१।।
दास दास मी तव अखंड गाता संसाराचे भान नुरवा
मी तू पण लोप करुनिया द्या एकत्वाचा अनुभव बरवा ।।२२।।
काय काय अन् किती ते मागू अंतरीची आस मिटवा
स्वामी तू मी दास तुझाचि मज दासभावे विनटवा ।।२३।।
समर्थ स्वामी शरणागत या दासावरी करी तव किमया
साच दासभाव हा येण्या निभण्या दे सामर्थ्य जीवा ।।२४।।
शरीर त्यागिलेसी जरि तू विश्वाकार देवा
भक्त ह्रदयी निवास अखंडित कार्या तव न विसावा ।।२५।।
कृपाळू तू स्वामी जाणुनि दास मागतो मी जोगवा
करी बा जैसे मनी तव तैसे दासा काही न ठावा ।।२६।।
कृष्णदास हा करी विनवणी, अंगिकारा गुरुदेवा
ध्यास तुझा मज लागो निशिदिनी, द्या अंती चरणी विसावा ।२७।।

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती यतिवर्या, न कळे मजसी करावे काय कलियुगी या
कलहरुपे शिरला कली प्रत्येका ह्रदया या, विसंवाद दावी प्रत्येका मता या
बिघडवितो हा शांति समाजी अन् गृही या, कृष्णदास विनवितो गुरुराया
स्थापी सुसंवाद प्रत्येकी ह्रदयी या, प्रगटे जेणे शांति अखंड समाजी या
विश्वप्रेमा होय उदय जेणे समाजी या, तेणे रमेल अखंड जीव भगवत्प्रेमी या ।।

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती यतिवर्या, राहो अबाधित समता चित्ता या
राहो अखंड विवेक जागृत अंतरी या, जेणे उठे न क्षोभ मम चित्ता या
राहो अखंड अविचल मनाची स्थिती या, जेणे अखंड राहील स्मरण तुझे गुरुराया
कृष्णदास प्रार्थितो यतिवर्या, आशीर्वाद हा देई नमिता तव पाया

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती यतिवर्या, कथिती शास्त्रपुराणे ग्रंथी या
आत्मा एकचि सर्वाभूती असे या, कारण काय मग होते द्वेषमत्सरा या
उगम असे कोठे तो सर्वा या, नाश कसा अन् होई सांगा या
कृष्णदास प्रार्थितो यतिवर्या, सर्वाभूती आत्मा मज दावाया

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती यतिवर्या, देई निर्मल दृष्टी मम कार्या
होई नश्वरतेचा बोध जगती या, दिसेल दृष्टी ईश्वर जगती या
अज्ञानांधकारी ज्ञानप्रकाश पहाया, मृत्यूकडूनी अमरत्वा न्याया या
अज्ञानाने दूषित मम दृष्टी या, कृष्णदास प्रार्थितो निर्मळ कराया
दिसेल दृष्टी मग तू अखंड गुरुराया

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती यतिवर्या
दु:खी दीन असती जीव जगी या, दे सामर्थ्य मजसी दु:ख त्यांचे हराया
असहाय असती जीव जगी या, दे सामर्थ्य मजसी त्यांसी सहाय कराया
उपेक्षित असती जीव जगी या, दे सामर्थ्य मजसी त्यांसी प्रेम अर्पाया
निराधार असती जीव जगी या, दे सामर्थ्य मजसी त्यांसी आधार द्याया
तळमळत असती जीव जगी या, दे सामर्थ्य मजसी त्यांची तळमळ हराया
पीडित असती जीव जगी या, दे सामर्थ्य मजसी त्यांची पीडा हराया
कृष्णदास म्हणे अज्ञानी असती जीव जगी या, दे ज्ञान मजसी त्यांचे अज्ञान हराया

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती, दान मागतो सर्वांप्रति
देई सर्वां निर्मळ मति, द्वेष मत्सरा सुटका करी ती
दे मधुर वाचा अति, हास्य फुलु दे मुखावरती
प्रसन्नता अखंड चित्ती, कपटा न द्या थारा चित्ती
आलस्य न हो देहाप्रति, मोह वासना न उठो चित्ती
करुनिया बुद्धीची चंचलता परती, करी सर्वां स्थिर मति
नाम जडो जिव्हेप्रति, ध्यानी जडो स्थिर मति
दिसेल त्या त्या दृश्याप्रति, दर्शन होवो कृष्ण सरस्वती
हेतु मनींचा कळविता तुजप्रति, कृष्णदास झाला निश्चिंत अति

*-*-*

गुण अवगुण ज्याचे त्याचे, राहो त्यांच्यापासी, स्पर्श न होऊ देऊ देवा, त्यांचा तो मजसी
सुमति दुर्मति ज्याची त्याची, राहो त्यांच्यापासी, मति मज ही कधि न बिघडो, जाता त्यांच्या संगतीसी
मतमतांतरे प्रवाह नाना, असती या जगतासी, कधी मजसी पडू न देई, त्या प्रवाहांसी
अहंकाराच्या ठासुनी भरल्या दिसती, मूर्ति जगतासी, लेशमात्रही स्पर्श न व्हावा, त्यांचा कधि मजसी

आत्मरुपी मी आत्मरुपी जग, दाखवी गा मजसी, कृष्णदास ही करी प्रार्थना, श्री कृष्णसरस्वती गुरुंसी

*-*-*

स्वामींकडे नाहीऽऽ मागणेऽऽ

मज हित सकळ तो जाणेऽऽ, मज हित सकळ तो जाणेऽऽ,

स्वामींकडे नाहीऽऽ मागणेऽऽ

कृपासागर दयाळू त्या कृपेसी ना उणे, स्वामींकडे नाहीऽऽ मागणेऽऽ

अंगिकार मज करिता वाटे, मम भाग्यासी कोण गणे,

स्वामींकडे नाहीऽऽ मागणेऽऽ

भक्ति ज्ञान अलंकारांचे लेवविले मज लेणे

वैराग्याचे कवच घातले अता मुक्तपणे खेळणे

विवेकाची ज्योत उजळता अज्ञानांधकारी काय भिणे

कृष्ण सरस्वती अवधूताचे बाळ मी जाणेऽऽ

कृष्णदास हा मनी ध्यास त्या एकरुप होणे, स्वामींसी एकरुप होणे,

स्वामींकडे नाहीऽऽ मागणेऽऽ

*-*-*

गुरुदर्शना जाता मज नाही काही मागायाचे,

पायावर डोई ठेऊनि, रुप डोळ्या साठवायाचे

त्रास त्यांना देऊनि, मज नाही काही विचारायाचे,

अति प्रसन्न मुद्रेसी त्या, निजमनी साठवायाचे

बोलावया लावुनि, मज नाही त्यांसी शिणवायाचे,

अबोल त्या मुद्रेतुनि, भाव अंतरीचे ओळखायाचे

मज अज्ञ बालका केवि, मातेचे प्रेम कळायाचे,

दर्शना जाता भावे, निजकुशीत त्या शिरायाचे

कृपादृष्टीसी वाटे, त्याने मजसी न्याहाळयाचे,

भरुनि नेत्र मज येती, कृपा लाभता साचे

हृदयात रुप नित्य स्मरता, गुरुंसी एकरुप व्हायाचे,

दर्शनाची मेख ही कळता, सफल दर्शनि गुरुंचे

गुरुशिष्य एकरुपता, ध्येय असे अंतीचे,

शांतिची पै गा शांति, वर्णिले ज्ञानदेवे त्या स्थितीचे

*-*-*

संगात राहुनिया नि:संग राहण्यासी,

या चला या करूया प्रार्थना श्रीगुरुंसी
दशेंद्रिया विषय तो श्रीगुरुचि सर्व होण्यासी,
या चला या करूया प्रार्थना श्रीगुरुंसी
अतूट तैलधारेवत् होण्या स्मरण अंतरासी,
या चला या करूया प्रार्थना श्रीगुरुंसी
नित्य कर्मे करुनियाही येण्या अलिप्ततेसी,
या चला या करूया प्रार्थना श्रीगुरुंसी
षड्रिपु सकलही ते निर्मूल होण्यासी,
या चला या करूया प्रार्थना श्रीगुरुंसी
द्वैत सांडुनिया अद्वैती रमण्यासी,
या चला या करूया प्रार्थना श्रीगुरुंसी
मुक्तिवरील भक्ति सहजी साधण्यासी,
या चला या करूया प्रार्थना श्रीगुरुंसी
या चला जाऊया सारे श्रीक्षेत्र करवीरासी,
कृष्णदास म्हणे प्रार्थुया श्री कृष्ण सरस्वती गुरुंसी

*-*-*

हे तो कृपेचे देणे, का वृथाचि अभिमान घेणे?
उधळिता स्तुतिसुमने, नको स्वत:वरी भाळणे ।।
सद्गुरुंचे बियाणे, पोसिलेही कृपे तेणे ।
बहरता फळे फुले, 'कां माझे असे' सांगणे? ।।
श्रीगुरु कृष्ण सरस्वती दत्त, गुरुंचे करवीरी वसणे ।
गुप्त सोंग दावुनि, जनी बालकापरी वर्तणे ।।
मज सद्गुरु असे अबोल, त्याचे मजकरवी लिहिणे ।
वाचुनि उकलुनि मर्म, माझे मजसीच बोध घेणे ।।
तोषता तुम्ही संत जन, मनी कृतज्ञता येणे ।
कृपा थोरवीते जाणवुनि, घडे आनंदणे ।।
नको अहंकाराचा घाला, वाराही लागू न देणे ।
चाललो वाट गुप्त, पुढेही सांभाळणे ।।
प्रार्थुनिया मनी भाव, ऐसेचि चरणी ठेविणे ।
विनवितो कृष्णदास, श्रीसद्गुरुंसी नम्रपणे ।।

*-*-*

जाणाल जरी गुरुदेवा, वाचे मौनातचि विसावा ।

पाठ शिकवणींचा स्मरावा अन् तोचि आचरावा
गुरु अंतरीच स्मरावा, ध्यानी तोचि धरावा ।
मनी ध्यास दुजा ना, विश्वात तो असावा
कृष्णदास हृदयीच झाला, गुरुदेवांसी विसावा

*-*-*

विश्वात्मक गुरुरुपाचा, जरी वाटे व्हावा साक्षात्कार ।
ठाई ठाई पहा भरले, त्यांचेच रुप अपार
मग कैसे निघतील मुखे, हृदय दुखविणारे उद्गार ।
कृष्णदास म्हणतो पहा, करा काही विचार

*-*-*

गुरुंसी सोडू नका सख्यांनो, गुरुंसी सोडू नका
जन्म जाईल फुका, सख्यांनो जन्म जाईल फुका
भवबंधातून सोडविण्यासी, आला भूवरी सखा
दिले तुम्हासी साधन करण्या, तुम्ही ते चुकू नका
सच्चिदानंद स्वरुपाचा अनुभव, देईल तुम्हा ते निका
मीपणाचा सुटेल बंध, वासनांचा विरेल कंद, सहजी मग तो सुखा
कृष्णदास म्हणे कळकळीचे, बोलणे मज हे ऐका
शरण जाता परतीरा हो, पावाल सुखा सुखा, पावाल सहजी फुका

*-*-*

कृष्ण सरस्वती पदकमलींचा, जाहलो मी भृंग
प्रेमकृपारस पिऊनिया, जाहलो मी दंग
कृष्ण कृष्ण नामी, कृष्णदास गातो अभंग

*-*-*

श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त, पतितपावन सद्गुरू दत्त
कृपा लाभता पावन त्वरित, कृष्णदास पावन सत्य

*-*-*

।। ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु ।।

कृष्णदास - सुदेश चं. चोगले
पत्ता: २/२७, चोगले हाऊस, बाभई, बोरीवली (प.) मुंबई ४०००९१ संपर्क: ९८२०९२८१२८
www.krishnasaraswati.com